

अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले
ग्रंथप्रसाराला वाहिलेले दर्जेदार मासिक

# मेहता मराठी ग्रंथजगत

मे २००८ किंमत रुपये १५

# बाल विशेषांक

## लंडनमधील प्रदर्शनात
## 'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या पुस्तकांचे मुखपृष्ठ







'इयान फ्लेमिंग' शताब्दी वर्षानिमित्त लंडन येथील 'द बकमन एजन्सी' तर्फे भरविण्यात येणाऱ्या भव्य प्रदर्शनात पुण्यातील मेहता पब्लिशिंग हाऊस तर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या 'गोल्डफिंगर' आणि 'यू ओन्ली लिव्ह ट्वाइस' या अनुवादित पुस्तकांच्या कव्हर्सचा समावेश करण्यात आला आहे.

द बकमन एजन्सीतर्फे भरविण्यात येणाऱ्या 'बाँड बाऊंड' या प्रदर्शनात इयान फ्लेमिंगच्या जेम्स बाँड पुस्तकांची कव्हर्स ठेवण्यात येणार आहेत.

'फॉर युवर आईज ओन्ली- इयान फ्लेमिंग आणि जेम्स बाँड' या इंपिरियल वॉर म्युझियममधील प्रदर्शनात इयान फ्लेमिंग पब्लिकेशन्सतर्फे पोस्ट कार्ड्स व भेटकार्डे विक्रीसाठी ठेवली जाणार आहेत.

त्यावर युनायटेड किंगडममधील बाँड कव्हर्सबरोबरच काही परदेशी प्रकाशनांची कव्हर्सही वापरण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे.

मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या या पुस्तकांच्या कव्हर्सचे डिझाईन चित्रकार चंद्रमोहन कुलकर्णी यांनी तयार केले आहे. या कव्हर्सचा वापर करण्याबद्दल पाच टक्के रॉयल्टीही कंपनीने देऊ केली असल्याचे पत्र मेहता पब्लिशिंग हाऊसचे सुनील मेहता यांना आले आहे.

प्रदर्शनाच्या ठिकाणी तसेच वेबसाईटवरून या कार्डांची विक्रीही करण्यात येणार आहे.

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ मे २००८
◆ वर्ष आठवे
◆ अंक पाचवा

## — अनुक्रमणिका —

| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **साहित्यवार्ता** | ८ |
| **पुस्तक परिचय** | |
| **थैलीभर गोष्टी :** अनु. लीना सोहोनी | ४० |
| **जांभळे आंबे :** वैशाली कार्लेकर | ५० |
| **झॅकपॅक शोध :** राजीव तांबे | ५८ |
| **तेनालीराम :** मंजूषा आमडेकर | ७० |
| **मुलाखत :** हेमू रामय्या | ८९ |
| **पुरस्कार** | ९५ |
| **वाचकांचा प्रतिसाद** | १०५ |
| **श्रद्धांजली** | १०८ |

✠ संपादक :
सुनील मेहता

✠ कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

✠ अंकाची किंमत १५ रु.

✠ वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

✠ प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

✠ मांडणी-अक्षरजुळणी
*मेहता पब्लिशिंग हाऊस*

✠ संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-४११ ०३०.
फोन : २४४७६९२४ फॅक्स :०२०-४४७५४६२
**Email - info@mehtapublishinghouse.com**
**Website - www.mehtapublishinghouse.com**

**वार्षिक वर्गणी १५० रु. तीन वर्षांची ३५०रु. पाच वर्षांची ५००रु.**
**३ किंवा ५ वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादकसहमत असतीलच असे नाही.*




## पिक्चर बुक्सची गरज आणि उपयुक्तता

गतवर्षीप्रमाणेच मे महिन्याचा हा अंक बालसाहित्यावर लक्ष केंद्रित करणारा आहे.

मुलांना अगदी लहानवयापासून पुस्तके हाताळण्याची गोडी लावायची असेल तर ती पुस्तके सचित्र असायला हवीत. ज्यांना लिहितावाचता येत नाही अशा दोन-अडीच वर्षांच्या मुलामुलींनाही आईने किंवा वडिलांनी मोठ्या आकारातील पिक्चर बुक्स दाखून त्याद्वारे जर गोष्ट सांगितली तर ती त्यांना आवडते. एकही शब्द न वापरता केवळ चित्रांच्या मालिकेतून कथेचे टप्पे सांगता येतात आणि संपूर्ण कथा मुलाला कळू शकते. केवळ चित्रांच्या माध्यमातून कथेतील व्यक्तिरेखा आणि घटना यांची कल्पना मुलाला येऊ शकते. पालकांनी वा शिक्षकांनी त्यामधील संगती जर मोजक्या शब्दांत व्यक्त केली तर तर्कसंगत अशी कथावस्तू मुले आपल्या कल्पनेने विकसित करू शकतात. मुलांची आकलनक्षमता आणि कल्पनाशक्ती योग्यप्रकारे फुलवण्यासाठी पिक्चर बुक्स, चित्रात्मक पुस्तके हा सर्वांत सोपा आणि प्रभावी मार्ग आहे असे अनेक शोध-प्रकल्पांद्वारे स्पष्ट झालेले आहेत आपण जर आपल्या घरातील मुलांबाबत तसा प्रयोग केला असेल तर आपल्यालाही त्याची प्रचिती आली असेल.

तशी मुलांच्या पुस्तकात चित्रे आरंभापासून टाकण्यात येतात; परंतु चित्रांना प्राधान्य देऊन पुस्तके तयार करण्याची इच्छा रंगीत मुद्रणाचे तंत्र आटोक्यात आल्यावर व्यावहारिक पातळीवर उतरणे शक्य झाले. ग्रिम बंधूंच्या परीकथांची १८२३ साली निघालेली आवृत्ती ही जार्ज ग्रुइकशॅक या कलावंतांच्या चित्रांमुळे आकर्षक ठरली आणि पालकांनी तसेच शिक्षकांनी तिचे कौतुक केले. एखादी कथा सांगताना किंवा वाचताना समर्पक चित्रांमुळे त्या कथेतील व्यक्ती आणि प्रसंग हे दृश्य स्वरूपात समोर आल्याने, आकलनाला मदत होऊ लागली. बालसाहित्यात चित्रांचे प्रमाण त्यामुळे वाढू लागले आणि समकालीन नामवंत कलावंतांनाही चित्रे काढण्यासाठी प्रकाशक आवाहन करू लागले. रॅंडॉल्फ काल्डकॉट, केट ग्रीनअवे आणि वॉल्टर

क्रेन या चित्रकारांनी इंग्लंडमध्ये १९ व्या शतकातील बालसाहित्यावर आपला ठसा उमटवला. रँडॉल्फ काल्डकॉट याने घटना चालू असल्याचे चित्रण करून चित्रांमध्ये गतिमानता आणली. त्याच्या नावाने उत्तम चित्रात्मक पुस्तकांना पुरस्कार ठेवण्यात आला आहे. अमेरिकन चित्रकार होवार्ड पाइल याने १८८३ मध्ये दि मेरी ॲडव्हेंचर्स ऑफ रॉबिन हूड या पुस्तकासाठी काढलेली चित्रे फारच गाजली.

विसाव्या शतकाने बालसाहित्याला आणि त्यातील चित्राकृतींना अधिक समृद्धीचा वसा दिला. मुद्रणकलेत क्रांती झाली. कलर सेपरेशनचे तंत्र अवगत झाले. तीनरंगी ब्लॉकची छपाई, पुढे ऑफसेट छपाई, संगणक व झेरॉक्स, कलर प्रिंटिंग, डिजिटल प्रिंटिंग असे अनेक टप्पे या शतकात बघायला मिळाले. त्यामुळे एकूणच मुद्रणकलेचे स्वरूप पालटले. इलेक्ट्रॉनिक माध्यमे, टीव्ही-संगणक-चित्रपट यांच्यातही पूर्वी कधी नव्हे अशा रंगपंचमीला मुक्त अवसर मिळाला.

मराठी बालसाहित्य विसाव्या शतकात पिक्चरबुकसारख्या आलिशान चैनीपासून काहीसे फटकूनच राहिले. बहुतक पुस्तके मोजक्या रेखाचित्रांनिशी निघत. रंगीत चित्रांचे प्रमाण तुरळक असे. पूर्णतया रंगीत चित्रांनी सजलेली बालकथांची वा माहितीची पुस्तके क्वचितच कोणी काढण्याचे धाडस करी. शिशूंसाठी शब्दविरहित - केवळ चित्रमय पुस्तके हा प्रकारही कोणाला मानवत नाही. ज्यांनी पूर्णतया रंगीत बालसाहित्य काढले त्यांना फारसा प्रतिसादही वाचक-ग्राहकांकडून मिळाला नाही. कारण त्या पुस्तकांच्या किंमती तुलनेने जास्त असत आणि मराठी पालक आपल्या मुलांच्या हाती एवढी भारी पुस्तके देताना दहावेळा विचार करीत.

पण आता ही परिस्थिती बदलत आहे.

मुलाची बौद्धिक वाढ, मेंदूची वाढ ही बहुतांशी ते मूल तीन वर्षांचे होईपर्यंत होऊन जाते असे शास्त्रज्ञांना संशोधनात आढळून आले. मुलांच्या पाचही ज्ञानेंद्रियांचा विकास चांगला साधायचा असेल तर पहिल्या तीन वर्षात त्याच्याकडे जास्त लक्ष द्यायला हवे हे मग अपरिहार्य ठरले. मुलगा हुशार. बुद्धिमान, चाणाक्ष, तल्लख व्हायला हवा; तरच तो मोठा होऊन स्पर्धेच्या युगात उच्चपदापर्यंत पोचू शकणार, या राखीव जागांच्या जमान्यात भारतात फारसा वाव उरणार नाही तेव्हा जागतिक पातळीवर त्याला आपल्या बौद्धिक बळावर प्रभाव टाकण्याची किमया आत्मसात व्हायला हवी; तर त्यासाठी गर्भसंस्कारापासूनच जागरूक रहायला हवे हे कुठेतरी अबोध मनात पक्के झाले... किंवा हे सगळे निरर्थक वाटले तरी आपण जन्माला घातलेल्या मुलाचे भवितव्य सुरक्षित राहावे म्हणून त्याचे शिक्षण चांगले हवे हा विचार पटल्यामुळे म्हणा, पालक मुलांना चांगल्या शाळेत, कॉनव्हेंटमध्ये घालण्यास उद्युक्त झाले.

अभ्यासात प्रावीण्य हवे तर आकलनक्षमता उत्तम हवी. कल्पनाशक्ती हवी.

निरीक्षण शक्ती हवी. वाचनलेखनात प्रावीण्य हवे. त्यासाठी शालापूर्व वयातच, शिशू अवस्थेतच निरीक्षणशक्ती, आकलनक्षमता, कल्पनाशक्ती यांना चालना द्यायला हवी. त्यासाठी एक उत्तम मार्ग म्हणजे पिक्चर बुक्स. त्यातील चित्र दाखवून एखादी गोष्ट सांगणे, एखाद्या विषयाची माहिती देणे, निरीक्षणाची क्षमता वाढवणे, भाषेची जाण वाढवणे- हे सोपे जाते. पिक्चर बुक्स थोडी महाग असली तरी मुलाच्या भावजीवनाच्या यशासाठी त्यांची गरज आहे हे लक्षात घेऊन ती आपल्या घरात आणणे अपरिहार्य आहे असे नकळत आपल्या जागरुक पालकांच्या ध्यानात येत आहे. त्यामुळे अशा पुस्तकांची मागणी वाढत आहे आणि त्यांची मोठ्या प्रमाणावर निर्मिती होणे यापुढे अटळ ठरणार आहे.

उत्तम चित्रांमुळे कमीतकमी शब्दांमध्ये एखादी गोष्ट मुलांना सांगता येते. चित्रांकडे बघितल्याने मुलांची निरीक्षणशक्ती वाढते. व्यक्तिरेखा मनात ठसते. एखादा प्रसंग वा घटना लगेच लक्षात येते. भाषेची जाण वाढते.

वर्डलेस- शब्दरहित चित्रपुस्तकाप्रमाणेच एका पानावर एक दोन वाक्ये आणि पानभर चित्रे असणारी पुस्तके, एका पानावर चारसहा ओळी मजकूर आणि पानभर चित्रे अशी पिक्चर बुक्सही वयोगटानुसार तयार होऊ शकतात. मजकूर आणि चित्रे यांचे प्रमाण बदलू शकते.

चित्रांच्या माध्यमातून कथा सांगितली गेल्याने मुलांना सहज समजते, कंटाळवाणी वाटत नाही. तिचा आशय, तिचा संदेश हाही समजू शकतो. मुद्दाम तसा न सागताही.

मुलांना सध्या टीव्हीमुळे खूप वेगवेगळ्या प्रकारची दृश्ये बघायला मिळतात. जे बघायला मिळते त्यातील रंगसंगती, हालचाली, हावभाव, विविधता, विसंगती, चमत्कृती त्यांच्या मन:पटलावर नोंदवली जाते. एकापुढे एकेक दृश्य भराभर सरकत जाते. त्यामुळे त्याचा ठसा पुसटही उमटणे शक्य असते. पुस्तकाच्या पानावरचे चित्र पुन:पुन्हा बघता येते. त्यातील तपशील अधिकाधिक घट्ट होत जातात. त्याकडे मुले बारकाईने बघत राहतात. त्यांचा आनंद वाढतो. परिचित प्रिय वस्तूंचे दर्शन सुखद वाटते. मिकी माऊस पुन: पुन्हा बघितल्याने तो जवळचा वाटतो. मित्र बनतो. त्याचे चित्र पाहिल्याबरोबर त्याच्याबद्दलची ओळख दृढ होत जाते. त्या चित्राच्या माध्यमातून मुलांच्या डोळ्यापुढे त्या गोष्टीची पार्श्वभूमी उभी राहते. त्या गोष्टीतील व्यक्तिरेखा (सिंड्रेला, हत्ती, सिंह, माकड, मिकी माऊस, डोनाल्ड डक) समोर येतात, त्या गोष्टीतल्या तपशीलाला या चित्रांमुळे दृश्यात्मकता लाभते; त्यांचा दुहेरी ठसा मनावर उमटतो.

त्या चित्रातले गोष्टीत न दिलेले असे जे वेगळे तपशील असतात, तेही त्या गोष्टीची आवाहकता वाढवतात. कथेतील घटनांमधली तर्कसंगती आणि कालानुक्रमसंगती

लक्षात येते. त्यामुळे कथानकात पुढे काय घडते याची जिज्ञासा वाटते. चौकसपणा वाढतो. चित्रांमुळे कथेतील पात्रांच्या मन:स्थितीची कल्पना येते; त्यांच्या यशाने बरे वाटते; त्यांच्यावरील संकटामुळे दु:ख होते, इतरांच्या भावनांशी समरस होता येते. इतरांच्या भूमिकेत शिरता येते. पिक्चर बुक्स हे मुलांच्या भावनिक, बौद्धिक, शाब्दिक समृद्धीला गती देऊ शकते.

पिक्चर बुक्सद्वारे मूल तीनचार वर्षाचे होईपर्यंत पालक जर मुलाशी संवाद साधत राहिले तर मुलाचे आकलन, निरीक्षण वाढेलच त्याची कल्पनाशक्तीही तल्लख होईल. नवनव्या कल्पना याच मानवी जीवनात क्रांती घडवून आणत असतात.

बालसाहित्याला बालवयात महत्त्व आहेतच; परंतु मूल तीन-चार वर्षांचे होईपर्यंत 'पिक्चर बुक्स'चे योगदान फार महत्त्वपूर्ण ठरू शकते. ते त्याच्या भावी आयुष्याला उपकारक ठरू शकते. पालकांनी याचे मोल जाणून घ्यायला हवे.




**प्रिय वाचकमित्रहो........**

आपल्या सोयीसाठी **'मेहता पब्लिशिंग हाऊस'**चे ग्रंथदालन
दर रविवारी नियमित सुरु राहील.
वेळ - सकाळी १० ते दुपारी ४

**सभासदांनी पुस्तकखरेदीस येताना मेंबरकार्ड जरूर आणावे.**



# साहित्यवार्ता

*** जगभरातल्या मराठी कवींचे आगळे 'सृजन'**

'ई-बुक्स' किंवा 'बुक्स ऑन सीडी' ही कल्पना मराठी भाषेत रुजवणारा 'सृजन ॲब्रॉड' हा आगळावेगळा कवितासंग्रह १२ एप्रिलला प्रकाशित झाला. या काव्यसंग्रहातील निवडक कवितांच्या अभिवाचनाची सीडीदेखील संग्रहासह उपलब्ध आहे.

या संग्रहाची संकल्पना आणि निर्मिती डॉ भूषण केळकर यांची, तर संपादन डॉ अरुणा ढेरे आणि संदीप खरे यांचे आहे. 'कॉंटिनेंटल'तर्फे या संग्रहाचे प्रकाशन झाले. अनिवासी मराठी संवेदनशील मनांचे हुंकार या कवितांमधून प्रकट झाले आहेत. यावेळी दहा देशांतून आलेले कवी उपस्थित होते.

''युरोप, अमेरिका, आशिया, आफ्रिका या पाचही खंडांतून मराठी मंडळींनी या संपादित आणि स्पर्धात्मक काव्यसंग्रहासाठी कविता पाठवल्या. एकूण १९ देशांतून आलेल्या ३०० कवितांमधून संपादकांनी ७५ कवितांची संग्रहासाठी निवड केली. अमेरिका, इंग्लंड, कॅनडा, सिंगापूरप्रमाणेच तैवान, केनिया, आईसलँड, इस्राईल, बहारिन, इंडोनेशिया येथूनही प्रतिसाद मिळाला. प्रत्येकाचे कार्यक्षेत्र, वय, अनुभव शैक्षणिक व सामाजिक पार्श्वभूमी भिन्न असूनही सर्जनशील मराठी मनाचा हा काव्याविष्कार लक्षणीय होता.''

''या अनिवासी मराठी कवींना फटका, लावणी, ओवी अशा वृत्तांत रचना केल्या आहेत, त्याचे कौतुक वाटते.'' डॉ. अरुणा ढेरे म्हणाल्या.

''निळ्या निळ्या आभाळात झोका वर चढे, पाचू-हळदीचा रंग आभाळाला जडे, अशी 'रंग'तदार रचना या संग्रहात आहे, तशीच 'जे ओळखीचे वाटले, नादात ते गेले पुढे, हे शब्द माझे वेंधळे, रेंगाळले मागे-पुढे' अशी उदास कबुलीही आहे. कुठे 'दे

काही पण असो चिरंतन', अशी ओढ व्यक्त झाली आहे; तर 'घेऊन शेला चैतन्याचा, मनात शिरला अवखळ वारा, आज कुणाला सांगून गेला, गुपित कळीचे खट्याळ वारा' असा उत्सवी अनुभव कुणी मांडला आहे.

'पायतळी तुडवल्या जातील इतक्या नकोत फुलांच्या राशी, बहर कळण्याइतपत फुलणारं रोप दे दारापाशी' असे समंजस शहाणपणही कुणी व्यक्त केले आहे.''

*** लंडनमध्ये दुर्मिळ मेवाड रामायण**

भारतीय जीवनाचा अविभाज्य भाग असलेल्या 'रामायणा'ने देशाची सीमा कधीच ओलांडली आहे. आता लंडनकरांना रामायणातील १२० दुर्मिळ तैलचित्रे पाहता येणार आहेत.

मेवाड हस्तलिखितांतील या दुर्मिळ १२० तैलचित्रांचे प्रदर्शन 'ब्रिटिश लायब्ररी'तर्फे भरविण्यात येणार असून, १६ मेपासून १४ सप्टेंबरपर्यंत ते पाहता येईल. दि रामायण : लव्ह अँड व्हॅल इन इंडियाज ग्रेट एपिक असे या प्रदर्शनाचे नाव असेल. शतके उलटली तरी भारतीयांवर रामायणाची मोहिनी कायम आहे. या महाकाव्याविषयी सांगोपांग माहिती देणारे हे प्रदर्शन असेल. या प्रदर्शनाला जोडूनच व्हिक्टोरिया व अल्बर्ट संग्रहालयातील वस्त्रे, पुतळे आणि ब्रिटिश संग्रहालयातील कठपुतळीच्या बाहुल्या व अन्य दुर्मिळ वस्तूंचे प्रदर्शनही होणार आहे. रामायणातील संस्कृत मंत्रांचे पठण, भारत व आग्नेय आशियातील नृत्य-नाट्यसंगीताची मेजवानीही दिली जाईल.

मेवाडचे राज्यकर्ते राणा जगतसिंह यांच्यासाठी १६४९ ते १६५३ या काळात हस्तलिखित व तैलचित्रे बनविण्यात आली आहेत. त्यात चारशेपेक्षा जास्त तैलचित्रे असून सर्व प्रसंग बारकाईने रंगविले आहेत. या रामायणातील पहिल्या दोन खंडांची चित्रे साहेब दिन या कलाकाराने रंगविली आहेत.

*** मधुबालावरील तिकिटाची विक्री**

आपल्या असीम सौंदर्याने सिनेरसिकांच्या मनावर अधिराज्य गाजविणाऱ्या सौंदर्यवती मधुबालावर आजची पिढीही फिदा असल्याचे सिद्ध झाले आहे. १८ मार्च रोजी पोस्टाने मधुबालावर काढलेल्या टपाल तिकिटांची चार लाख एवढी विक्रमी विक्री १५ दिवसात झाली असून, केवळ शहरातच नव्हे, तर अगदी दुर्गम भागातील खेड्यांतूनही मधुबालाची छबी असलेले टपाल तिकीट घेण्यासाठी पोस्टासमोर मोठाल्या रांगा लागत आहेत.

'बाबुजी धीरे चलना, प्यार मे जरा संभलना' म्हणत सांभाळून चालण्याचा इशारा देणाऱ्या मधुबालाला पाहून पावलं तिथल्या तिथेच थिजून जात. तिच्यावरील सिनेमा, संगीत व साहित्य या माध्यमांतून तिच्या आठवणींचा दस्तऐवज काळजाशी जपणाऱ्यांना तिचे प्रसिद्ध छायाचित्र असणारे टपाल तिकीटही आपल्याजवळ असावे, असे वाटते. आजपर्यंत पोस्टाने चित्रसृष्टीतील प्रसिद्ध कलावंताचे छायाचित्र असणारी वेगवेगळी

३० टपाल तिकिटे प्रसिद्ध केली; त्यात दादासाहेब फाळके, सत्यजित रे, मेहबूब खान, विमल रॉय यांसारख्या दिग्गजांमध्ये नर्गिस व मधुबाला या दोनच अभिनेत्रींचा समावेश आहे. या ३० टपाल तिकिटांच्या विक्रीमध्ये मधुबालाला मिळालेला प्रतिसाद हा तुफान असल्याचे टपाल सेवेचे सहायक संचालक डी. आर. लोखंडे यांनी सांगितले.

*** 'गजरा आणि इतर प्रहसने'**

'अभिनयाप्रमाणेच लेखनही स्वत:च्या आनंदासाठी न करता, वाचकसापेक्ष केल्यामुळे त्यांना निर्मळ आनंद देऊ शकलो.' गेली तीसहून अधिक वर्षे आपल्या चिमणरावांपासून गंगाधर टिपरेंपर्यंत बहुरंगी भूमिकांतून आणि तशाच लिखाणातून मराठी रसिकांना गुदगुल्या करणाऱ्या दिलीप प्रभावळकर यांनी आपल्या लिखाणामागचे रहस्य उलगडून दाखवले.

त्यांनी लिहिलेल्या 'चिमणरावांचा गजरा आणि इतर प्रहसने' या पुस्तकाच्या प्रकाशनानिमित्त सुरेशचंद्र पाध्ये यांनी प्रभावळकरांची मुलाखत घेतली. कार्यक्रमाला ज्येष्ठ लेखक द. मा. मिरासदार, व्यंगचित्रकार शि. द. फडणीस, आशयचे वीरेंद्र चित्राव, भारद्वाज प्रकाशनचे श्रीराम रानडे उपस्थित होते. चिमणरावांच्या निर्मितीबाबत बोलताना प्रभावळकर म्हणाले, ''मूळ चिं. वि. जोशी यांच्या लेखनावर आधारित असणाऱ्या या कथेला मी चालू काळाचा संदर्भ देण्याचा प्रयत्न केला. यासाठी विविध पात्रांच्या मूळ स्वभाववैशिष्ट्यांचा अभ्यास करून लेखन केले, सदाशिवपेठी, मध्यमवर्गीय सर्वसामान्य कुटुंबातील आणि शंभरातील एक वाटावा असा चिमणराव बदलत्या संदर्भामुळे प्रेक्षकांना अधिक भावला. १९७७ मध्ये सर्वप्रथम दूरदर्शनवरून प्रसारित झालेल्या या मालिकेला मिळालेल्या प्रतिसादामुळे चिमणरावांवरील लिखाणही घडत गेले.''

प्रभावळकरांनी रेखाटलेल्या व्यक्तिरेखा रसिकांना अधिक जवळच्या वाटतात, यावर बोलताना ते म्हणाले, ''लिखाण करताना मी प्रत्येक पात्रामध्ये स्वत:ला पाहून लिखाण करतो, अभिनयातही तेच तत्त्व अमलात आणल्यामुळे भूमिका अधिक जिवंत होतात. लहान मुले आणि वृद्ध या दोघांच्याही मानसिकतेचा अंदाज घेऊ शकल्याने त्यांच्यासाठी केलेले लिखाण त्यांना भावले.'' उंची, व्यक्तिमत्त्व अशा कोणत्याही बाबतीत गांधीजींशी साम्य नसताना, केवळ निरागस हास्याच्या जोरावर विधू विनोद चोप्रांनी मोठमोठ्या कलावंतांना डावलून 'लगे रहो मुन्नाभाई'साठी माझी निवड केली, असा रहस्यभेदही त्यांनी केला.

मिरासदार म्हणाले, ''ज्या लेखकांनी निर्माण केलेली पात्रे, वाचकांना आपल्यातीलच एक वाटतात, तो उत्तम विनोदी लेखक ठरतो. चिं. वि. जोशी आणि त्यांचाच आधार घेऊन प्रभावळकरांनी केलेल्या लिखाणातून याचा प्रत्यय येतो.'' व्यासंग आणि निरीक्षणशक्ती मोठी असल्यामुळे प्रभावळकर त्यांच्या कारकिर्दीत कोणत्याही भूमिकेत अडकून पडले नाहीत. स्वत:लाच शोधणारे, अस्वस्थ आणि कायम गुणवत्तेसाठी

झटणारे असे ते कलाकार आहेत, असे पाध्ये यांनी नमूद केले.

*** स्वत:मधील दीप प्रज्वलित करा**

प्रत्येकाने स्वत:ला ओळखले तर त्याचे जगणे सोपे होते. ज्यांनी स्वप्ने बघून ती प्रत्यक्षात उतरविण्यासाठी भरपूर प्रयत्न केले तेच जीवनात यशस्वी झाले आहेत. त्यामुळे नागरिकांनी स्वप्ने पाहिली पाहिजेत. स्वत:मधील दीप प्रज्वलित करून मोठे होण्याची स्वप्ने बघा, असे ज्येष्ठ पत्रकार विवेक घळसासी यांनी व्यक्त केले.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या लातूर येथील विवेकानंद संस्कार संस्था छात्रशक्ती निर्माण व संचालन समितीने प्रभाकरराव अयाचित यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त व्याख्यान आयोजित केले होते. ते म्हणाले ''प्रत्येक नागरिकाने चांगल्या पद्धतीने जगण्यासाठी स्वार्थी होऊन स्वत:वर प्रेम करायला आणि मनातला भाव समजायला शिकले पाहिजे. दुसऱ्याच्या संकल्पना नाकारायची हिंमत आवश्यक आहे. स्वप्ने बघून त्यांची प्रत्यक्षात अमंलबजावणी करण्यासाठी पडेल ते परिश्रम घेण्याची गरज आहे. दुसऱ्यांची ओझी घेतल्यामुळे आपण दु:खी आहोत,'' असे मत श्री. घळसासी यांनी व्यक्त केले.

परिपक्व स्वप्ने जगण्यासाठी पारंपरिक पद्धतीस फाटा द्यावा लागतो. स्वप्ने जगण्याची तयारी हवी, दिशा निश्चित करून प्रयत्न करायला हवेत. नियोजन आवश्यक आहे. प्रत्येक पावलावर धोका आहे. तो पत्करणारेच जीवनात मोठे होतात. नियमित परिश्रम, सातत्य, सचोटीने वागणारे व परावलंबी वृत्ती सोडणारेच आपली स्वप्ने वास्तवात आणतात. देशातील विषमता, दु:ख, दारिद्र्य, अंधश्रद्धा दूर करून स्वप्नातील भारताची उभारणी करा, असे आवाहन त्यांनी केले.

*** सी-डॅकची चार सॉफ्टवेअर बाजारात**

इंग्रजीतून मराठी, हिंदीसह इतर भारतीय भाषांत भाषांतर करणारे 'जी-क्लास' (गिस्ट क्रॉस लँग्वेजेस सर्च प्लग इन-सुट) सर्च इंजिन आणि 'इंटकँप', 'परमनेट-३' आणि 'टेकसंगम' ही चार नवीन सॉफ्टवेअर सी-डॅक संस्थेने लाँच केली.

माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रात आपली अत्याधुनिक संशोधनाची परंपरा कायम ठेवत सी-डॅकने २१ व्या वर्षांत पदार्पण केले.

'जी-क्लास' सर्च इंजिनाद्वारे इंग्लिशमधील शब्दांचे मराठी, हिंदी किवा इतर भारतीय भाषांमध्ये भाषांतर तसेच शुद्ध शब्द, समानार्थी शब्द, योग्य शब्द इतर भाषांतील शब्दांचे अर्थ सापडतात.

उद्योग आणि आयटी क्षेत्राला आवश्यक असलेले मनुष्यबळ आणि उपलब्ध मनुष्यबळ यामध्ये मोठी तफावत आहे. ही दरी दूर करण्यासाठी 'टेकसंगम-सी डॅक' प्रकल्पांतर्गत एमसीए, एमसीएसच्या अंतिम वर्षाला असलेल्या विद्यार्थ्यांकडून राष्ट्रीय स्तरावर 'सेमिनार' आणि 'आयटी' विषयावर प्रोजेक्ट तयार करून घेऊन

सर्वोत्कृष्ट पहिल्या प्रोजेक्टला १ लाख, दुसऱ्याला ७५ हजार, तिसऱ्याला ५० हजार आणि प्रोत्साहनपर पुरस्कार दिले जातील. गेल्या तीन वर्षांपासून सी-डॅकने अंतर्गत नेटवर्कसाठी सर्वांत जास्त स्पिड असणारे 'परमनेट-३' हे सॉफ्टवेअर तयार केले, तर मुंबई व गुवाहटी येथील आयआयटी कॉलेज आणि इंदूरचे एसजीएसआयटीएस कॉलेज यांनी मिळून इंटरकॉम सॉफ्टवेअरची निर्मिती केली.

*** 'रंगराव चौधरी'**

ग्रामीण भागातील सर्वसामान्य तरुण मुख्यमंत्री झाला तर? या कथासूत्रावर बेतलेला वैशाली फिल्म्स निर्मित 'रंगराव चौधरी' हा चित्रपट प्रदर्शित झाला आहे. संजय नार्वेकर याची चित्रपटात प्रमुख भूमिका आहे.

दीप्ती समेळ, ज्योत्स्ना जोशी, आनंद जोग, विजय चव्हाण, उषा नाईक, जयराम कुलकर्णी, पराग चौधरी आणि माजी आमदार पोपटराव गावडे यांनी चित्रपटामध्ये काम केले आहे. अजित शिरोळे यांनी दिग्दर्शन केले आहे. इलाही जमादार यांच्या गीतांना राहुल घोरपडे यांनी संगीत दिले आहे. बाळ भारस्कर यांची पटकथा आहे.

सातारा, पंढरपूर, औदुंबर तसेच पुण्यात संगमवाडी, ताथवडे आणि पिंपरी पालिकेच्या सभागृहात चित्रीकरण करण्यात आले आहे. मुख्यमंत्री हेलिकॉप्टरने कार्यक्रमाला येतात या दृश्याच्या चित्रीकरणासाठी ताथवडे येथे प्रत्यक्ष हेलिकॉप्टरचा वापर करण्यात आला. निर्माते रामदास भोसले यांनी ग्रामीण भागातील तरुणांना उद्योग-व्यवसायाबाबत या चित्रपटातून संदेश देण्यात आला आहे असे सांगितले.

*** मॉरिशसमध्ये समर्थांचे स्मरण**

श्री समर्थ रामदास स्वामींच्या चारशेव्या जयंतीनिमित्त मॉरिशसमधील मराठी मंडळींच्या 'श्री सद्‌गुरू सेवा मंडळा'च्या पुढाकाराने मॉरिशसमध्येही कार्यक्रम होणार आहे.

समर्थांचे विश्वव्यापी तत्त्वज्ञान आणि व्यावहारिक मार्गदर्शन, आदर्श मानवी जीवन कसे असावे, माणूसपण कसे जपावे यांचे समर्थांनी केलेले विवेचन चारशे वर्षांनंतरही अन्वर्थक आहे. विशेषतः तरुण पिढीपर्यंत त्यांचे विचार पोचावेत, या हेतूने मॉरिशसमध्ये बारा दिवसांचा भरगच्च कार्यक्रम आखला आहे. स्थानिक अभ्यासकांबरोबरच समर्थ विचारांचे इंग्रजीतून विवेचन करणारे महादेव आंबेकर आणि सुरेश पद्मनाभन यांनाही सदगुरू सेवा मंडळाने आमंत्रित केले आहे. ते समर्थांचा दासबोध, मनाचे श्लोक, करुणाष्टके तसेच अन्य साहित्यावर विचार मांडणार आहेत.

तसेच मॉरिशसमधील विविध ठिकाणी व्याख्याने, कार्यशाळा, स्पर्धा, पठण, पारायण, कीर्तन, प्रवचन आणि सादरीकरण अशा माध्यमांतून समर्थांचे स्मरण केले जाणार आहे.

*** 'सकाळ-एनआयई' उपक्रम - ३० हजार विद्यार्थ्यांचा सहभाग**

राज्यातील १६ जिल्ह्यांतून २३० शाळांत राबविल्या जाणाऱ्या न्यूजपेपर इन एज्युकेशन (एनआयई) या उपक्रमाची ७ एप्रिलला सांगता झाली. इयत्ता ६ व ७ वीच्या एकूण ३० हजार विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचा लाभ घेतला. शालेय अभ्यासक्रमाव्यतिरिक्त अनेक गोष्टी या निमित्ताने मुलांसमोर आल्या. चर्चा, गप्पा, क्षेत्रभटी, परिसंवाद, वादविवाद, सादरीकरण या माध्यमांतून रंगत जाणारे 'एनआयई' चे तास, त्यावर मुलांनी केलेले लिखाण व नंतर या सर्वांवर आधारित प्रकाशित झालेल्या 'सकाळ एनआयई' आवृत्तीचे मुलांनी राज्यभर वाचन केले.

कृष्णाजी खंडू विद्यालय (मांजरी), शां. बा. ढोले पाटील विद्यालय (ताडीवाला रोड) न्यू इंग्लिश स्कूल (वडगाव मावळ) येथे अभ्यासकौशल्ये या विषयावर डॉ. प्रदीप आगाशे यांनी मार्गदर्शन केले. अभ्यासात आवड निर्माण करण्यासाठी गाणी, गोष्टी यांचा वापर कसा करावा, यावर संवाद साधला; तर पक्षितज्ज्ञ अमित पावशे यांनी नागेश्वर विद्यालय (पाटस) व भैरवनाथ विद्यालय (भिगवण) येथील विद्यार्थ्यांना परिसरातील पक्षिजगताची ओळख करून दिली. नेहमी बघणाऱ्या पक्ष्यांबद्दलची वेगळी माहिती ऐकून विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली. हडपसरच्या साधना विद्यालयातील विद्यार्थ्यांना वनौषधींची ओळख करून देण्यात आली. नवी खडकी-येरवडा येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात वंदन नगरकर यांनी व्यक्तिमत्त्वविकासावर आधारित अनेक गोष्टी सांगितल्या व स्वत:त बदल कसा करावा, याबाबतची माहिती दिली. न्यू इंग्लिश स्कूल (शिरूर) येथे राहुल कोकीळ यांनी शिवचरित्रावर कथाकथन केले. यशवंतराव चव्हाण विद्यालय. बिबेवाडी येथे कचरा व्यवस्थापनावर कार्यशाळा घेण्यात आली.

शालेय वयात वाचनाची आवड वृद्धिंगत होऊन विद्यार्थी सजग बनावा, हा या उपक्रमाचा हेतू आहे. 'एनआयई' उपक्रम राबविणारे 'सकाळ' हे पहिले व एकमेव मराठी वर्तमानपत्र असून, महाराष्ट्रातील पुणे, मुंबई, महाड, कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, औरंगाबाद, नांदेड, परभणी, नगर, नाशिक, जळगाव, नागपूर, अमरावती व यवतमाळ या १६ शहरांतून सुमारे २३० शाळांमधून महाविद्यालयीन तरुणांच्या मदतीने हा उपक्रम राबविला जातो.

*** 'तांदळा'च्या निर्मात्यांकडून मराठी दिनदर्शिकेचे प्रकाशन**

'साकार क्रिएशन्स' प्रस्तुत 'जीवनराज फिल्म'निर्मित 'तांदळा - एक मुखवटा' या चित्रपटाच्या निर्मितीचे औचित्य साधून निर्मात्या माधुरी अशिरगडे यांनी काढलेल्या मराठी दिनदर्शिकेचे प्रकाशन 'सकाळ'चे संपादक यमाजी मालकर यांच्या हस्ते झाले. चित्रपटाचे दिग्दर्शक संजय सूरकर आणि माधुरी अशिरगडे यावेळी उपस्थित होत्या.

'तांदळा - एक मुखवटा' हा चित्रपट मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात प्रदर्शित होणार आहे. ज्येष्ठ पत्रकार सुरेश द्वादशीवार यांच्या 'तांदळा' या कादंबरीवर आधारित या चित्रपटाची पटकथा व संवादही त्यांचेच आहेत. या प्रसंगी श्री मालकर

म्हणाले, ''पुरुषत्व आणि स्त्रीत्व असा फरक करण्यापेक्षा ते परस्परपूरक आहेत, आणि फरकापेक्षा 'माणूसपण' जपण्याची प्रेरणा महत्त्वाची आहे 'माणूस' म्हणून जन्माला आल्यावर सुख-दु:खे येतातच. विरक्तीचा मार्ग प्रत्येकाला जमत नाही, त्यामुळे संसारात गुंतण्याचा आणि त्यातील नाती जपण्याचा पर्याय उरतो. माणसाकडे 'मुखवटे' न लावता निखळ माणूस म्हणून पाहणे आवश्यक आहे. नाती जपणे आणि परिसराशी जोडलेले असणे असा सहजीवनाचा संदेश तांदळा देतो.''

श्री. सूरकर म्हणाले, ''तांदळा मांडताना त्याचा आशय जपण्याचा प्रयत्न केला आहे. स्त्रीला 'माणूस' म्हणून न ओळखता कन्या, पत्नी, आई, बहीण अशा नात्यांनीच निर्देशिले जाते. 'माणूस' म्हणून तिचे काही म्हणणे मांडण्याचा हा प्रयत्न आहे.'' माधुरी अशिरगडे यांनी प्रास्ताविक केले. दिनदर्शिकेची संकल्पना आनंद अशिरगडे यांची आहे. सुनीता नाशिककर यांनी सूत्रसंचालन केले. ममता क्षेमकल्याणी यांनी आभार मानले.

### * विनोदाच्या फोडणीचा 'सख्खा सावत्र' फॅमिली ड्रामा

विनोदाच्या माध्यमातून प्रेक्षकांचे मनोरंजन करणारा 'फॅमिली ड्रामा' अरगडे डी. एस. एंटरटेनमेंटच्या बॅनरखाली 'सख्खा सावत्र' या नावाने अकरा एप्रिलपासून दाखल झाला. सावत्र आई आणि पत्नी यांच्या कचाट्यात सापडलेल्या मकरंद अनासपुरेची पंचाईत या चित्रपटातून दाखवली आहे. या सिनेमास्कोप चित्रपटाचे दिग्दर्शन राजेश पाटोळे यांचे आहे. मकरंदसह क्रांती रेडेकर, प्रिया अरुण, विजय चव्हाण, बालकलाकार आदेश, नूतन जयंत, मैथिली वारंग, भारत गणेशपुरे, ज्योती जोशी, प्रदीप कबरे आदींच्या भूमिका चित्रपटात आहेत. कथा-पटकथा डॉ. अवधूत बिचारे यांची तर संवाद प्रकाश भालेकर यांचे आहेत. गीते दीपक गायकवाड यांनी लिहिली असून, संगीत राम साळवे यांचे आहे.

अरगडे म्हणाले, ''पैशाच्या मोहापुढे नाती गौण ठरत जातात, हे दाखवण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे. मकरंदच्या जोडीला क्रांती आहे आणि सासूची भूमिका प्रिया अरुण यांनी ठसक्यात केली आहे.'' कथेविषयी ते म्हणाले, ''श्रीधर पाटील पत्नीच्या निधनानंतर दुसरे लग्न करतात. दुसऱ्या पत्नीचा भाऊ त्यांच्याकडे येतो आणि सख्खा-सावत्रचा संघर्ष सुरू होतो. पहिल्या पत्नीचा मुलगा राम (मकरंद) मोठा होतो आणि त्याची पत्नी घरातील या अन्यायाशी लढण्याचा निर्णय घेते. कथानकाला विनोदाची जोड दिल्याने चित्रपट धमाल उडवतो.''

### * माहिती अधिकाराने भ्रष्टाचार कमी

''माहिती अधिकारामुळे सरकारी कामातील भ्रष्टाचार पंधरा ते वीस टक्क्यांनी कमी झाला आहे'' असा दावा केंद्रीय माहिती आयुक्त प्रा. एम. एम. अन्सारी यांनी केला.

माहिती अधिकार कायद्याचा आढावा घेऊन त्याचा वापर आणखी परिणामकारक होण्यासाठी राज्यांच्या माहिती आयुक्तांच्या राष्ट्रीय समन्वय समितीची बैठक यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनीत (यशदा) झाली. राज्याचे माहिती आयुक्त सुरेश जोशी, पंजाबचे राजन कश्यप, कर्नाटकचे के. के. मिश्रा, हरियानाचे जी. माधवन व आंध्र प्रदेशचे सी. डी. आऱ्हा, माहिती आयुक्त विजय कुवळेकर या वेळी उपस्थित होते.

अन्सारी म्हणाले, ''माहिती अधिकार हा देशातील सर्वांत यशस्वी कायदा ठरला आहे. या कायद्याचा वापर बहुसंख्य नागरिकांनी करावा, यासाठी यातील अडचणी, त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत. नागरिकांनी निर्भयपणे कायद्याचा वापर केल्यास निधीचा वापर योग्य पद्धतीने होईल.''

या कायद्याच्या प्रभावी अंमलबजाणीसाठी नागरिकांनी mm.ansari@nic.in या ई-मेलवर सूचना पाठवाव्यात, असे आवाहन त्यांनी केले. नियोजनबाह्य कामांवर होणारा खर्च, शहरांमधील प्रदूषण अशी समाजोपयोगी माहितीही नागरिकांनी या कायद्याखाली विचारून सरकारी कामकाजावर देखरेख ठेवावी, असे पंजाबचे माहिती आयुक्त कश्यप यांनी सांगितले. या कायद्याबाबत प्रशिक्षण व जनजागृतीसाठी 'यशदा'ची निवड समितीने केली आहे. राष्ट्रीय पातळीवरील प्रशिक्षण कार्यक्रम 'यशदा'कडून तयार करून घेण्यात येणार आहे. नागरिकांना आवश्यक ती माहिती तातडीने उपलब्ध होण्यासाठी केंद्र व राज्य सरकारांनी त्यांच्याकडील कागदपत्रांचे व्यवस्थापन अद्ययावत पद्धतीने करावे, असे आवाहन समितीने केले आहे. केंद्रीय व राज्य माहिती आयोगाच्या वेबसाइट एकमेकांना संलग्न करणे, माहिती अधिकारासंबंधी तीन महिन्यांत राष्ट्रीय स्रोत केंद्राची स्थापना करणे आदी निर्णय घेतले.

### * 'निरोप'चा संदेश

''अतिशय गुंतागुंतीची पण मोकळ्या शेवटाची कथा 'निरोप' चित्रपटातून साकारली आहे. शहरी प्रश्नाचा वेध घेणारी आणि ग्रामीण संस्कृतीची झालर लाभलेली ही कथा माणूस हा बेटाप्रमाणे एकटाच असतो, हा संदेश देते.'' असे अपर्णा धर्माधिकारीनिर्मित 'निरोप' चित्रपटाचे दिग्दर्शक सचिन कुंडलकर यांनी सांगितले

आयुष्य घडविण्याकरिता परदेशात जाण्याची मिळालेली सुवर्णसंधी, मात्र जन्मगावापासून दूर जाताना मनात होत असलेली घुसमट हे या कथानकाचे सूत्र आहे. लग्नाचं, मैत्रीचं, ओळखीचं या नात्यातील अनेक रूपांना 'लेबल्स'न लावता एखाद्या कोड्यासारखं गूढ आणि चटकन न कळणारे नाते कसे असते, याविषयीची केवळ दोन दिवसांची ही घटना हळूहळू मनाचा वेध घेते.

श्री. कुंडलकर म्हणाले, ''नवी ओळख घेऊन सांस्कृतिक क्षेत्रात पिंपरी-चिंचवड स्वतंत्र ठसा उमटवत आहे. हा चित्रपट प्रेक्षक आनंदाने स्वीकारतील, असा विश्वास आहे.''

समीर म्हणाला, ''चित्रपट एकाच घटनेच्या धाग्यात गुंफला आहे, मी अतिशय

खुलेपणाने भूमिका साकारली. त्यासाठी पत्नी अपर्णाने दिलेली साथ लाख मोलाची ठरली.''

*** चायनीज व रशियन सायबर माफियांचा धुमाकूळ**

'इंटरनॅशनल स्कूल ऑफ कॉर्पोरेट मॅनेजमेंट'तर्फे आंतरराष्ट्रीय सायबर सुरक्षा दिवस साजरा करण्यात आला. 'माईल-ई-सिक्युरिटी'चे डॉ. प्रमोद दामले. कर्नल विजय नायर, केशव रे या वेळी उपस्थित होते.

विद्येचे माहेरघर असणारे पुणे शहर 'सायबर क्राइम'च्या बाबतीत देशाची राजधानी असल्याचे मत 'एशियन स्कूल ऑफ सायबर लॉज'चे अध्यक्ष रोहास नागपाल यांनी व्यक्त केले.

नागपाल म्हणाले, ''पुण्यात सायबर क्राइमच्या गुन्ह्यांत वाढ झाली आहे; परंतु एकूण गुन्ह्यांपैकी केवळ एक टक्का गुन्ह्याचीच 'सायबर सेल'कडे नोंद होते. अशा प्रकारामुळे कंपनीची बाजारातील पत कमी होऊ नये, म्हणून बऱ्याच गुन्ह्यांची नोंद केली जात नाही. सायबर सुरक्षेविषयी आता कंपन्या दक्ष झाल्या असून, त्याबाबत दक्षता घेण्याचे त्यांचे धोरण दिसून येत आहे; तसेच सायबर क्राइमचा धोका कंपनीपुरता मर्यादित नसून, तो देशालाही होऊ शकतो. संगणकावरून एखादी गोपनीय माहिती 'व्हायरस हॅक' करू शकतो, यामुळे लाखो डॉलरचे नुकसान होऊ शकते. शिवाय या कंपनीच्या विश्वासार्हतेला तडा जाऊ शकतो. सध्या चायनीज व रशियन सायबर माफियांनी धुमाकूळ घातला असून, ३२ हजार डॉलरला 'व्हायरस प्रोग्रॅम' तयार करण्याचे काम काही महाभाग करीत आहेत. काही व्हायरस तर संगणक बंद असतानाही प्रवेश करू शकतात व संगणक सुरू करता क्षणीच आपल्या संगणकावरील महत्त्वाची माहिती एका 'मेसेजद्वारे' 'हॅकर'कडे पोचवितात. यामुळे संगणक सुरक्षा ही काळाची गरज बनली आहे.''

लॅपटॉप व व्यक्तिगत संगणकामुळे या व्हायरसचा धोका व्यक्तिगत पातळीवर पोचल्याचे सांगून ते म्हणाले, ''आपल्या बँकेचा पासवर्डही 'हॅक' केला जाऊ शकतो. संगणक वापणाऱ्यांनी पायरेटेड संगणकीय प्रोग्राम न वापरता चांगल्या सॉफ्टवेअर कंपनीच्या प्रोग्रामचा वापर करावा; कारण पायरेटेड सॉफ्टवेअरमुळे व्हायरसचा धोका अनेक पटींनी वाढतो. त्यामुळे संगणक सुरक्षेबाबत सर्वांनीच दक्ष राहिले पाहिजे.''

*** चित्रकथी : जन्मदिनानिमित्त कार्यक्रम**

सदरलेखनातून वाचकांशी संवाद साधणारे व्यंकटेश माडगूळकर म्हणजे तात्या प्रत्यक्ष रंगमंचावरून श्रोत्यांशी संवाद साधतात, ही स्वप्नवत वाटणारी गोष्ट पुत्र मोहन माडगूळकर यांनी विविध कलाकृतींच्या रंगमंचीय आविष्कारातून प्रकट केली.

व्यंकटेश माडगूळकर प्रतिष्ठानतर्फे त्यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून, त्यांच्या ललित साहित्यावर आधारित 'चित्रकथी' हा कार्यक्रम सादर केला. यानिमित्ताने 'ऐसी

अक्षरे'च्या व्यंकटेश माडगूळकर विशेषांकाचे प्रकाशन ज्येष्ठ समीक्षक प्रा. रा. ग. जाधव यांच्या हस्ते झाले. ज्येष्ठ पत्रकार अनंत दीक्षित, प्रतिष्ठानचे अध्यक्ष सु. वा. जोशी, कार्यकारी विश्वस्त ज्ञानदा नाईक आणि बांधकाम व्यावसायिक समीर बेलवलकर या प्रसंगी उपस्थित होते.

'विनोदबुद्धी नसलेला माणूस', 'समचरणस्वामी' यांसारख्या लेखांवर आधारित नाट्यप्रवेशांच्या सादरीकरणातून त्यांच्या लेखनाचे पैलू उलगडले गेले. 'तुमच्या मनात असतं तेच लिहितो मी' असे म्हणणारे तात्या निवेदनाच्या माध्यमातून संवाद साधतात. कीर्ती शिलेदार आणि मराठी रंगभूमी संस्थेच्या कलाकारांनी 'पती गेले गं काठेवाडी' नाटकाची नांदी सादर केली. बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी 'परका' आणि 'सायकल' या त्यांच्या कथांवर आधारित एकांकिका प्रभावीपणे सादर केल्या.

प्रा. जाधव म्हणाले, ''दृक-श्राव्य गुणांनी संपन्न असे तात्यांचे साहित्य हा चिरंतन ठेवा आहे. त्यांच्याकडे प्राकृतिक जीवनदृष्टी होती. आपल्या वाङ्मयीन संकल्पनांची फेरतपासणी करण्यासाठी त्यांच्या साहित्याची सखोल समीक्षा झाली पाहिजे. एक प्रकारचा व्रतस्थपणा त्यांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये होता.'' ज्ञानदा नाईक यांनी प्रास्ताविक केले. वसू भगत यांनी आभार मानले. डॉ. माधवी मेहेंदळे यांनी सूत्रसंचालन केले.

### * स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास

स्वातंत्र्यासाठी लढताना शहीद होऊन ७७ वर्षे लोटल्यावर भगत सिंग यांच्याविषयी अधिक माहिती शोधण्यासाठी जवाहरलाल नेहरू युनिव्हर्सिटीत (जेएनयू) स्वतंत्र समिती नेमली जाणार असून त्यासाठी सरकारने दोन कोटींची तरतूद केली आहे.

भगतसिंग आणि त्यांच्या सहकार्यांनी केलेल्या प्रयत्नांचा आढावा घेऊन ब्रिटिशांविरोधी अन्य स्वातंत्र्य सैनिकांनी पुकारलेल्या लढ्याचे स्वरूप निश्चित करण्यात येईल.

### * 'क्रेझी फोर' वादात दोन कोटींचा समेट

'क्रेझी फोर' या चित्रपटातील पार्श्वसंगीत व दोन गाण्यांचे संगीत आपल्या चाली वापरून तयार केले असल्याच्या आरोपावरून मुंबई उच्च न्यायालयात आलेल्या वादात अखेर दोन कोटी रुपयांचा समेट झाला. गेल्या वर्षी सोनी एरिक्सन या मोबाईल कंपनीच्या जाहिरातीसाठी जी संगीत रचना तयार केली होती ती वापरून 'क्रेझी फोर' चित्रपटातील दोन गाण्यांना चाली लावण्यात आल्या आहेत असा आरोप करून या चित्रपटाचे प्रदर्शन रोखण्यासाठी राम संपथ यांनी दिवाणी दावा दाखल केला होता. त्यात चित्रपटाचे निर्माते राकेश रोशन व संगीत दिग्दर्शक राजेश रोशन यांच्यासह इतरांना प्रतिवादी केले गेले होते. या चित्रपटाच्या गाण्यांच्या कॅसेट, सीडी, डीव्हीडी इत्यादींचे हक्क सुपर कंपनीने २.५ कोटी रुपयांना विकत घेतले

होते. संपथ यांच्या दाव्यावर उभय पक्षांच्या वकिलांनी युक्तिवाद केल्यानंतर रोशन यांच्याकडून संपथ यांना २५ लाख रुपये देण्याचा प्रस्ताव करण्यात आला होता. परंतु ही रक्कम अगदीच अल्प आहे, असे म्हणून संपथ यांनी तो अमान्य केला होता. यानंतर न्या. डी. जी. कर्णिक यांनी अंतरिम आदेश देताना चित्रपटाचे प्रदर्शन रोखण्यास नकार दिला होता. मात्र हा चित्रपट प्रदर्शित करायचा असेल तर वाद असलेली चार गाणी वगळून प्रदर्शन करावे, असा आदेश त्यांनी दिला होता. याविरुद्ध द्विसदस्यी खंडपीठाकडे अपील करून स्थगिती एका दिवसात मिळवणे शक्य होणार नाही. तसेच वितरित केलेल्या फिल्मच्या सुमारे १०० प्रतींमधून वादग्रस्त चार गाण्यांचा फक्त साऊंड ट्रॅक काढून टाकणेही तांत्रिकदृष्ट्या शक्य नसल्याने अखेर समेट करण्याचे ठरले. समेटाचा मसुदा न्या. कर्णिक यांच्यापुढे सादर करण्यात आला. या समेटानुसार 'क्रेझी-फोर' च्या निर्मात्यांकडून संपथ यांना दोन कोटी रुपये दिले जातील. त्यांचे नाव श्रेयनामावलीत समाविष्ट केले जाईल आणि संगीताच्या रॉयल्टीमध्येही त्यांना वाटा मिळेल.

*** 'गोखले इन्स्टिट्यूट'ची ग्रंथसंपदा धोक्यात!**

गोखले अर्थशास्त्र संस्थेतील ग्रंथालयाच्या 'डिजिटायझेशन'चा प्रकल्प केंद्र गेल्या आठ वर्षांपासून कागदावरच राहिला आहे.

ग्रंथालयामध्ये सुमारे दोन लाख ७० हजार पुस्तके आहेत. त्यापैकी किमान २० टक्के पुस्तकांची अवस्था बिकट आहे. त्यांचे वेळीच 'डिजिटायझेशन' केले नाही, तर ती वाचविणे शक्य नाही. 'डिजिटायझेशन' आणि देखभालीच्या अत्याधुनिक प्रणालीसाठी केंद्र सरकारकडे सुमारे साडेतीन कोटी रुपयांचा प्रकल्प सादर करण्यात आला होता.

दहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये सुमारे एक कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. प्रत्यक्षात मात्र ती कागदावरच राहिली. त्या योजनेमध्ये ४३ लाख रुपये मिळाले खरे, पण त्यामधून केवळ तीन वर्षांचा खर्च भागविता आला. इतर कोणत्याही प्रकल्पांसाठी त्याचा वापर करणे शक्य झाले नाही. अद्ययावत नियतकालिके, पुस्तके घेण्यासाठी प्रतिवर्षी किमान दहा लाख रुपये खर्च करावे लागतात. त्यामुळे यापुढील काळात ग्रंथसंपदा रोडाविण्याची भीतीही व्यक्त करण्यात येत आहे.

केंद्र सरकारचे सांस्कृतिक खाते, इंडियन कौन्सिल फॉर सोशल सायन्स ॲण्ड रिसर्च, विद्यापीठ अनुदान आयोग, टाटा ट्रस्ट आदींकडे निधीसाठी आणि 'डिजिटायझेशन'साठी विचारणा करण्यात आली आहे.

*** नवनिर्मिती हवी**

वंश, धर्म, जात या समांतर चालणाऱ्या गोष्टी जोपर्यंत एकत्र येणार नाहीत तोपर्यंत 'समाज' तयार होणार नाही. असा समाज निर्माण करण्यासाठी मृत्युंजय

प्रतिष्ठानतर्फे आयोजित कार्यक्रमात डॉ. माशेलकर यांच्या 'पंचशील : नव्या युगाचे' या पुस्तकाचे प्रकाशन जेष्ठ संगणक तज्ज्ञ डॉ. विजय भटकर यांच्या हस्ते झाले. स्मिता देशपांडे, मृणालिनी सावंत आदी उपस्थित होते. डॉ. माशेलकर म्हणाले, "'अतुल्य भारत' मध्ये 'सर्वसमावेशक भारत' नसेल तर त्यात काय अतुल्य आहे? गेल्या दशकात भारत प्रचंड बदलला आहे. या बदललेल्या भारतासाठी 'व्यापकता, टिकाऊपणा आणि वेग' या तीन गोष्टी महत्त्वाच्या आहेत आणि त्या साध्य करण्यासाठी सार्वजनिक व खासगी क्षेत्र या दोघांनीही पुढाकार घेतला पाहिजे."

डॉ. भटकर म्हणाले, "डॉ. माशेलकर यांनी 'नवनिर्मिती' (इनोव्हेशन) भारतात रुजवली. त्याचबरोबर वैचारिक नेतृत्वही आणले. पुरंदरे म्हणाले, "आई, शिक्षक आणि साहित्यिक ही मुलांना स्वप्नं देण्याची माध्यमे आहेत. तर डॉ. माशेलकर यांचे पंचशील मनात उतरविण्याची माध्यमे वृत्तपत्रे आहेत." सागर देशपांडे यांनी प्रास्ताविक केले. स्मिता देशपांडे यांनी मनोगत व्यक्त केले.

डॉ. रघुनाथ माशेलकर अध्यक्ष असलेल्या 'नॅशनल इनोव्हेशन फाउंडेशन' या संथेतर्फे खेड्यापाड्यातून 'नवनिर्मिती' ला वाव देण्यासाठी अभिनव उपक्रम राबविला जात आहे. गावोगावी अशिक्षित व अप्रशिक्षित लोकांनी तयार केलेल्या उत्पादनांची व नवनिर्मितीची नोंद संस्थेतर्फे राष्ट्रीय स्तरावर केली जाते. आंध्र प्रदेश स्थित 'मॅट्रिक्स बायोसायन्स' या कंपनीला परवाना देण्यात आला. गुजरातच्या पोपटभाई रुपाभाई जंबूचा या अशिक्षित शेतकऱ्याने तयार केलेले बायो हर्बल उत्पादन 'इनोव्हेटर सीरिज' या प्रकल्पाखाली सर्वांना उपलब्ध होणार आहेत. अशा उपक्रमांमुळे गावपातळीवर काम करणाऱ्यांना आत्मप्रतिष्ठा आणि पैसा मिळेल, असा विश्वास माशेलकर यांनी व्यक्त केला. प्रत्येक भारतीय हा नवनिर्मितीकार आहे असे सांगून नवनिर्मिती करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने ०७९ २६७३२४५६ अथवा २६७३२०९५ या क्रमांकावर संस्थेशी संपर्क साधावा असे आवाहनही माशेलकर यांनी केले आहे.

*** गोखले इन्स्टिट्यूट लायब्ररीमध्ये प्रदर्शन**

सुमारे अडीच लाखांहून अधिक दुर्मिळ पुस्तके असणाऱ्या गोखले अर्थशास्त्र संस्थेच्या धनंजयराव गाडगीळ ग्रंथालयाला १०३ वर्षे पूर्ण होत असून १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धाच्या शतकोत्तर सुवर्णजयंती वर्षानिमित्त त्यावरील ग्रंथालयातील शंभरहून अधिक दुर्मिळ ग्रंथांचे आणि अहवालांचे प्रदर्शन १० एप्रिल ते १० मे दरम्यान आयोजित केले आहे.

प्रदर्शनाचे उद्‌घाटन भारत इतिहास संशोधन मंडळाचे चिटणीस आणि इतिहासाचे अभ्यासक श्री. मा. भावे यांच्याहस्ते झाले.

१८७२ पासून आजपर्यंत देशाच्या जनगणनेचे सर्व अहवाल या ग्रंथालयात आहेत. देशांचे तसेच राज्यांचे अर्थसंकल्प आणि विधिमडळाच्या कामकाजांचे समालोचन स्वातंत्र्यपूर्व काळापासून करण्यात आले आहे.

१८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धाची पार्श्वभूमी तसेच त्या काळातील ब्रिटिश गव्हर्नर जनरलचे अधिकृत अहवाल, ईस्ट इंडिया कंपनीचे तत्कालीन रिपोर्ट्स, याशिवाय त्या काळातील गुप्तचर विभागाची निरीक्षणे, ब्रिटिशांच्या दृष्टीने या बंडामागची कारणे, त्यावरील महत्त्वाचा पत्रव्यवहार, बंडाचा महत्त्वाचा पत्रव्यवहार, बंडाचा पश्चिम भारतावरील परिणाम लाहोरचा बादशहा महंमद बहादूरशहा यावरील खटल्याची कागदपत्रे, बंडाच्या आठवणी आणि त्याचे विश्लेषण यांचाही त्यात समावेश आहे.

या ग्रंथालयात गेल्या १०० वर्षांतील सुमारे दोन हजार नियतकालिकांचे ५० हजार खंड आहेत. अधिक महितीसाठी २५६०२८७ या नंबरवर संपर्क साधावा

## * भारतीय संगीताची बूज राखणारे संगीतच स्वीकारार्ह

शास्त्रीय संगीताचा बेस घेऊन सध्याचे कलाकार परफॉर्म करतात, नवे प्रयोग करतात. त्याबद्दल त्यांचे कौतुकही होते पण प्रयोग करणे म्हणजे दर्जेदार सादरीकरण नव्हे. भारतीय संगीताची बूज राखून सादर केलेले संगीतच स्वीकारार्ह आहे, असे मत ख्यातनाम गायिका किशोरी अमोणकर यांनी व्यक्त केले.

पारधी समाजात काम करणाऱ्या संवर्धन प्रतिष्ठानच्या मदतीसाठी १५ एप्रिलला षण्मुखानंद हॉलमधे किशोरी अमोणकर यांची मैफल झाली.

सध्याच्या संगीताविषयी त्यांनी खडे बोल ऐकवले. 'जिथे शुद्ध स्वर आहेत, तिथे माझे मन रमते. प्रसिद्धी मिळते म्हणून काही मी गाणार नाही. गाण्याशी माझे विचार संलग्न असतील, तेव्हाच मी गाईन. पैशापेक्षा मानसिक शांती हेच माझे ध्येये आहे,' असे त्या म्हणाल्या.

ताला-सूरांऐवजी फक्त वाद्यांचा ठणठणाट असतो तेव्हा स्वरयुक्त गाणे लोपते. स्वराला अत्यंत महत्त्व आहे. कारण ज्याला स्वरांची शक्ती समजते त्यालाच आयुष्यात विशिष्ट उंची गाठता येते, त्याच व्यक्तीला मन:शांतीचा अनुभव येतो. सध्याच्या संगीतात भारतीय संगीताला दुय्यम स्थान दिले गेले आहे. स्पर्धेमुळे अभिजात संगीताची हानी होत आहे. अशी खंतही त्यांनी बोलून दाखवली.

## * अहिल्यादेवींचे शिल्पस्वरूपातले चरित्र

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या चोंडी या जन्मगावाचा पर्यटनदृष्ट्या विकास करण्यासाठी माजी मंत्री अण्णासाहेब डांगे व कणेरीचे (कोल्हापूर) मठाधिपती काड्सिद्धेश्वरस्वामी प्रयत्नशील आहेत.

अहिल्यादेवींचे जीवनचरित्र शिल्पस्वरूपात साकारण्याची त्यांची कल्पना आहे. त्यासाठी त्यांनी चोंडी येथे शिल्पकारांसह भेट देऊन पाहणी केली.

कर्नाटकचे शिल्पकार विराण्णा जाणोपानटर व शरीफ मुद्देबीर तसेच धनगर समाज महासंघाचे श्रीराम पुंडे, बालाजी काकडे, अलकाताई गोडे, गणेश पुजारी, मल्हार सेनेचे सरसेनापती लहुजी शेवाळे यावेळी उपस्थित होते.

अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार दोन कोटी रुपयांमधून चोंडी येथे पर्यटक निवास, रस्ते, संग्रहालय, नक्षत्र उद्यान, जन्मघर गढी सुधारणा, सीनानदीकाठी पूरसंरक्षक भिंत, तसेच १०० फूट उंचीचे शिवलिंग उभारण्यात येणार आहे.

१० सप्टेंबर २००७ रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या पुण्यतिथीनिमित्ताने राज्याचे उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील यांनी चोंडीस भेट देऊन उर्वरित कामांना निधी देण्याची घोषणा केली होती.

### * ब्रह्मचैतन्य दिनदर्शिका

हिंदू संस्कृती तसेच मराठी भाषेच्या सबलीकरणाचा ब्रह्मचैतन्य परिमंडल या संस्थेचा उपक्रम स्तुत्य आहे, असे गौरवोद्‌गार विश्व हिंदू परिषदेचे सत्संग प्रमुख दादा वेदक यांनी काढले.

ब्रह्मचैतन्य परिमंडलाच्या तपपूर्तीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ब्रह्मचैतन्य हिंदू दिनदर्शिकेचे प्रकाशन सज्जनगडचे व्यवस्थापक मोहनबुवा रामदासी यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष दिलीप कुलकर्णी होते. प्रमुख विश्वस्त कमलाकर कुलकर्णी, सचिव अनुपमा कुलकर्णी, सल्लागार अशोक शाळू, सुधाकर डांगे, धनंजन बुडूख, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर कार्याध्यक्ष संजय उपासनी, चार्टर्ड अकाऊंटंट कौस्तुभ शहा आदी उपस्थित होते.

ब्रह्मचैतन्य परिमंडळाच्या तपपूर्तीनिमित्त संस्थेच्या स्थापनेत महत्त्वाचा सहभाग असणाऱ्या सदस्यांचा सत्कार करण्यात आला. याखेरीज ९० ऋषितुल्य ज्येष्ठ दांपत्यांनाही गौरविण्यात आले.

### * माहिती अधिकार प्रशिक्षण

माहिती अधिकाराच्या कायद्यात राष्ट्रीय पातळीवरील प्रशिक्षण कार्यक्रम आणि जनप्रबोधनाचा आराखडा तयार करण्यासाठी नोडल एजन्सी म्हणून यशदाची नेमणूक करण्याची शिफारस करण्यात आली आहे असे केंद्रीय माहिती आयुक्त एम. एम. अन्सारी यांनी सांगितले.

अज्ञान आणि प्रशिक्षणाचा अभाव या अडचणी दूर करण्यासाठी यशदाने प्रशिक्षण आणि जनप्रबोधन आराखडा तयार करावा. माहिती अधिकाराच्या स्थितीबाबत जनता, प्रसार माध्यमे यांच्याकडून सूचना मागण्वण्यात याव्यात, अशी शिफारस केंद्र सरकारकडे केली आहे.

राष्ट्रीय साधन केंद्र हे राज्य आणि केंद्रीय माहिती आयोगाच्या उपक्रमांच्या समन्वयाचे काम करणार असून हैद्राबाद येथील सेंटर फॉर गुड गव्हर्नन्स यांनी त्यासाठी प्रस्ताव सादर केला आहे. केंद्रीय आणि राज्य माहिती आयोगांच्या संकेत स्थळांना जोडणारे राष्ट्रीय पोर्टल तयार करण्याचा निर्णय समितीने घेतला आहे.

### * 'मराठी माणसाला जग फिरता यावे'

''मराठी उद्योजक देशात सर्वत्र उद्योग वाढवितो याचा आपल्याला आनंद आहे. त्यामुळे मराठी माणसाला जग फिरता यावे'' असे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे संस्थापक अध्यक्ष राज ठाकरे यांनी केसरी टूर्स अॅन्ड ट्रॅव्हल्सच्या पुण्यातील नव्या कार्यालयाचे उद्घाटन करताना म्हटले.

राज यांच्या पत्नी शर्मिला ठाकरे, महापौर राजलक्ष्मी भोसले, केसरी टूर्सचे केसरी पाटील, वीणा पाटील, अभिनेता आदेश बांदेकर, दाजीकाका गाडगीळ आदींची यावेळी उपस्थिती होती.

केसरी टूर्सच्या पुणे कार्यालयाच्या झेलम पाटील आणि मुंबई कार्यालयाचे हिमांशू पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

*** मीडियाने 'ऑटिझम'बद्दल जागृती करावी**

'ऑटिझम'ची माहिती सर्वसाधारण डॉक्टरांपर्यंत पोहोचलेली नाही. तेव्हा आता मीडियानेच त्याबाबत जागरुकता निर्माण करावी असे आवाहन क्रिकेट समालोचक हर्ष भोगले यांनी केले.

ऑटिझमग्रस्त मुलांच्या पालकांची 'फोरम फॉर ऑटिझम' ही संघटना स्थापन झाली आहे. डेव्हलपमेंटल पिडिअॅट्रिशिन डॉ. विभा कृष्णमूर्ती, 'आशियाना' ही ऑटिस्टिक मुलांसाठीची शाळा चालवणारे आयटी तज्ज्ञ अच्युत गोडबोले, 'तारे जमीं पर'चे क्रिएटिव्ह डिरेक्टर अमोल गुप्ते, ऑटिस्टिक मुलांच्या जीवनावरील 'अपना आसमान' चित्रपटाचे निर्माते व रिलायन्सचे मार्केटिंग कम्युनिकेशन अध्यक्ष कौशिक रॉय, ऑक्युपेशनल थेरपिस्ट अश्विनी वैशंपायन हेही यावेळी उपस्थित होते.

संयुक्त राष्ट्रांनी २ एप्रिल हा दिवस 'जागतिक ऑटिझम जागरूकता दिन' म्हणून घोषित केला आहे.

'दर १५० मुलांमध्ये एकाला ऑटिझमची बाधा आढळून येते. या भयावह समस्येबद्दल आपल्याकडच्या साधारण डॉक्टरांमध्येही पुरेशी जागरूकता नाही. दिल्ली हायकोर्टाने फेब्रुवारी २००७ मध्ये एम.डी. च्या अभ्यासक्रमात 'ऑटिझम'चा समावेश करण्याचा आदेश दिला. पण सर्वसामान्य लोक एमडी डॉक्टरांकडे किंवापिडिअॅट्रिशियन्सकडे न जाता बहुधा सर्वसाधारण डॉक्टरांकडेच जातात. तेव्हा 'ऑटिझम'चा समावेश एमबीबीएसच्या, शिक्षकांच्या किंवा स्पीच थेरपिस्टांच्या अभ्यासक्रमात का नाही, असा सवाल डॉ. कृष्णमूर्ती यांनी केला.

'वेगळ्या क्षमता असलेल्या या मुलांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलण्याची व आपली जीवनशैली तपासून पाहण्याची गरज आहे,'' असे अमोल गुप्ते यांनी सांगितले.

*** लहानग्यांसाठी 'फन कम कुकबुक'**

वैविध्यपूर्ण पाककृतींसाठी तरला दलाल हे नाव प्रसिद्ध आहे. झटपट आणि

पौष्टिक पदार्थ बनवण्यात त्या चांगल्याच पारंगत आहेत. नुकतेच त्यांनी दोन वर्षांच्या मुलांसाठी 'प्ले अ‍ॅण्ड लर्न अ‍ॅक्टिव्हिटी प्लस कुकबुक फॉर टूज' हे अनोखे पुस्तक आणले आहे. या पुस्तकाचं वैशिष्ट्य म्हणजे यात लहानग्यांना आवडतील अशा सोप्या पाककृती दिल्या आहेत. त्याचबरोबर मुलांसाठी छोटेमोठे खेळही दिले आहेत. हे खेळ कल्पक असल्याने मुलांच्या विकासासाठी नक्कीच उपयोगी आहेत. यात दिलेल्या सर्व पाककृती पौष्टिक आहेत. आईला चिंता करण्याची गरज नाही. उदा. पोटॅटो ग्रीन कॉइन्स, सिग्नल चिला, अ‍ॅपल हनी पॅनकेक, बनाना वॉलनट क्राऊन्स, पायनॅपल अ‍ॅण्ड कॉटेज चीज सॅण्डविचेस.

*** 'एक डाव संसाराचा' चित्रपट प्रदर्शित**

'एक डाव संसाराचा' या चित्रपटाचा विषय चाकोरीबाहेरचा वा आव्हानात्मक आहे असा चित्रपट बनविण्यासाठी धाडस लागते असे मत चित्रपटाचे पटकथाकार, दिग्दर्शक संजय सूरकर यांनी व्यक्त केले.

चिंचवड येथील अ‍ॅडलॅब या चित्रपटगृह संकुलामध्ये 'एक डाव संसाराचा' या चित्रपटाचा 'प्रिमियर शो'पूर्वी ते बोलत हाते. निर्मात्या करुणा संजय ह्या चिंचवडमधील राहणाऱ्या असल्याने या चित्रपटाचे पिंपरी-चिंचवडकरांसाठी पुन्हा एकदा प्रिमीयर शोचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कलाकार संदीप कुलकर्णी, डॉ. हेमंत हुईलगोळकर, रणधीर नहार (टोनी), हवेलीचे आमदार विलास लांडे, महापालिका आयुक्त दिलीप बंड आदी उपस्थित होते.

ते म्हणाले की, या चित्रपटाचा विषय समोर आल्यानंतर आम्ही त्याच्यावर सुमारे चार महिने विचार केला. वेगळ्या विषयांचे चित्रपट पाहण्यासाठी प्रेक्षक मोठ्या चित्रपट गृहसंकुलामध्ये खर्च करण्याची तयारी दर्शवितो. आपला चित्रपट पाहणाऱ्या प्रेक्षकांची मानसिकता ओळखून चित्रपटाची निर्मिती करणे आवश्यक आहे. आयुक्त दिलीप बंड यांनी चित्रपटाची निर्मिती अत्यंत सुरेख असल्याचे सांगितले.

*** डॉ. शोभना गोखले - वय वर्षे ८१**

संशोधनासाठी केलेली डोंगर दऱ्यातील भटकंती... शिलालेखांचे वाचन करून पुरातन काळाचा शोधलेला इतिहास... नाणेघाट असो की कान्हेरीचा आदिवासी भाग.

अशा पन्नास वर्षांत केलेल्या संशोधनाचा इतिहास डॉ. शोभना गोखले यांनी ८१ व्या जन्मदिवसानिमित्त भारत इतिहास संशोधक मंडळ आणि अरण्यवाक आयोजित सत्कारप्रसंगी उलगडून दाखवला. कल्पना रायरीकर आणि मंजिरी भालेराव यांनी त्यांची यावेळी मुलाखत घेतली.

१९६० नंतरच्या संशोधनाच्या आठवणींना स्लाईड शोद्वारे उजाळा देण्यात आला. अध्यक्षस्थानी डेक्कन कॉलेजचे कुलपती डॉ. गो. बं. देगलूरकर होते.

लग्नानंतर शिकण्याची इच्छा, त्याला सासूबाईंसह कुटुंबियांनी दिलेल्या पाठिंब्यामुळे

मिळविलेली पीएचडी आणि नंतर डॉ. सांकलिया यांचे मिळालेले मार्गदर्शन याची माहिती त्यांनी दिली. १९७४ साली रांजणगाव येथे सापडलेल्या नाण्यांच्या आठवणी सांगताना त्या म्हणाल्या, ''रांजणगाव येथे अठराशे नाणी सापडली. ती नाणी जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वाधीन करण्यात आली. अभ्यासासाठी ती मागितली असता केवळ आठ दिवसांसाठी त्यांनी नाणी माझ्याकडे दिली. त्यामुळे आठ दिवसांत अठराशे नाण्यांचा दिवसरात्र अभ्यास केला. ही घटना आयुष्यात महत्त्वाची ठरली. त्यानंतर इंदोरला एक सराफाकडील नाण्यांमध्ये दुर्मिळ नाणे सापडले. त्याच्यावर काळाचा उल्लेख असल्याचे आढळून आले.''

मिशीगन विद्यापीठाच्या एका विद्यार्थिनीस कान्हेरीच्या आदिवासी भागात गेल्यावर २६ शिलालेखांचे दगड उलटे असल्याचे आढळून आले. त्यावर आचार्यांची नावे, त्यांचे गुणविशेष यांची माहिती आढळून आली असे सांगून पाच रुपयांसाठी एक आदिवासी महिलेचा खून झाल्याची आठवण त्यांनी सांगितली. संशोधनात अनेकवेळा यशाबरोबर अपयश आल्याचे सांगत संशोधनावरील दोन पुस्तके प्रकाशित होत असल्याचे डॉ. गोखले म्हणाल्या.

डॉ. इरावती कर्वे यांच्यासह डॉ. गोखले यांनी सांस्कृतिक इतिहासात मार्मिक गोष्टींचे उत्खनन केले असे डॉ. देगलूकर यांनी म्हटले.

### * भाषेसाठीही स्वतंत्र प्रयोगशाळा

रसायनशास्त्र, भौतिक शास्त्र आणि जीवशास्त्र यांच्यासाठी प्रत्येक शाळा व महाविद्यालयांमध्ये स्वतंत्र प्रयोगशाळा असतात. समाज हीच समाजशास्त्राची प्रयोगशाळा असते. पण आता खास भाषेसाठीही स्वतंत्र प्रयोगशाळा उभ्या राहू लागल्या आहेत.

आपल्याकडे पूर्वीपासून भाषांच्या अध्ययनाकडे फारसे लक्ष दिले गेले नाही. शाळांमध्ये भाषेचे विषय हे गौण समजले जायचे. पण आता काळ बदलला आहे. मातृभाषेबरोबर इतर भाषांनाही तेवढेच महत्त्व प्राप्त झाले आहे.

अभिनव एज्युकेशन सोसायटीच्या शाळेत अशा प्रकारची भाषा प्रयोगशाळा नुकतीच सुरू झाली आहे. पहिलीपासून ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना या प्रयोगशाळेत भाषेचे प्रात्यक्षिकासह ज्ञान दिले जाते. या प्रयोगशाळांची रचना ही एखाद्या रेकॉर्डिंग रूमसारखी दिसते. वीस विद्यार्थी प्रयोगशाळेत बसू शकतात. प्रत्येक विद्यार्थ्यांच्यासमोर स्टुडंट युनिट ठेवले जाते व युनिटमध्ये स्पीकर आणि कानाला हेडफोन बसविण्यात आलेले आहे.

सर्व स्टुडंट युनिटचे नियंत्रण प्लॅटफॉर्मवर मास्टर कंट्रोल सिस्टिममधूनल होते. सिस्टिमच्या साहाय्याने शिक्षक प्रत्येक विद्यार्थ्यांशी संवाद साधतात. काही शंका असल्यास स्टुडंट युनिटवरील एक बटण दाबून इतर विद्यार्थ्यांना कुठलाही त्रास न होता तो थेट शिक्षकांशी संवाद साधू शकतो. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थी हा शिक्षकांशी स्वतंत्रपणे संवाद करू शकतो. या यंत्रणेमुळे गटचर्चा किंवा तोंडी परीक्षा घेणे सुलभ झाले आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांकडे स्वतंत्र लक्षही देता येते.

शब्दसंपदा वाढविणे किंवा भाषेवर प्रयोग करून विद्यार्थ्यांमध्ये संभाषण कला वाढविण्यासाठी या यंत्रणेचा खूप फायदा होतो, अशी माहिती भाषा प्रयोगशाळेचे प्रमुख रवींद्र जाधव व विनोद बंगाळे यांनी दिली. प्रत्येक इयत्तेसाठी विद्यार्थ्यांसाठी ही प्रयोगशाळा खुली आहे. इंग्रजीचे वर्गही या प्रयोगशाळांमधून घेतले जाणार आहेत.

### * रेशनकार्ड होणार 'स्मार्टकार्ड'!

बोगस रेशनकार्डे वापरून होणाऱ्या फसवणुकीला आळा घालण्यासाठी महाराष्ट्रातील एक कोटी रेशनकार्डे तीन वर्षांत 'कम्प्युटराइज्ड' होणार आहेत.

केंद्रीय अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी आपल्या बजेटच्या भाषणात सार्वजनिक वितरण प्रणालीतील गैरप्रकारांबाबत चिंता व्यक्त केली होती. या पार्श्वभूमीवर कम्प्युटराइज्ड रेशनकार्ड योजना लागू करणारे महाराष्ट्र हे देशातले पहिले राज्य ठरले आहे. राज्याच्या अन्न व नागरी पुरवठा खात्याने ही योजना 'स्पॅको टेलिसिस्टिम्स अँड सोल्युशन्स लि.' या खासगी कंपनीकडे सोपवली असून यासंदर्भातील करारावर स्वाक्षऱ्या झाल्याचे स्पँकोचे अध्यक्ष कपिल पुरी यांनी सांगितले.

'स्पँको'ने योजनेसाठी मास्टेक या सॉफ्टवेअर कंपनीशी भागीदारी केली असून दोन्ही कंपन्या धान्यवितरणाचे नवे सॉफ्टवेअर विकसित करणार आहेत यासाठी एक हजार कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जाईल. योजनेअंतर्गत फूड कॉर्पोरेशनच्या गोदामांमधून येणाऱ्या मालाची राज्यातील गोदामात साठवणूक करतानाही कम्प्युटराइज्ड नोंदणी होणार आहे.

### * 'साधना'चे नवे कार्यालय

विठोबा जोरी यांची ९२६ सदाशिव पेठ असा पत्ता सांगणारी एकमजली वास्तू प्रभाकर विनायक प्रधान यांनी विकत घेतली. या घटनेला सहा एप्रिलला ७० वर्षे पूर्ण झाली. त्याचे सध्याचे मालक ज्येष्ठ समाजवादी विचारवंत प्रा. गणेश प्रभाकर उर्फ ग. प्र. प्रधान यांनी कायदेशीर बक्षीसपत्र तयार करून ती वास्तू 'साधना साप्ताहिका'चे संपादक डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्याकडे १ एप्रिल रोजी सुपूर्त केली.

मोहन धारिया, डॉ. बाबा आढाव, डॉ. श्रीराम लागू, प्रा. रा. ग. जाधव, डॉ. अनिल अवचट, शंकर सारडा, माधव वझे, रझिया पटेल, अरुणा ढेरे या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होते.

'इदं न मम' या तत्त्वाने ८५ वर्षांच्या प्रधान सरांनी त्यांना आजवर मिळालेले सर्व मानसन्मान याच वास्तूत ठेवून हडपसर येथील रुग्णालयात महात्मा गांधींचा फोटो आणि तुकोबांची गाथा एवढीच 'संपत्ती' सोबत बाळगली आहे, असे गौरवोद्गार दाभोळकरांनी काढले.

१०० वर्षांपेक्षाही अधिक जुन्या असणाऱ्या या वास्तूमध्ये एक छान हौद असून पूर्वी त्याला परटाचा वाडा असेही म्हणत असत. पुढे आपल्या वडिलांनीच त्यावर

एक मजला चढवला, असे त्यांनी सांगितला. १९४२ची चले जाव चळवळ आणि १९७५ मधील आणीबाणीत तुरुंगवास भोगलेल्या प्रधान सरांनी सांगितले की या दोन्ही वर्षांमध्ये पोलिसांनी या वाड्याची संपूर्ण झडती घेतली होती! ही विद्यासंपन्न वास्तू ध्येयवादी पत्रकारितेला वाहिलेल्या 'साधने'च्या ताब्यात देताना अतिशय आनंद आणि अभिमान वाटतो, अशी भावना प्रधान सरांनी व्यक्त केली. 'वास्तविक, आमच्या दोघांच्याही पश्चात ती द्यावी असे ठरले होते. पण आपल्या हयातीत देण्यातच खरे औचित्य आहे अशी भूमिकाही त्यांनी यावेळी मांडली.

### * पडद्यावरील चमत्कार ही संगणकाची करामत : मुकेश खन्ना

'पडद्यावरील चमत्कार ही संगणकाची करामत असते' असे सांगून व्यसनांपासून दूर राहून स्वत:तील आंतरिक शक्तीला साद घातली, तर तुम्हीही शक्तिमान होऊ शकाल, असा सल्ला 'शक्तिमान फेम' मुकेश खन्ना याने छोट्या मित्रांना दिला.

डॉ. धनसिंग चौधरी लिखित 'संमोहन उपचार : एक वरदान' या पुस्तकाच्या पाचव्या आवृत्तीचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. प्रा. इ. डी. पाटील, डॉ. एस. आर. म्हात्रे, डॉ. किशोर पवार यावेळी उपस्थित होते. खन्ना यांनी 'शक्तिमान' मधील 'होता है जब आदमी को आपना ग्यान; कहलाता है वो शक्तिमान' या ओळींचा आशय स्पष्ट करून सांगितला. मेंदूच्या क्षमतेवर विश्वास ठेवून काम करण्याचा सल्ला त्यांनी यावेळी दिला. खन्ना यांनी त्यांच्या गाजलेल्या भीष्माच्या भूमिकेतून मिस्किलपणे थोरांना आशीर्वाद दिले, तर 'शक्तिमान'च्या भूमिकेतून लहानांना सल्लेही दिले. लहान मुलांना आपल्या शरीराविषयी व विविध अवयवांच्या कार्याविषयी माहिती व्हावी, यासाठी वर्षभरात एक पुस्तक लिहिणार असल्याचे खन्ना म्हणाले.

चौधरी म्हणाले. ''संमोहन विद्या नसून, एक शास्त्र आहे. याद्वारे मानसिक आजार, एकाग्रता, थायरॉईडसारखे रोग व इतर अनेक प्रकारच्या व्याधींवर उपचार करता येतात.'' रवी खरे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. एस. एन. पाटील यांनी आभार मानले.

### * 'आयटी'द्वारे २० लाख जणांना रोजगार मिळाला

''व्यापक विकासासाठी 'आयटी' उद्योगांना लहान शहरांपर्यंत नेण्याचे आमचे आव्हान देशातील माहिती तंत्रज्ञान क्षेत्रासमोर आहे'' असे प्रतिपादन 'नॅसकॉम'चे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. गणेश नटराजन यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र ज्ञान मंडळ (एमकेसीएल) आणि उत्कर्ष प्रकाशनातर्फे आयोजित करण्यात आलेल्या 'देवांग' मेहता स्मृती व्याख्यानमालेत 'माहिती तंत्रज्ञान क्षेत्रासमोरील आव्हाने' या विषयावर त्यांनी आपले विचार मांडले.

व्यासपीठावर ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर, 'एमकेसीएल'चे व्यवस्थापकीय संचालक विवेक सावंत, संगणकतज्ज्ञ डॉ. अच्युत गोडबोले, दीपक शिकारपूर, उत्कर्ष प्रकाशनचे सुधाकर जोशी, उमा गणेशन, समीर पांडे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमात शिकारपूर यांच्या 'सायबर जीनियस' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

डॉ. नटराजन म्हणाले, 'फक्त २० वर्षांत देशातील 'आयटी' क्षेत्राचा विकास झाला. एवढ्या कमी कालावधीत देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या सहा टक्के वाटा या क्षेत्राचा झाला आहे. प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रोजगार मिळाला आहे. मात्र, ठराविक शहरांमध्येच 'आयटी'चा जम बसल्याने देशाच्या इतर भागांना या क्षेत्राचे फायदे होऊ शकत नाहीत.' नवनिर्मिती, सामाजिक जोडणी, सर्वसमावेशकता, महिलांना योग्य संधी या क्षेत्राचे सर्वसामान्यांपर्यंत प्रसार ही आव्हाने येत्या दहा वर्षांत या क्षेत्रासमोर आव्हाने असतील असेही त्यांनी यावेळी सांगितले.

डॉ. भटकर म्हणाले, ''मातृभाषेतून अधिक प्रभावी शिक्षण देता येत असल्यामुळे, संगणकाच्या प्रणाली आणि वापरामध्येही मराठीच्या वापराचा विकास करणे आवश्यक आहे.'' डॉ. गोडबोले म्हणाले, ''सध्या जाणवणाऱ्या मंदीचा या क्षेत्राला धोका नाही, ही मंदी जर सौम्य स्वरूपाचीच राहिली, तर भारतीय उद्योगाला फायदाच होण्याची शक्यता आहे.''

### * शंकर अभ्यंकर यांचे बारा ग्रंथ

विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर यांच्या आदित्य प्रतिष्ठान या संस्थेने नुकताच रौप्यमहोत्सवी वर्षाचा टप्पा पूर्ण केला. त्यानिमित्त प्रतिष्ठानतर्फे गुढी पाडव्याच्या दिवशी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अभ्यंकर यांनी हिंदूधर्म व संस्कृतीवर लिहिलेल्या बारा ग्रंथांचे या कार्यक्रमात प्रकाशन करण्यात आले.

या कार्यक्रमाला 'सकाळ'चे संपादक यमाजी मालकर, बेळगावचे श्रीकाका महाराज, नाशिकच्या गोखले एज्युकेशन सोसायटीचे कार्यवाह अप्पासाहेब गोसावी, ज्येष्ठ सराफ व्यावसायिक दाजीकाका गाडगीळ उपस्थित होते.

या प्रसंगी बोलताना अभ्यंकर म्हणाले, ''जगातील सर्व संस्कृतींमध्ये हिंदू संस्कृती अत्यंत प्राचीन व गौरवशाली आहे. हिंदू धर्म आणि संस्कृतीचा उच्चार वेदांमध्ये तसेच स्मृतिग्रंथांमध्ये आहे. रामायण, महाभारत, भागवतादी पुराणामध्ये सदाचार आहे आणि प्राचार्य, संत वाङ्मयात साक्षात्कार आहे. हे पुढील पिढ्यांना कळावे, यासाठी प्रतिष्ठानच्या माध्यमातून कार्य सुरू आहे. गेल्या पंचवीस वर्षांत संस्थेने 'लोकशिक्षण आणि संस्कृती संवर्धन' हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून तीनशेपेक्षा जास्त प्रवचनमाला सादर केल्या. पन्नासहून अधिक ग्रंथांची निर्मितीही केली. संस्थेच्या 'वैश्विक संत भारती' विद्यापीठाच्या निर्मितीचेही काम सूर आहे.''

अभ्यंकर यांनी 'तुकारामांची अमृतवाणी' हा अभंग गायन आणि निरुपणासह सादर केला.

### * सोळा चरित्र पुस्तकांचे प्रकाशन

''अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या आणि सकारात्मक बाजूने उभे राहिलेल्या महान

वीरांची चरित्रे आजच्या पिढीला आदर्श ठरतील,'' असे मत इतिहास अभ्यासक पांडुरंग बलकवडे यांनी व्यक्त केले.

'विद्यार्थी प्रकाशन' तर्फे पं. कृष्णकांत नाईक लिखित सोळा ऐतिहासिक चरित्र पुस्तकांचे प्रकाशन बलकवडे यांच्या हस्ते झाले.

बलकवडे म्हणाले, ''महान वीरांची चरित्रे सोप्या भाषेत लिहून नाईक यांनी उत्तम काम केले आहे. विद्यार्थीमित्रांना त्यातून प्रेरणा मिळेल. या पुस्तकांत शिवप्रभूंचे साथीदार आहेत. पेशवाईच्या काळातील वीरपुरुष आहेत आणि स्वातंत्र्यलढ्यातील तेजस्वी वीरांचाही मागोवा त्यांनी घेतला आहे.''

या पुस्तकांमध्ये बाजी पासलकर, बहिर्जी नाईक, तानाजी मालुसरे, बाजीप्रभू देशपांडे, मुरारबाजी देशपांडे, फिरंगोजी नरसाळा, येसाजी कंक, दौलतखान, थोरले बाजीराव पेशवे, थोरले माधवराव पेशवे, नाना फडणीस, मल्हारराव होळकर, महादजी शिंदे, कान्होजी आंग्रे, तात्या टोपे आणि बापू गोखले या वीरांच्या चरित्रांचा समावेश आहे.

## * भाषांतरही वाचकाला आवडावे

साहित्यात तत्कालीन काळ, समाज, व्यक्तिजीवन प्रतिबिंबित झालेले असते. भाषांतरात हे सारे सामावून घेणारे वातावरण आणि सुगंध वाचकाला अनुभवता आला पाहिजे, असे मत ज्येष्ठ कवी, अनुवादक गुलजार यांनी व्यक्त केले.

'मनोविकास प्रकाशन' आणि 'कलासक्त' यांच्या सहकार्याने आयोजित कार्यक्रमात ते बोलत हाते. 'दुसऱ्या जोडीदाराच्या शोधात' ही एव्हा हेलरलिखित जर्मन भाषेतील बेस्ट सेलर कादंबरी विद्यासागर महाजन यांनी अनुवादित केली आहे. पाच महान रशियन लेखकांच्या कथा आणि लघुकादंबऱ्या अनघा भट यांनी 'पुष्किनपासून चेखव्हपर्यंत' या नावाने अनुवादित केल्या आहेत. जपानी भाषेतील लघुलघुकथा हा साहित्यप्रकार निसीम बेडेकर यांनी 'बोकोच्चान आणि इतर जपानी कथा' या नावाने नावाने मराठीत आणला आहे. या तीनही थेट अनुवादांचे प्रकाशन गुलजार यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव हाते. 'कॉन्स्युल जनरल ऑफ फेडरल रिपब्लिक ऑफ जर्मनी'चे वाल्टर श्टेषेल आणि 'रशियन कल्चरल सेंटर'चे संचालक आंद्रे नझार्किन यावेळी उपस्थित होते. 'कलासक्त'चे विद्यासागर महाजन यांनी या भाषांतर प्रकल्पाची माहिती दिली. प्रकाशक अरविंद पाटकर यावेळी उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले, ''मराठी, बंगली आणि मल्याळम भाषांचा अपवाद वगळता अन्य भाषांत बालसाहित्याची निर्मितीच होत नाही. इतिहासापेक्षा साहित्याने मूळ भाषा, संस्कृती, लोकजीवन अधिक थेटपणे व्यक्त केले आहे. ते अतिशय जबाबदारीने दुसऱ्या भाषेत नेण्याचे काम करणारा अनुवादक मूळ लेखकाच्या वेदनाही नव्याने अनुभवतो, याचा प्रत्यय मी कुसुमाग्रजांच्या कवितांचा अनुवाद करताना घेतला आहे.''

डॉ. जाधव यांनी पुणे विद्यापीठात 'ट्रान्सलेटर्स ॲकॅडमी' (अनुवाद अकादमी) सुरू करण्यासाठी अर्थसंकल्पात विशेष तरतूद केल्याची माहिती दिली.

*** शंकरराव खरात यांचे समग्र साहित्य प्रसिद्ध करणार**

ज्येष्ठ साहित्यिक शंकरराव खरात यांचे समग्र साहित्य पुणे विद्यापीठातर्फे प्रसिद्ध करण्याची घोषणा कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांनी केली.

खरात यांच्या सातव्या स्मृतिदिनानिमित्त खरात यांनीच लिहिलेल्या 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय विचार' या पुस्तकाचे प्रकाशन त्यांनी केले. ज्येष्ठ समाजवादी नेते भाई वैद्य अध्यक्षस्थानी होते. श्रीमती डॉ. शकुंतला खरात, इंद्रायणी साहित्यचे प्रकाशक श्याम कोपर्डेकर, डॉ. अरविंद नेरकर व्यासपीठावर उपस्थित होते. खरात यांची साहित्यसंपदा पुणे विद्यापीठाने प्रसिद्ध करावी आणि खरात अध्यासनही या सुरू करावे, अशी अपेक्षा श्रीमती खरात यांनी व्यक्त केली. त्यांच्या भाषणाचा धागा पकडून, डॉ. जाधव यांनी अध्यासन सुरू करण्याबरोबरच समग्र खरात साहित्यही प्रसिद्ध करण्याची घोषणा या वेळी केली. ते म्हणाले, ''पुणे विद्यापीठाचे बंद असलेले मुद्रणालय आता नव्या स्वरूपात आणि अद्ययावत होत असून, ते ऑक्सफर्डच्या धर्तीवर असेल.''

भाई वैद्य यांनी दोन ज्येष्ठ दलित साहित्यिकांमध्ये अण्णा भाऊ साठे यांच्याबरोबर खरात यांचे नाव घ्यावे लागेल, असे सांगितले.

*** नांदेडला वातानुकूलित ग्रंथदालन**

अभंग पुस्तकालय, नांदेड या ललित व संदर्भग्रंथ विक्रीच्या उपक्रमास नुकतीच दोन वर्षे पूर्ण झाली आहेत. विक्री करतानाच वाङ्मयीन अभिरुची तसेच वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी वाचक, लेखक, प्रकाशक तसेच विविध संस्थांकडून आश्वासक प्रतिसाद मिळण्यासाठी वेगवेगळे उपक्रम व कार्यक्रम घेण्यात येतात. दोन वर्षातील अनुभवाची ही शिदोरी घेऊन तिसऱ्या वर्षात पदार्पण करताना 'अभंग ग्रंथदालन' ही नवी शाखा येत्या २३ एप्रिलपासून सुरू करण्यात आली आहे.

नांदेड शहराच्या मध्यवर्ती भागातील जनता मार्केट (शिवाजीनगर, नांदेड) संकुलात सुरू झालेल्या या नव्या दालनात स्पर्धा परीक्षांची पुस्तके, व्यक्तिमत्त्व विकास आणि विविध विषयांतील माहितीपर पुस्तकेही उपलब्ध असतील. ग्रंथदालन वातानुकूलित आहे. वाचकाला काही वेळ बसून पुस्तकांचे अवलोकन करता येईल, अशा प्रकारचे मराठवाड्यातील हे पहिलेच ग्रंथदालन आहे.

*** ग्रंथायनाची महत्त्वाकांक्षा**

२३ एप्रिल हा जागतिक वाचक दिन म्हणून साजरा होतो. जगातील सर्वश्रेष्ठ नाटककार विल्यम शेक्सपियर यांचा हा जन्मदिवस; म्हणून त्या दिवशी जगभरच्या

वाचकांचा गौरव करण्याचा सोहळा साजरा होतो. आपले ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कविवर्य कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस २७ फेब्रुवारी हा आपण जागतिक मराठी दिवस म्हणून साजरा करतो ना, तशातलाच हा प्रकार.

या वाचकदिनानिमित्त खरे तर गावोगाव वाचक मेळावे व्हायला हवेत; ग्रंथप्रदर्शनांची रेचलेच हवी, कविसंमेलने, कथाकथने वगैरे कार्यक्रम व्हावेत.

याच दिनाचे औचित्य साधून मराठीतील एक नव्या दमाचे कथाकार पंकज कुरुलकर यांनी महाराष्ट्रातील ३५ जिल्ह्यातील ३५३ तालुक्यात पुस्तकांचे मार्केटिंग करण्यासाठी ग्रंथायन हा उपक्रम सुरू करण्याचे ठरवले आहे. कुरुलकर हे संगणकक्षेत्रातील एक यशस्वी व्यावसायिक आहेत आणि हार्डवेअर सॉफ्टवेअरमध्ये कोट्यवधींची त्यांची उलाढाल चालते. मराठी पुस्तकांच्या प्रसाराची आणि प्रसिद्धीची निकड त्यांना जाणवते; त्यासाठी कॉलसेंटर्स, वेबसाईटस्, एसएमएस, ई-मेल, वृत्तपत्रे, मासिके, दूरचित्रवाणी वगैरे माध्यमांचा वापर पुस्तकांच्या मार्केटिंगसाठी करण्याची त्यांची योजना आहे प्रत्येक तालुक्यात व जिल्ह्यात अधिकृत विक्रीकेंद्र फ्रँचाइजीच्या तत्त्वावर सुरू करून पुस्तके वाचकाच्या घरी पोचवण्याची त्यांची जिद्द आहे. दिल्ली, कलकत्ता, गोवा, इंदूर, बडोदा, हैद्राबाद, बेळगाव वगैर शहरांध्येही ते ही केंद्रे सुरू करण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यासाठी सर्व प्रकाशकांकडून पुस्तकांची माहिती ते घेत असून उपलब्ध पुस्तकांची सूची वेबसाइटवर घेत आहेत...

मराठी माणूस मार्केटिंगमध्ये कमी पडतो असे आपण म्हणतो. पंकज कुरुलकर हे याला अपवाद ठरावेत अशी आपण प्रार्थना करू या. मराठी पुस्तके घरोघर नेणारा माणूस म्हणून इतिहासाने त्यांची नोंद घ्यावी - असे कर्तृत्व त्यांच्या हातून घडो.

(ग्रंथायन, ४१६ हिरेन इस्टेट, मोगल लेन, माहीम, मुंबई १६ - फोन २४४७३३१७)

❐

## चुकीची दुरुस्ती

एप्रिल ०८ च्या अंकात पुस्तक परिचयमध्ये 'मोहतरम्मा ते अम्मा' यात 'चीपर बाय द डझन' या अनुवादित पुस्तकानंतर बऱ्याच वर्षांनी सुधा गोखले यांचे 'मोहतरम्मा ते अम्मा' हे दुसरे पुस्तक आले आहे असा उल्लेख आला आहे.

'चीपर बाय द डझन' ह्या पुस्तकाचा अनुवाद मंगला निगुडकर यांनी केलेला आहे. त्या ऐवजी ब्लॅक इज ब्युटिफुल असे हवे होते. सुधा गोखले यांचे ते पहिले पुस्तक होते.




# रंगांधळा

## रत्नाकर मतकरी

किंमत १५० रु. पोस्टेज २५ रु.

मध्यरात्री त्याला अचानक जाग आली, ती कसल्यातरी 'खळ्ळ्' आवाजाने. अंधारातच त्याने खोलीभर नजर फिरवली. आणि एक गोष्ट लक्षात येऊन, त्याच्या छातीत धस्स झाले! आवाज झाला होता, तो दरवाजाच्या कडीचा. त्याने पक्की लावलेली कडी आपोआप निघाली होती.
–आणि दार सावकाश उघडू लागले होते....
जागच्या जागी खिळल्यासारखा, जगन्नाथ ते दृश्य पाहत राहिला. दारात एक जख्ख म्हातारा उभा होता.
बोडका. लांबुडक्या डोक्याला तुळतुळीत टक्कल पडलेले, चेहरा सुरकुत्यांनी मढलेला. गालाची हाडे वर आलेली, आणि अस्थिपंजर शरीर. डोळे मात्र निखाऱ्यासारखे चमकत होते. नजर जगन्नाथवर रोखलेली होती. जगन्नाथने किंकाळी मारली, पण ती ओठातून बाहेर फुटलीच नाही. त्या बोडक्या म्हाताऱ्याने त्याला आपल्याबरोबर चलण्याची खूण केली. जगन्नाथ चालू लागला. खरेतर त्याला जायचे नव्हते, पण स्वतःच्या इच्छाशक्तीवर जणू त्याचा ताबाच राहिलेला नव्हता. ....सर्व शक्ती एकवटून तिथून पळून जावे, असे वाटत होते, पण मनाचे सांगणे पाय मानत नव्हते. कुठे निघाले होते ते दोघे?

मेहता पब्लिशिंग हाऊस,



# विशेष वार्ता

**मेहता पब्लिशिंग हाऊस फाउंडेशनचे**
**'स्वामी'कार पद्मश्री रणजित देसाई पुरस्कार जाहीर**

'स्वामी, श्रीमानयोगी, राधेय' अशा मराठी साहित्यविश्वात मानदंड मानल्या जाणाऱ्या ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिणारे लोकप्रिय कादंबरीकार 'कै. रणजित देसाई' यांच्या स्मरणार्थ, 'मेहता पब्लिशिंग हाऊस फाउंडेशन' तर्फे प्रतिवर्षी 'स्वामीकार रणजित देसाई स्मृती पुरस्कार' दिले जातात. हे पुरस्कार उत्कृष्ट साहित्य निर्मिती करणाऱ्या लेखकांच्या साहित्याचे अभ्यासपूर्ण वाचन करून दिले जातात. यंदा या पुरस्काराचे 'नववे' वर्ष आहे.

प्रख्यात लेखक **उत्तम कांबळे** यांना **'आई समजून घेताना' (प्रकाशक-लोकवाङ्मय गृह, मुंबई.)** या आत्मकथनपर पुस्तकासासाठी रु. ६०००/- रोख.

विजय नाईक यांना **'त्रिकोण' (प्रकाशक-मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.)** या कादंबरीसाठी रु.५०००/- रोख. आणि प्रसिद्ध अनुवादक **अशोक पाध्ये** यांना **'ए कॉल टू ऑनर' (प्रकाशक-मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.)** या जसवंतसिंग यांच्या आत्मचरित्राच्या अनुवादासाठी रु.५०००/- रोख. असे या पुरस्कारांचे स्वरूप आहे.

दरवर्षी ८ एप्रिलला पुरस्कार सोहळा संपन्न होतो. परंतु या वर्षी काही अडचणीमुळे फक्त पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. लवकरच पुरस्कार वितरण होईल.



उत्तम कांबळे



विजय नाईक



अशोक पाध्ये

या पुरस्कारासाठी कोणत्याही प्रकारे पुस्तकांची मागणी करण्यात येत नाही. तर फाऊंडेशनतर्फे पुस्तकांची खरेदी करून ती निवड समितीस दिली जातात. व खरेदी केलेली पुस्तके रणजित देसाई ग्रंथालय कोवाड येथे जमा केली जातात, अशी माहिती मेहता पब्लिशिंग हाऊस फाऊंडेशनचे सल्लागार श्री. अनिल मेहता यांनी दिली.

**'स्वामी'कार रणजित देसाई पुरस्काराने गौरविलेले इतर मानकरी**

मधु मंगेश कर्णिक (संधिकाल), रवींद्र ठाकूर (महात्मा), माधव मोर्डेकर (भारतीय राजकारणातील गुन्हेगारी व भ्रष्टाचार), श्रीनिवास कुलकर्णी ( कोरडी भिक्षा), रंगा मराठे (फॅक्टरी गेट), लीना सोहनी (आय्. सी ८१४ अपहरणाचे १७३ तास ), दक्षिण महाराष्ट्र साहित्यसभा कोल्हापूर, डॉ. कुमार सप्तर्षी (येरवडा विद्यापीठातील दिवस), अंजनी नरवणे ( गहाण पडलेली टेकडी ), ह. मो. मराठे (मधलं पान), महादेव मोरे (चेहऱ्यामागील चेहरे), उमा कुलकर्णी (महाश्वेता), अंबरीश मिश्र (गंगेमध्ये गगन वितळले), प्रमोद जोगळेकर (टाइमलाइन), यशोधरा भोसले (बंजाऱ्याचे घर), प्रसन्नकुमार पाटील ('जबाला ते मेधा'), मृणालिनी गडकरी ('काबुलीवाल्याची बंगाली बायको), सुरेश वसंत नाईक ('या सुखांनो'), संदीप खरे (मौनाची भाषांतरे), रणजित मिरजे (दक्षिणायन), अपर्णा वेलणकर (लेडिज कूपे), डॉ. रवी बापट (वॉर्ड नंबर पाच केईएम), प्रा. डॉ. सुनीलकुमार लवटे (खाली जमीन वर आकाश), सुप्रिया वकील (लिव्हींग हिस्ट्री).

❐



# विशेष वार्ता

## ‘बारबाला’ आत्मचरित्राचे प्रकाशन

“लेखन ही कुणाची जहागिर नाही. तेव्हा ज्याच्याकडे शब्दभांडार आहे किंवा ज्याला लिहिता येतं त्यानंच लिहिले पाहिजे, असे नाही. तर जो जगतोय, जो अनुभवतोय, तो लिहू शकतो. आणि जेव्हा अशी पुस्तके लिहिली जातात तेव्हाच जीवनाचा अस्सल गंध अनुभवता येतो,” असे विचार सुप्रसिद्ध सिनेदिग्दर्शक महेश भट यांनी व्यक्त केले. वैशाली हळदणकर लिखित ‘बारबाला’ या आत्मचरित्राचे प्रकाशन मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे महेश भट यांच्या हस्ते करण्यात आले.

“चित्रपटात अभिनय असतो, ॲक्शन असते; पण जिवंतपणा कमी असतो. जेव्हा अशी खरीखुरी कहाणी चित्रपटात येते तेव्हाच तिच्यात काहीतरी नवेपणा आणि जिवंतपणा येतो. जेव्हा असा एखादा अनुभव ती व्यक्ती स्वत: आपल्या भाषेतून मांडते तेव्हा त्याचा समाजावर उचित परिणाम होतो,” असे भट म्हणाले.

सुमारे सोळा वर्षे बारबाला म्हणून काम केलेल्या वैशाली हळदणकर यांनी पुस्तक लिहिण्यामागची आपली भूमिका आणि पुस्तक लिहिताना आलेले अनुभव संगितले. “बारबाला म्हटल्यावर समाजाचा त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो. पण शेवटी आम्हीही माणसेच आहोत आम्हालाही चारचौघांसारखे जगावेसे वाटते. बारगर्लचे काम सोडण्याची इच्छा कित्येक बारबालांना आहे; पण प्रत्येकीलाच तशी संधी मिळते, असे नाही. काही संस्कार, पद्धती आम्ही बारमध्येही पाळतो. बारमध्येही गाताना आम्ही गणपतीच्या स्तवनानेच गाण्याची सुरुवात करतो,” असे सांगून ‘ओंकार प्रधान रूप गणेशाचे’ हे गीत त्यांनी या वेळी



**'बारबाला' पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी**
**(डावीकडून) वर्षा काळे, महेश भट व वैशाली हळदणकर.**

गाऊन दाखवले.

वैशालीने लिहिलेल्या अनुभवांमध्ये समाजातील अनेक 'थोर पुरुषां'च्या नावाचे उल्लेख होते. त्याचप्रमाणे त्यातील काही घटना या खूप वैयक्तिक होत्या आम्ही टाळल्या, अशी माहिती या पुस्तकाचे संपादक अविनाश पंडित यांनी दिली. 'भारतीय बारगर्ल्स युनियन'च्या अध्यक्ष वर्षा काळे यांनी पुस्तक निर्मितीचा प्रवास सांगितला.

---





## बारबाला

**वैशाली हळदणकर**

बारमध्ये गाऊन
लोकांचं मन रिझवणाऱ्या
एका बारबालेचं
आत्मकथन...

**किंमत २००रु. पोस्टेज २५रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस,**



## दखल

# ग्रंथालयाचे नवे रूप

ग्रंथालय म्हटले की पुस्तकांची कपाटे एवढेच दृश्य डोळ्यांपुढे उभे राहते. कपाटांमध्ये एकापुढे एक खेटून उभी असणारी, बाइंडिंगमुळे सारखीच दिसणारी पुस्तके... अनेकदा आपले मूळचे व्यक्तिमत्त्व गमावून बसलेली, पाने जीर्णशीर्ण झालेली ही पुस्तके जसजशी हाताळून जुनी होत जातात, तसतशी दुर्मिळ वा संदर्भ ग्रंथांचा दर्जा प्राप्त करून घेऊन बंदिस्त होतात. वाचकांना ती दुरावतात. कळकट कपाटे, कोंदट अंधार, वर्षानुवर्षे न झटकलेली धूळ असे जुनाट वातावरण आणि वाचनालय यांची सांगड आपल्या मनात असते.

ग्रंथालय म्हणजे ग्रंथांचे संग्रहस्थळ, वाचनालय म्हणजे वृत्तपत्रे, मासिके पुस्तके वाचण्यासाठी मिळविण्याचे केंद्र हा आपला आजवरचा समज आता कालबाह्य होतो आहे. ग्रंथालयात ग्रंथांनाच प्राधान्य असते; परंतु आता लायब्ररीत ऑडिओ-व्हिडिओ कॅसेट्स, डीव्हीडी, व्हीसाडी, नकाशे, चित्रपट, संगणक, सीडी प्लेअर, इंटरनेट यासर्वांना स्थान मिळत आहे; आणि ग्रंथालयाला ज्ञानाचे केंद्र, माहिती तंत्रज्ञानाचे केंद्र, रंजनाचे स्थळ म्हणून नवी ओळख प्राप्त होत आहे. कुठल्याही विषयावरची अद्ययावत माहिती मिळवण्यासाठी आता ग्रंथालयांचा वापर करण्यावर भर देण्यात येत आहे आणि केवळ वाचनासाठी ग्रंथालयाकडे जाण्याची प्रवृत्ती मागे पडत आहे.

नव्या तंत्रज्ञानामुळे ग्रंथालयांच्या स्वरूपात आमूलाग्र बदल घडत आहे.

ज्ञान-माहिती मिळवण्याचे साधन म्हणजे पूर्वी ग्रंथांना महत्त्व होते. आता ज्ञान मिळवण्यासाठी सीडी, डीव्हीडी, इंटरनेट, विकिपिडिया, ब्लॉग्ज वगैरेंचा वापर करण्याकडे तरुणांचा कल वाढतो आहे. पूर्वी छापील ज्ञानकोश किंवा विश्वकोश बघावा लागे,

आता इंटरनेटवर 'विकिपिडिया'सारख्या संकेत स्थळावर जाऊन हव्या त्या विषयाची माहिती मिळवता येते. विकिपिडिया हा ऑनलाइन एनसायक्लोपीडिया गेल्या आठदहा वर्षात ज्ञानाचे प्रचंड भांडार बनला आहे. त्यावर वीस लाख नोंदी किंवा लेख-टिपणे उपलब्ध आहेत आणि रोज त्यात हजारो नोंदींची भर पडत आहे. लायब्ररीत जाऊन पाचदहा हजार पुस्तके चाळण्यासारखेच हे काम आहे.

ग्रंथालय म्हणजे या पुढच्या काळात आपल्या गावातले ज्ञानकेंद्र असणार आहे. तेथे पुस्तके आणि मासिके, वृत्तपत्रे तर असतीलच. शिवाय शेकडो संगणक असतील. डीव्हीडी, सीडी, व्हिडिओ, कॅसेट्स असतील. तेथे संगीत ऐकता येईल. चित्रपट वा व्हिडिओ सीडीज् बघता येतील. पुस्तके निघत राहतील. परंतु मल्टिमिडियाच्या मार्गाने अन्य साधनांद्वारे ज्ञान आणि माहिती मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होत राहील.

मी गेल्या वर्षी वॉशिंग्टन युनिव्हर्सिटीचे ग्रंथालय बघायला गेलो होतो. तेथे अडीच कोटीवर पुस्तके व इतर दस्तऐवज, कागदपत्रे, संदर्भसाहित्य उपलब्ध होते. शेकडो संगणक होते. इंटरनेट सुविधा होती. त्यामुळे आपल्याला हव्या त्या विषयावरचे संदर्भ शोधून काढणे सहज शक्य होत होते. ''ही लायब्ररी जगातील कोणाही अभ्यासकाला मुक्तपणे वापरता येईल.'' असे तिच्या माहितीपत्रकात आरंभीच म्हटलेले आहे. अमेरिकेत अशी मोठमोठी ग्रंथालये बहुतेक विद्यापीठांची आहेत. शहरोशहरीही पालिका-महापालिकांची अनेक ग्रंथालये आहेत.

तेथे रोज येणाऱ्या वाचक अभ्यासकांची संख्याही प्रचंड असते. पुस्तकांसाठी वर्गणी नसते. फक्त उशिरा पुस्तके परत केल्यास दंड भरावा लागतो.

ज्ञानाचा प्रसार करण्याचे प्रभावी माध्यम म्हणून यापुढच्या काळात ग्रंथालयांचे जाळे भारतभर पसरायला हवे.

**शंकर सारडा**


**'मेहता पब्लिशिंग हाऊस'**च्या नवीन पुस्तकांची माहिती, नवनवीन योजना आणि ताज्या घडामोडी कळविण्यासाठी आपला E-mail ID आमच्याकडे हवाच!

**Email : info@mehtapublishinghouse.com**

आपले **E-mail ID** 'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या वरील **E-mail ID** वर कळवा.

# दखल

## सिंगापूरच्या टपाल तिकिटावर मिरजेचे सतीश शहा

मिरज येथील टपाल तिकीट संग्राहक सतीश शहा यांचे छायाचित्र असलेले एक डॉलरचे टपाल तिकीट सिंगापूर सरकारने प्रसिद्ध केले आहे. असा मान मिळविलेले सतीश शहा हे एकमेव टपालतिकीट संग्राहक आहेत.




**मिरज येथील टपाल तिकीट संग्राहक सतीश शहा यांचे छायाचित्र असणारे टपाल तिकीट सिंगापूर सरकारने प्रसिद्ध केले आहे.**

टपालतिकीट संग्राहकासाठी आणि पर्यटकांसाठी सिंगापूरच्या टपाल खात्याने सुरू केलेल्या या नवीन उपक्रमांतर्गत संग्राहकाला आपले छायाचित्र प्रसिद्ध करता येऊ शकते. सिंगापूरमधील प्रत्येक विमानतळावर तेथील टपाल खात्यामार्फत स्वतंत्र कक्ष उभारण्यात आला आहे. या कक्षामध्ये सिंगापूर टपाल खात्यामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या टपाल तिकिटांची, टपाल साहित्यांची विक्री

सुरू असते.

चांगाई विमानतळावरील टपाल खात्याच्या कक्षामध्ये आपला फोटो दिल्यास छायाचित्र असलेले तिकीट मिळू शकते. हे टपाल तिकीट व्यवहारातही वापरता येते.

शहा यांच्याकडे १८७० पासूनची भारतातील तिकीटे, दुर्मिळ तिकीटे आहेत. बेगम अख्तर, राजकुमार शुल्क, गुरू ग्रंथसाहिब, वॉटर बर्डस् यांसारखी तिकीटे, महात्मा गांधी यांची तिकीटे, पिल्ट्री कव्हर्स, मेघदूत कार्डस, एअर इंडिया कव्हर्स, मिनीएचर शीट टपाल तिकीटे तसेच नाणी, नोटा त्यांची माहिती असणारी पुस्तकेही आहेत. व्यवसायाच्या व्यस्त दिनक्रमातून त्यांनी हा छंद जोपासला आहे.


www.mehtapublishinghouse.com

**प्रत्येक पुस्तकाची सविस्तर माहिती असलेली संपूर्णपणे मराठी असलेली वैशिष्ट्यपूर्ण वेबसाईट.**

**आत्तापर्यंत १,५०००० ग्राहकांनी साईटला भेट दिली आहे!**

कॅलिफोर्निया, व्हर्जिनिया, न्यूजर्सी, वॉशिंग्टन, न्यूयॉर्क, विस्कोसिन, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, युनायटेड किंग्डम, हाँगकाँग, सिंगापूर, तैवान, युनायटेड अरब अमिराती, जर्मनी , चीन, कोरिया, स्वीडन, फ्रान्स, कुवेत,नेदरलॅण्डस, जपान, इस्त्रायल, आयरलॅण्ड इत्यादी जगातील विविध भागांबरोबरच भारतात व महाराष्ट्रात ही साईट सर्वाधिक लोकप्रिय ठरली आहे.

**आमच्या वेबसाईटची ठळक वैशिष्ट्ये**

- लेखकांच्या नावांनुसार, वाङ्मयप्रकारानुसार, पुस्तकाच्या नावानुसार इंग्रजी स्पेलिंगद्वारा 'सर्च'करण्याची सुलभ सुविधा.
- पुस्तकांची संपूर्ण यादी अकारविल्हे पाहण्याची सोय
- प्रत्येक पुस्तकाचे संपूर्ण स्वरूप स्पष्ट करणारी, पुस्तकाचा सारांश तसेच पुस्तकातील निवडक भाग व वृत्तपत्रीय परीक्षणे या स्वरूपातील सविस्तर माहिती
- नवीन पुस्तकांची माहित ई-मेलद्वारा त्वरित पाठवण्याची तत्पर सेवा
- आमच्या सवलत योजनांची सविस्तर माहिती
- क्रेडिट कार्डद्वारा ऑनलाइन शॉपिंगची सुविधा

www.mehtapublishinghouse.com

आजच भेट द्या.
व आपली मागणी नोंदवा.

## पुस्तक परिचय

# थैलीभर गोष्टी




सुधा मूर्ती
अनु. लीना सोहोनी



**सु**धा मूर्ती या आजच्या एक बेस्टसेलर लेखिका म्हणून ओळखल्या जातात. 'इन्फोसिस'च्या स्थापनेसाठी स्वत:चे दहा हजाराचे दागिने देणाऱ्या आणि भारताच्या माहिती तंत्रज्ञानक्षेत्रासाठी नवी क्षितिजे खुल्या करणाऱ्या नारायण मूर्ती यांच्या पत्नी म्हणून त्यांची प्रतिमा जनमानसात आहेच; परंतु त्यापेक्षाही अधिक प्रभावी अशी जी त्यांची प्रतिमा आहे ती 'इन्फोसिस फाउंडेशन'च्या अध्यक्ष म्हणून समाजोपयोगी कामांना दिलेल्या कोट्यवधींच्या निरलस निधीमुळे आणि त्यांच्या लेखनकर्तृत्वामुळे आहे.

कर्नाटकात त्यांनी गाव तिथे ग्रंथालय ही कल्पना राबवून शेकडो वाचनालये सुरू केली. तिथे उत्तमोत्तम पुस्तके उपलब्ध करून दिली. होतकरू तरुणांना शिष्यवृत्त्या दिल्या. वसतिगृहांच्या सोयी मिळवून दिल्या... त्यांच्या अस्तित्व, महाश्वेता, डॉलरबहू या कादंबऱ्या समकालीन समाजाच्या आशाआकांक्षांचे आणि घुसमटून टाकणाऱ्या समस्यांचे प्रांजल चित्रण करणाऱ्या ठरल्या. वाइज अँड अदरवाइज, गोष्टी माणसांच्या, पुण्यभूमी भारत या पुस्तकातील अनुभवकथनही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वेगवेगळे पैलू प्रकट करणारे ठरले. त्यातील समाजवास्तवाचे भान हे सद्य:कालीन बदलत्या मानसिकतेवर प्रकाश टाकते. नात्यानात्यातील नव्या भावबंधनांमधील दुरावे टिपते. त्यामुळे वाचकांना त्या अनुभवांबद्दल आत्मीयता वाटते. सुधा मूर्ती मूळ लेखन कानडी किंवा इंग्रजीमध्ये करतात. त्याची भाषांतरे मराठी, हिंदी, तेलगू वगैरे भाषांमध्ये लगोलग होतात.

त्यांच्या विविध भाषांमधील प्रकाशित पुस्तकांच्या संख्येने शतक झळकवले असून थैलीभर गोष्टी आणि सुकेशिनी ही मराठी पुस्तके शतकोत्तर वाटचालीतील आरंभीची ठरली आहेत.

सुकेशिनी आणि थैलीभर गोष्टी ही पुस्तके लोककथा, अद्भुतकथा, परीकथा दंतकथा यांची आहेत. प्रत्येकात चाळीस-बेचाळीस गोष्टी आहेत. बालांप्रमाणेच प्रौढ वाचकांनाही या पुस्तकांमधल्या गोष्टी खिळवून ठेवतील अशा आहेत. स्वत:च्या जीवनातले अनुभव आणि किस्से सुधाताईंनी 'वाईज अँड अदरवाईज' वगैरे पुस्तकात दिलेले आहेत. परंतु तसे अनुभव लिहिण्यापेक्षाही लहान मुलांकरिता कथा

लिहिणे आपल्याला अधिक कठीण वाटते असे त्यांना वाटते.

भारतात कथांचा जन्म वेदांबरोबर झाला. भारतात कथावाङ्‌मय विपुल आहे. पंचतंत्र, जातककथा, कथासार सागर, हितोपदेश, विक्रम-वेताळ, पुराणे, रामायण-महाभारत आणि प्रांतोप्रांतीच्या लोककथा यांमुळे जागतिक पातळीवरही भारताला कथांच्या उगमस्थानाचा मान मिळतो. भारतातून अनेक कथा देशोदेशी गेल्या आणि त्या त्या देशांच्या लोककथांच्या परंपरेत समाविष्ट झाल्या.

या कथांच्या अंगी रंजनाचे सामर्थ्य आहेच; त्या संस्कारही करतात आणि मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासालाही हातभार लावतात. निर्बुद्ध राजपुत्रांना अवघ्या सहा महिन्यात शहाणे व व्यवहारज्ञानी करण्यासाठी विष्णुशर्मा पंडिताने पंचतंत्रातील कथा सांगितल्या हे आपल्याला ठाऊक आहे.

सुधाताईंच्या या दोन्ही संग्रहातील कथा कुमारवयीन वाचक पुढे ठेवून लिहिल्या गेल्या आहेत. कल्पना आणि वास्तव, सत्य आणि असत्य, चांगले आणि वाईट यातील फरक मुलांना कळायला हवा हे उद्दिष्ट समोर ठेवून या कथांचे लेखन त्यांनी केले आहे. या कथांमध्ये अकारण, अनावश्यक चमत्कार, शाप यांना स्थान नाही. असूया, मत्सर, द्वेष, लोभ, भामटेगिरी, परोपकारी वृत्ती, कंजूष वृत्ती या मानवी भावनांचाच आविष्कार या कथांमध्ये केलेला आहे. यातील बऱ्याच कथा लहानपणी ऐकलेल्या आहेत; त्यांचे मूळ लेखक त्यांना अज्ञात आहेत. परंतु काही कथा स्वतःच्या कल्पनेने लिहिल्या आहेत, काही परकीय कथांचेही पुनर्कथन त्यांनी केले आहे; परंतु ते करताना भारतीय वातावरण त्यांनी पार्श्वभूमी म्हणून वापरले आहे. राजेराण्या त्यात आहेत त्याप्रमाणे सांस्कृतिक संदर्भही आहेत. भारतीय कथांमध्ये, स्वर्ग, नरक, शाप, वर, उःशाप, देव यांचा उल्लेख टाळता येत नाही तर आग्नेय आशियातील लोककथांमध्ये अतींद्रिय शक्ती, मंत्रतंत्र, जादूटोणा, यांना प्राधान्य असते असे त्यांना वाटते. बहुतांश कथांमध्ये गरीब लोक हे सुस्वभावी, सज्जन, परोपकारी, सालस तर श्रीमंत हे आपमतलबी, वाईट, लोभी आढळतात. व्यापारी हे भामटे आणि दुसऱ्यांना फसवणारे असतात. लोककथांमध्ये

पुरुषसत्ताक समाजव्यवस्था दिसते. स्त्रियांना गौण स्थान मिळालेले आढळते.

'थैलीभर गोष्टीं'मध्ये मूर्ख पंडित, शहाणा राजा, पांढरा कावळा, थैलीभर शब्द, गुप्त खजिना, चतुर व्यापारी, संपत्तीची वाटणी, बुद्धिमान शिष्य, बुद्धिमान भाऊ, चतुर राजेंद्र, राजकन्येची प्रश्नावली, कवडीचुंबक वगैरे कथा आहेत.

'सुकेशिनी'मध्ये जादूचे झाड, दयाळू कोल्हा, भाग्यदेवता, जादूचा घडा, दुष्ट सिंह, अव्यवहारी पंडित, तांदळाचे तीन दाणे, राजाने



कान, जादूच्या खडावा, पैशाचे मोल, मुकी राजकन्या, सोन्याचा पाऊस, सोयाबीनची कथा, समुद्र खारट का, देवसुंदरी, कृतज्ञता, एकी हेच बळ, विंचवाचं दुकान वगैरे गोष्टी आहेत.

सुधा मूर्ती यांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा उदारमतवादी,

मध्यममार्गी समंजस, सर्वांना सांभाळून घेणारा असा आहे. या जगात सर्व प्रकारची माणसे असतात. दुष्ट दुर्जन तशीच सज्जन, ढोंगी तशीच प्रांजल, चतुर तशीच साधीभोळी- सर्वांना तेथे स्थान आहे. मात्र दुर्जनांनी आपले खलत्व, वाईटपण कमी करावे, सोडावे असे त्यांना वाटते. तीही माणसे असतात, त्यांनी माणसासारखे सर्वांशी प्रेमाने, न्यायाने, आदराने वागावे. दुसऱ्यावर अन्याय करू नये, आपल्या हाती असणाऱ्या सामर्थ्याचा गैरवापर करू नये एवढीच त्यांची इच्छा असते. या कथांमध्ये त्या तशा प्रकारच्या सूचनाही प्रसंगी देतात.

'थैलीभर गोष्टी' मधील पहिलीच 'अलकावतीचा सम्राट' ही गोष्ट या दृष्टीने बघण्यासारखी आहे.

विदिशानगरीत राहणारा सुमंत हा हुशार पण गरीब मुलगा. अनाथ, पोरका. ऐषारामानं आयुष्य जगता यावं ही त्याची इच्छा; पण त्यासाठी कष्ट करण्याची तयारी नाही. भामटेगिरी करणं, लोकांना



फसवणं हा त्यानं निवडलेला मार्ग. तो तरुण वयात आला तरी ऐदीपणानं बसून खायची हीच ठकसेनी वृत्ती कायम.

कोणालाही फसवण्याचं ठकसेनाचं तंत्र त्याला उत्तम जमतं. मिठाईवाल्याला तो फसवतो, दोन मिठाईच्या पेट्या उचलतो. त्या मिठाईच्या पेट्या कनकचंद्र धनिकाला भेट देतो. फक्त रिकाम्या पेट्या परत द्या म्हणतो. कनकचंद्र त्याला आपल्या घरी बायकोकडून दोन भांड्यात मिठाई ठेवून, रिकाम्या पेट्या घे असे सुचवतो. सुमंत त्यांच्या बायकोला खोटेच सांगतो. ''ही मिठाई ठेवून दोन सोन्याची नाणी घ्यायला सांगितलंय.'' बायको सोन्याची नाणी देते. सुमंत त्यातील एक नाणे गावाबाहेरच्या शेतात पुरतो आणि काठी घेऊन राखण करत बसतो. एक सैनिक तेथे येतो. ठकसेन सुमंत त्याला सांगतो, ही जादूची काठी आहे. ही काठी मला ज्या झुडपाजवळ नेते तेथे सोन्याचे नाणे सापडते म्हणून मी इथं बसलो आहे. सैनिक तिथं खणून बघतो. त्याला नाणे मिळते. तो काठी घेऊन तिच्या बदल्यात आपला घोडा सुमंतला देतो. तो घोडा घेऊन पुढच्या गावातल्या जमीनदाराकडे जाऊन चाळणी मागतो. घोड्याची लीद चाळता चाळता सोन्याचे नाणे काढून दाखवतो. जमीनदाराला सांगतो, ''या घोड्याच्या लीदमधून सोन्याची नाणी निघतात.'' जमीनदार १०० सुवर्णमुद्रा देऊन घोडा घेतो. एका वैद्य जोडप्याकडे तरुण बनवण्याचे औषध असल्याचे सांगून तो एका वृद्धाला गंडा घालतो.... अशाच उचापती करीत तो सगळीकडे वावरतो. त्याच्या लबाडीच्या कथा सगळीकडे पसरतात. राजा शेवटी त्याला पकडतो. ''तू भामटा आहेस. तुला शिक्षा हवीच.'' म्हणून एका पोत्यात घालून पोत्याचे तोंड बांधून कडेलोट करण्याची शिक्षा सुनावतो. पण सुमंत पोत्यातून युक्तीने सुटका करून घेतो आणि पुन्हा राजासमोर येतो.

**राजा त्याला म्हणतो, ''सुमंत, मला तुझी दया येते. तू तुझी सगळी बुद्धी वाईट कामांसाठी खर्च करतोस... बुद्धिमत्ता ही ईश्वरी देणगी आहे. तिचा उपयोग समाजाच्या उद्धारासाठी करायचा असतो. तू तसा केलास तर खरोखरच मोठा होशील. लोकांना कायम काही फसवत राहता येणार नाही.''**

- आणि सुमंत भामटेगिरी सोडतो. राजाचा विश्वास मिळवतो आणि मंत्री होतो.

सुधा मूर्ती या माणसाच्या चांगुलपणावर विश्वास ठेवतात. वाईट माणसालाही सन्मार्गावर येण्याची प्रेरणा देतात.

या संग्रहातील बऱ्याच कथांमध्ये अशा परिवर्तनाच्या शक्यता दाखवल्या आहेत.

चातुर्याचा वापर - लोक अनेकदा आपल्याला फसवतात. खोटेखोटे सांगून पैसे उकळू पाहतात अशावेळी त्यांना युक्तीने, चातुर्याने हाताळायला हवे असते, असेही त्या दाखवतात.

'भामटे' या कथेत चित्रपुरामधील भास्कर या धनाढ्य व्यापाऱ्याच्या मुलाला, नकुलला एकदा एक बाई भेटून सांगते, ''तुझ्या बापाने माझा एक हात गहाण ठेवला होता, तो मला परत दे.''

नकुल त्या बाईला म्हणतो, ''माझ्या घरी असे बऱ्याच जणांचे हात आहेत. तुझा उरलेला हात दे. म्हणजे त्याचा नेमका जोड शोधून आणतो.'' ती बाई पळ काढते.

असे चातुर्य दाखवून नकुल भामट्यांनाही पळवून लावतो.

एखादा राजा प्रशासनात ढिसाळ असेल आणि त्याचे मंत्री भ्रष्टाचारी असतील तर काही चलाख लोक आपला मतलब साधण्यासाठी काहीतरी अफलातून कल्पना वापरतात.

बेदरकार प्रशासन - 'सिकंदर की मोहर'मध्ये असाच एक नमुना दिसतो.

राजधानीत नोकरीसाठी अर्ज करावा लागतो. रोजगार हमी कार्यालयात अर्जासाठी मोठी रांग असते. हे बघून सिकंदर या तरुणाच्या डोक्यात एक योजना येते. तो एक शिक्का बनवून घेतो आणि कचेरीच्या दारात बसतो. त्या पितळी दारातून आत येणाऱ्याच्या अर्जावर शिक्का मारून घ्या असे सांगतो. कोणीही त्याला शिक्का कशासाठी हे विचारत नाही. उलट शिक्का मारल्याबद्दल त्याला एक रुपया देऊन जातो... शिक्का मारून त्याला दिवसाला हजार दोन हजार रुपये मिळू लागतात. अनेक वर्षे हा क्रम चालू राहतो.

एकदा सिकंदर आजारी पडतो. शिक्का मारायला कोणी दरवाजात



हजर असत नाही. अधिकारी शिक्का नसलेले अर्ज नाकारू लागतात. सुलतानापर्यंत तक्रार जाते...

सिकंदरला बोलावणे जाते, ''तू शिक्का का मारून देत होतास? काय लिहिले आहेस त्यावर?''

**''बेदाद सरकार. पीतल दरवाजा. सिकंदर की मोहर.''**

बेदाद म्हणजे भ्रष्ट, बेदरकार.

''या भ्रष्टाचारी प्रशासनात पितळी दरवाजासमोर हा शिक्का सिकंदरने मारला आहे.'' असे या शिक्क्यावर लिहिलेले असते. ते दाखवून सिकंदर म्हणतो, ''सरकार मी काहीच गैर केलेले नाही. मी शिक्का मारण्यासाठी कोणाकडेही पैसे मागत नाही. लोकच मला पैसे देतात. याला पैसे चारल्याशिवाय आपला अर्ज पुढे जाणार नाही असे लोकांना वाटते. इतके सरकारी अधिकारी भ्रष्ट आहेत... या राज्यात तरुणांना त्यांच्या अंगच्या गुणांच्या आणि पात्रतेच्या जोरावर रोजगार मिळाला नाही तर असे गैरप्रकार घडतच राहणार.''

सुलतान सिकंदरला दरबारात नोकरी देतो आणि रोजगार उद्योग खाते त्याच्याकडे सोपवतो. तो नवा शिक्का बनवतो; फक्त त्यात

बेदाद सरकारच्याऐवजी खुदा का सरकार असा बदल करतो. अधिकृतपणे शिक्का मारून नाणे घेऊ लागतो...

...भ्रष्ट प्रशासनाची एकूण कार्यपद्धती म्हणजे आंधळा दळतो कुत्रा पीठ खातो अशातला प्रकार. हे या कथेद्वारे चपखल दाखवले आहे.

राज्यकन्येच्या लग्नासाठी अटीच अटी - **'थैलीभर शब्द'** ही रशियन लोककथा आहे.

राजकन्या कामिनीसाठी नवरा शोधायचा असतो. राजा म्हणतो ''१०० ससे सलग तीस दिवस सांभाळून दाखवेल, तो तुझा पती होईल.''

तशी दवंडी दिली जाते.

कीर्तिकुमार हा गरीब मेंढपाळ ते आव्हान स्वीकारतो. तो आपल्या बासरीने सशांना मंत्रमुग्ध करून एका कुरणावर नेऊन चरण्यासाठी सोडतो... हा अट पूर्ण करणार हे राजाच्या लक्षात येते... शेवटी राणी दुसरी अट घालते. ''मी तुला तीन थैल्या देते त्या तू शब्दांनी भरून आण. तरच हे लग्न होईल.''

कीर्तिकुमार तीही करामत करून दाखवतो. (कशी ते प्रत्यक्ष वाचून बघा,) आणि राजकन्येशी त्याचे लग्न लावण्यात येते.

प्रश्नांची उत्तरे द्या, राजकन्या मिळवा - राजकन्येच्या तीन (किंवा सात) प्रश्नांची जो उत्तरे देईल त्याच्याशी तिचे लग्न होईल ही कल्पनाही काही कथांमध्ये रंग भरते.

ह्या प्रश्नांची उत्तरे मोठी चकवा देणारी असावी लागतात. उडवाउडवीचीही पण समर्पक. मोघम पण असरदार.

प्रश्न - आभाळात तारे किती?

उत्तर - मेंढ्यांच्या अंगावर जेवढे केस आहेत तेवढे.

प्रश्न - जगातील सर्वांत सुंदर मूल कोणते?

उत्तर - प्रत्येक आईच्या नजरेतून तिचे स्वत:चे मूल हे सर्वांत सुंदर असते

प्रश्न - सत्य आणि असत्य यात काय फरक असतो?

उत्तर - डोळ्यात आणि कानात जो फरक असतो तोच.

प्रश्न - हात असून ज्याला हात नाहीत असा माणूस कोण?

उत्तर - श्रीमंत माणूस. ज्याच्यापाशी दुसऱ्याला देण्याची दानत नसते.

प्रश्न - डोळे असूनही अंध असा माणूस कोण?

उत्तर - ज्याच्या ठायी करुणा नाही असा माणूस.

हत्तींचे वाटप - एका राजाने आपले १७ हत्ती आपल्या तीन मुलात वाटायचे काम वजीराला सांगितले. ही वाटणी अनुक्रमे एक द्वितीयांश, एक तृतीयांश आणि एक षष्ठमांश अशी करायची होती. आपल्याजवळच एक हत्ती घेऊन तो वजीर हे काम करतो - ही कथा सर्वप्रसिद्ध आहे.

या पुस्तकातली वाटणी ही गोष्ट याच पद्धतीची आहे.

रमेश आणि सुरेश यांच्याजवळ ५ भाकरी असतात. एक उपाशी वाटसरू त्यांच्याबरोबर जेवतो आणि त्यांना ५ नाणी देतो.

रमेश सुरेशला २ नाणी देतो. स्वत:साठी तीन नाणी ठेवतो.

रमेश म्हणतो की ही वाटणी बरोबर नाही. दोघांना समान वाटा हवा.

हे ऐकणारा एक प्रवासी म्हणतो - हिशोब वेगळाच होतोय. तुम्हा दोघांच्याकडे ५ भाकरी होत्या. त्या तुम्ही तिघांनी खाल्ल्या. प्रत्येक भाकरीचे तीन तुकडे करून तुम्ही सारखे खाल्ले. प्रत्येकाला ५/५ तुकडे मिळाले. रमेशच्या तीन भाकरी म्हणजे नऊ तुकडे. त्याने पाच तुकडे खाल्ले. चार तुकडे वाटसरूला दिले. सुरेशकडे दोन भाकरी म्हणजे ६ तुकडे. त्याने पाच खाल्ले. एक तुकडा वाटसरूला दिला म्हणजे रमेशला चार आणि सुरेशला एक नाणे मिळायला हवे... सुरेशचे तोंड एवढेसे होते.

... असे या कथाभांडारात खूप काही आहे. बुद्धीला आणि भावनांना आव्हान देणारे. माणुसकीला आणि न्यायाला आवाहन करणारे. चांगल्याची बाजू घेणारे. दुर्जनांनाही सन्मार्गावर आणणारे...

**पृष्ठे : १९२, किंमत : १४०रु.,**
**सभासदांना : ९८रु., पोस्टेज : २५रु.**

# जांभळे आंबे

वैशाली कार्लेकर



**'जं**गल गंमत' अशी एक बालकथांची मालिका मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रसिद्ध होत आहे. त्या मालिकेतील पहिले पुस्तक 'जांभळे आंबे आणि जंमत गोष्टी' हे वैशाली कार्लेकर यांनी लिहिले आहे.

सशाचा स्वयंपाक, सरूची चोरी, अनुभवाचे मोल, स्वार्थी नंदू, मिनू टिनू आणि जांभळे आंबे अशा सहा गोष्टी या पुस्तकात आहेत.

खलील खान यांच्या विलोभनीय चित्रांनी या कथा सजलेल्या आहेत. बनू ससा, सिंबा सिंह, कबूतर, खारूताई, मंकू माकड, बंडू अस्वल, गरूड पक्षी, नंदू माकड, मिनू चिमणी, बगळेताई अशा पशुपक्ष्यांची या कथांतून रेलचेल आहे. त्या सर्वांना आपल्या सफाईदार चित्रांनी स्वतंत्र व्यक्तिमत्त्वे देण्यात खलील खान यांनी कसूर केलेली नाही.

सिंबा नावाचा सिंह सिंहासनावर लोडाला टेकून, हात हनुवटीला लावून, एक पाय आसनावर ठेवून शाही थाटात बसला आहे, समोर वाफाळलेली डिश आहे हे (सशाचा स्वयंपाक) पहिल्याच कथेच्या आरंभीचे चित्र बघूनच बालवाचक खूष होतील. पुढे सशाला शेफच्या म्हणजे स्वयंपाक्याच्या वेषात उंच टोपीसह पेश केले आहे, तेही त्याची ऐट दाखवणारे आहे. मंकू माकड, जाळ्यात अडकलेला आणि जाम घाबरलेला मिटू माकड, सापळ्यात पाय अडकल्याने उड्या मारू न शकणारा आणि कपाळावर हात मारून घेणारा नंदू माकड, फळांची टोपली घेऊन खुषीत चाललेली चिनूताई, जांभळ्या रंगाचे आंबे देणारे मंगू झाड, पक्ष्यांच्या शाळेत शिकवणाऱ्या बगळेताई, मिनू चिमणीताई अशा कितीतरी व्यक्तिरेखा खलिल खान यांनी अगदी वास्तव वाटतील अशा नखरेल आविर्भावात चितारल्या आहेत. प्राण्यांना नावे देताना लेखिकेने ही कल्पकता दाखवलेली आहे. सुबक बहुरंगी छपाईमुळे या पुस्तकांची निर्मितीमूल्ये वाखाणण्याजोगी ठरली आहेत.

'सशाचा स्वयंपाक' या पहिल्याच गोष्टीत सिंबा सिंहाने बनू नावाच्या सशाला आचारी म्हणून कामावर ठेवण्यासाठी चाचणी घेण्याचे ठरवलेले आहे. ''एकदम चवदार जेवण झाले पाहिजे, नाहीतर मी तुलाच खाऊन टाकीन'' असा दमही त्याला दिलेला



आहे. सशाला त्यामुळे धास्ती वाटते. सिंहाला आवडेल असे जेवण कुठले करावे असा त्याला प्रश्न पडतो. इतर पशुपक्षी त्याला सल्ला देतात.

''बनू, अरे तू पंजाबी जेवण बनव. छान असतं.'' पोपट सुचवतो.

''नको. दाक्षिणात्य पदार्थ कर.'' चिमणीची सूचना.

''चायनीय जेवण कर... सगळ्यांना आवडतं.'' कबूतर म्हणते.

हे वेगवेगळे सल्ले ऐकून बनू ससा फारच गोंधळून जातो. सिंह कामावरून परत येण्याच्या आत हे सगळे पदार्थ कसे तयार होणार? शेवटी खारूताईच्या म्हणण्याप्रमाणे तो सोपे पदार्थ बनवतो. (ते सोपे पदार्थ कुठले हे मात्र गोष्टीत सांगितलेले नाहीत). सिंह ते



पदार्थ खाऊन खूष होतो. बनूला स्वयंपाकी म्हणून काम देतो. अशी ही गोष्ट आहे.

या गोष्टीतला सिंबा हा सिंह खूप श्रीमंत असतो. दिवसभर तो खूप काम करतो. त्यामुळे स्वत:साठी जेवण बनवायला त्याला वेळच नसतो, असे आरंभीच स्पष्ट केले आहे. दिवसभर तो कुठले काम करतो; किंवा पोटासाठी शिकार का करीत नाही? त्याच्याबरोबर सिंहीण का नसते? श्रीमंत असूनही बिचारा



एकटाच का राहतो? अशा शंका मुलांच्या मनात यायचे कारण नाही. एखाद्या सरदारासारखे त्याचे जगणे असते असे मानले की झाले!

'सरूची चोरी' या कथेतील सरू म्हणजे खारूताई. ती खूप आळशी. झाडावर चढणं, फळं शोधणं याचा तिला कंटाळा. आयतं बसून खायला मिळावं ही तिची इच्छा. मंकू माकडाला ती आंबे टोपलीत ठेवायला मदत तेवढी करते आणि त्या टोपलीतून ती मंकूला कळू न देता आंबे घेऊन फस्त करते. 'काहीही न करता' अशी चोरी करणं फायद्याचं आहे असं तिला आढळून येतं. अस्वलानं केलेल्या पदार्थांचाही ती फडशा पाडायची

आणि चंदू मांजरानं ठेवलेलं दूधही पिऊन टाकायची. बंडू अस्वलानं वाढदिवसाच्या पार्टीसाठी तयार केलेले पदार्थही ती गायब करायची... पण सगळे प्राणी मग सावध होऊन चोराला पकडण्यासाठी गस्त घालायचे ठरवतात. सरू खारही एकदा पहाऱ्यावर असते आणि मंकूच्या घरातल्या आंब्यांचा चावा घेते... अर्थात मंकू तिला पकडतो. मग प्राणी तिला शिक्षा ठोकावतात. कसली? चोरी केलेल्या घरांमध्ये आठ दिवस काम करायचं.





अशी ही सरू खारूताई दिसायला इटुकली, पण अस्वलाच्या वाढदिवसाच्या पार्टीचे सगळे पदार्थ एकटीने फस्त करणारी. खादाड

नंदू माकड इतर सर्व माकडांपेक्षा झाडावर उंच चढण्यात पटाईत; म्हणून त्याला मोठा गर्व झालेला. स्वार्थी अप्पलपोट्या. कोणाच्या मदतीला जाणं त्याला ठाऊकच नसतं.

एकदा मिटू माकड शिकाऱ्यानं लावलेल्या जाळ्यात अडकतं. त्याची आई चिनू त्याला जाळ्यातून सोडवायचा प्रयत्न करते, पण जाळं मजबूत असतं. तेथे नंदू माकड येते पण ते काही मिटूला सोडवायला मदत करत नाही. तेव्हा चिनूच आपल्या दातांनी जाळ्याचे धागे कुरतडते आणि घाबरलेल्या मिटूला घरी नेते.

पुढं काय होतं? गर्विष्ठ नंदू माकडाचाच पाय एकदा सापळ्यात

अडकतो आणि बिचारा एकदम किंचाळू लागतो त्याला सोडवायला कोण येतं? मिटू माकड अन् त्याची आई चिनू... आहे ना अपकाराची फेड उपकाराने!

मंगू हे नाव आहे एका आंब्याच्या झाडाचे. त्याचे वैशिष्ट्य काय? तर त्याला येणारे आंबे पिवळे-केशरी नसायचे. ते जांभळ्या रंगाचे असायचे... जांभळासारखे पण मोठे.

मंगूच्या अंगाखांद्यावर अनू आणि सोनू या दोन खारूताई बागडायच्या. त्यांना एकदा मंगू झाड म्हणालं, ''आता वादळ होणार आहे. तुम्ही तुमच्या बिळात जाऊन बसा.'' त्या खारूताई मंगूचं ऐकून घरी जातात. वादळ होतं. मग मंगू झाड त्या वादळानं खाली पडतं. त्याच्या फांद्या कडकड आवाज करत मोडून पडतात. अनू-सोनू म्हणतात आपण या मंगू झाडाला उभं करू या... मंगू म्हणतो, ''तुम्ही माझ्या कोयी जमिनीत पेरा.. मग माझ्यासारखी खूप झाडं येतील...'' आणि पुढं मोठी आमराई होते. ही गोष्ट आहे जांभळ्या आंब्याच्या झाडाची!

मिनू आणि टिनू या दोन चिमुरड्या चिमण्या. त्यांना बगळेताई शिकवत. टिनूला अभ्यासाचा तिटकारा. तेव्हा बगळेबाई तिला शिक्षा करतात. टिनू मिनूच्या अभ्यासाची वहीच फाडून टाकते. पेनही पळवते. बगळेताई टिनूला कसं सुधारतात ते तिच्याशी सर्वांना चांगलं वागायला लावून! बगळेबाई एकूण आपल्या विद्यार्थिनींचं मानसशास्त्र जाणण्यात हुशारच!

... मुलांच्या गोष्टी म्हटल्या तर कल्पनाशक्तीची गरज असते. प्राण्यांना, पक्ष्यांना विशिष्ट व्यक्तिमत्त्व देऊन खऱ्याखुऱ्या माणसासारखं वागायला, विचार करायला लावावं लागतं. खारूताई ऐवजी चिनू-मिनूला शाळकरी मुली म्हटलं तरी कथा खरी वाटायला हवी... अशा काहीतरी किमया करावी लागते.

तशी करामत या कथांमध्ये दिसते खरी!

**पृष्ठे : ३२, किंमत : ३०रु.**
**सभासदांना : २१रु., पोस्टेज : २०रु.**

# झॅकपॅक शोध

राजीव तांबे





**रा**जीव तांबे यांनी बालवाचकांसाठी 'ससोबा'च्या गोष्टींचा धडाका लावलाय. शूर ससोबा, ससुल्या, शेपटीवालं झाड, चला चहा पिऊया ही ससोबाच्या गोष्टींची चार पुस्तकं गेल्या वर्षी बाजारात आली. आता यंदा 'गाजराचे काप आणि खरेखुरे साप' आणि शहाणा ससोबा, आणि छत्रीची जादू, नको ते कपडे, चला मोबाईल, झॅकपॅक शोध या अशा गोष्टींचा खजिना खुला केलाय.

या ससोबाबरोबर त्याचा दोस्त हसोबाही असतो, बरं का!

आणि हे दोघे मिळून मोठी धमाल करतात.

तुम्ही लहान मुलं गमतीजमती करता ना! अगदी तशाच गमतीजमती राजीव तांबे या ससोबा-हसोबाला करायला लावतात.

ससोबा-हसोबा या जोडीबरोबर या गोष्टींमध्ये ससोबाचे आईबाबा, ससोबाची बहीण ससुली ही त्यांच्या कुटुंबातली मंडळीही हजर असतात आणि माकडोबा, कोल्होबा, कोंबडेकाका, मुंगूस काका, लाललाल मुंगीताई, डोळे वटारणारा बैलोबा हेही सगळे जरूर तेव्हा ये-जा करीत राहतात.

त्यात भर म्हणजे ससोबा-हसोबा अगदी आपल्या आजच्या काळातले आहेत. आजच्या काळातले म्हणजे चक्क मोबाईल वापरणारे. टीव्ही बघणारे, वॉशिंग मशिनवर कपडे धुणारे, फ्रीज वापरणारे... त्यातही वेगवेगळे प्रयोग करणारे डोकेबाज शोधक.

'झॅक पॅक शोध'या गोष्टीत ससोबा-हसोबांनी लावलेल्या अजबगजब





शोधाची मस्त गंमत वाचायला मिळते.

'शास्त्रज्ञ ससेरावांचे नवीन शोध' हे पुस्तक वाचून हसोबा-ससोबा आपणही शास्त्रज्ञ व्हायचे ठरवतात आणि काही धमाल शोध लावण्याचे ठरवतात.

त्यातून झॅकपॅक टीव्हीचा शोध लावण्याची कल्पना ससोबाच्या डोक्यात येते आणि हा टीव्ही नदीवर आंघोळ करताना, लोळतलोळत जेवताना, घरचा अभ्यास करताना, वर्गात पुस्तक वाचताना, ढोलीत लपून खाताना, बाजारात भटकताना, जत्रेत दंगा करताना पाहता येईल असा असावा अशी त्यांची इच्छा असते.

आईबाबा बाहेर गेले असताना हसोबा-ससोबा झॅकपॅक टीव्हीचा

शोध लावण्याचा कार्यक्रम हाती घेतात. 'लहान सशांचा महान शोध' म्हणून गाजायला हवा असा शोध त्यांना लावायचा असतो.

ते काय करतात? टीव्हीला पाच नवी बटणं लावतात. तीही रंगीत.

लाल बटण दाबलं की टीव्ही छोटा होईल.



खिशात ठेवता येईल इतका छोटा.

निळं बटण दाबलं की टीव्ही फक्त आपल्याला दिसेल, इतर सर्वांना झोप येईल.

जांभळं बटण दाबलं की हवं ते चॅनल सुरू होईल. क्रिकेट, कार्टून, गाणी, स्टंट, डान्स.

पिवळं बटण दाबलं की टीव्ही नेहमीच्या आकाराचा होऊन

आपल्या जागेवर बसेल.

हिरवं बटण दाबलं की झोपलेले सगळे लोक जागे होतील. आळस देतील. जांभया देतील.

आणि प्रत्यक्ष प्रयोगाच्या वेळी ससोबा-हसोबा काय करतात? वीज गेलेली असते, भारनियमन. मग ते टीव्हीमधला स्पीकर काढतात. पडदाही बाजूला ठेवतात.

वॉशिंग मशीनमधला ड्रायर काढतात. पंखाही बाजूला ठेवतात

फ्रीजमधला बर्फाचा बॉक्स काढतात. मशीन बाजूला ठेवतात.

मग एकाची वायर दुसऱ्याला. दुसऱ्याची वायर चवथ्याला, तिसऱ्याची पहिल्याला... अशी जोडजोड करतात.

इतक्यात दारावरची बेल वाजते. म्हणजे लाइट आलेले असतात. आणि आईबाबाही!

ससोबा दार उघडतात.

आणि काय चमत्कार...?

वॉशिंग मशीन मधून गाणी वाजू लागतात, फ्रीजमध्ये कपडे



धुवायला सुरुवात होते.... टीव्हीमध्ये ट्युबलाईट लागते... ट्युबलाईटचं आइस्क्रीम होतं.

ससोबा-हसोबा दोन महान शास्त्रज्ञ एकमेकांकडे टकामका बघू लागतात!

राजीव तांबे यांच्या बालकथांमध्ये ही कथा बरीच आगळीवेगळी ठरते.

तिच्यातील कल्पकता, कल्पनांचा भन्नाटपणा थक्क करतो.

**'झॅकपॅक शोध'** या पुस्तकातील ससोबा-हसोबा मोबाईलसाठी हट्ट करतात. त्याची गोष्ट मजेदार वाटेल.

**चला मोबाईल**

**''आई** आई, आमच्या वर्गात सगळ्या मुलांकडं मोबाईल आहेत...





मला एक मोबाईल आण ना!'' असा हट्ट ससोबा करतो. तेव्हा त्याच्या आईची शेपटी रागाने थरथरते, कान ताठ होतात आणि मिश्या चक्क फेंदारतात.

ससोबाचा दोस्त हसोबा येऊन टपकतो आणि त्याची आई त्याला मोबाईल घेऊन देणार अशी खूषखबर सांगते.

मोबाईल म्हणजे मजाच मजा!

गप्पा मारा (चॅटिंग), गेम खेळा, गाणी ऐका, फोटो काढा, तारीख बघा, वेळ बघा, गजर करा, गणित करा, एसएमएस करा.

पण ससोबा-हसोबाचे हे सगळे मनसुबे ऐकून त्यांची आई वैतागून शेपटी ताठ करते आणि म्हणते, ''थांबवा तुमचा तो गजर! तुमचं बोलणं म्हणजे रिंगटोनच! ऐकून ऐकून कान ताठ झाले माझे!''

...आणि आई म्हणते, ''तुमच्यासारख्या लहान सशांना मोबाईलची गरज नाही. आपण मिळून गप्पा मारू, गेम खेळू, गाणी ऐकू, फोटो काढू, तारीख बघू, गजर ऐकू...''

ससोबा खाऊ खाऊन ढेकर देत एकदम शहाणा होतो.

''अरे, मोबाईल म्हणजे नुसता आवाज... एकटे एकटे राहणारे ससेच घेतात मोबाईल. आपण एकमेकांचे मित्र आहोत. आपण

नेहमी बरोबर असतो. मग मोबाईलची गरजच काय?''

आपल्या पोराचे हे शहाणपण बघून ससेबाईंचे डोळेही भरून येतात आणि मग ते अश्रू त्यांना शेपटीने पुसावे लागतात.

मोबाईलचे मुलांना वाटणारे आकर्षण, मोबाईलमुळे होणारी वेगवेगळी कामे (चॅटिंग, गेम्स, संगीत, फोटोग्राफी, कॅलेंडर, कॅलक्युलेटर, घड्याळ) आणि शेवटी मोबाईल म्हणजे नुसता आवाज हे वास्तव... हे सगळे राजीव तांबे यांनी कथानकामध्ये व्यवस्थित बसवून दाखवले





आहे. मोबाईलची गरज एकटे एकाकी राहणाऱ्याला हे भयानक वास्तवही सहजपणे उघड केले आहे आणि सतत जवळ राहणाऱ्यांना मोबाईलची गरज नाही ही वस्तुस्थितीही शेवटी ठसवलेली आहे!

ससोबा, हसोबा, आई या तिघांमधले भावबंधही हळुवारपणे फुलवलेले!

'मोबाईल' भोवती अशी कथावस्तू रचण्यालाही करामत लागतेच.

अशा कल्पनांच्या मजेशीर आतषबाजीची राजीव तांबे यांना मोठी हौस आहे. फॅन्टसीच्या अंगाने त्यांची कल्पनांची उड्डाणे होत राहतात. गांभीर्य आणि वात्रटपणा; खोडकरपणा आणि कल्पना चमत्कृती यांचा ते वैशिष्ट्यपूर्ण मेळ घालतात. त्यामुळे 'झॅकपॅक टीव्ही' सारखी मॉक हिरॉइक स्टाइल वापरून ते कथेची रंगत वाढवतात. या कथेतून बोध घ्यायचा नसतो. 'ॲलिस इन वंडरलॅंड'

मधून बोध घ्यायचा नसतो. कल्पकतेला आणि फॅन्टसीला स्वच्छंद स्वैर विहार करायला मोकळीक देऊन आपल्या व्यक्तिमत्त्वातील, आपल्या अंतर्मनातील खट्याळ मुलाला तर्क-कुतर्काच्या पल्याडच्या गंमतीदार नॉनसेन्स लँडमध्ये मोकाट सोडून द्यायचे असते.

राजीव तांबे यांना हे अगदी गंभीर चेहरा करून सांगण्याची हातोटी साधली आहे. आपले मूलपण त्यांनी जपले आहे. त्यामुळेच त्यांच्या या कल्पनारंजनाची उड्डाणे ट्युबलाइटचं आइस्क्रीम करतात आणि वॉशिंग मशीनला गाणं म्हणायला लावतात.

त्यातलं त्यांचं तर्कशास्त्र, त्यांचं लॉजिक ॲलिस इन वंडरलँडच्या लुई कॅरोलसारखंच अचाट आणि अजब!

**पृष्ठे : ३२, किंमत : ३०रु.**
**सभासदांना : २१रु., पोस्टेज : २०रु.**



# नवे कोरे

## मानसी




**डॉ. छाया महाजन**

**किंमत १२०रु. पोस्टेज २५रु.**

काय दिलं माझ्या प्रेमानं?
फक्त दुःख...?
ऑसमंडच्या गाण्याचा मुखडा आहे बघ,
'लव्ह इज ओन्ली फॉर टुडे.'
प्रेम फक्त आजच्यापुरतंच, या क्षणापुरतंच असतं.
ते आज जगून घे.
हे खरं असावं, पण कळलं कधी नाही.
माणसाच्या मनाचीच नाती खरी, हे गृहीतक होतं माझं.
प्रेमाबरोबर मीही एक नातं विणायला घेतलं. सामाजिक नात्याला झुगारून...
तरीही सामाजिक होतंच ते...
मग लक्षात आलं, की माणसाच्या मनाच्या नात्याला तर स्थानच नाहीये आणि किंमतही.
सत्य हे की, सामाजिक नात्यांचा शिक्का खोलवर रुतून बसलाय आपल्या मानसिकतेत. एखाद्या गुणसूत्रासारखा रुजलाय आपल्यात.

# तेनालीराम

## १० भाग

मंजूषा आमडेकर





**ते**नालीराम हा दक्षिण भारतातील राजा कृष्णदेवराय याच्या दरबारातल्या अष्टमंडळातला मानकरी आणि हुशार, हजरजबाबी, चतुर असा बुद्धिमान मंत्री. मुत्सद्दी. राजा कृष्णदेवराय आणि बाबर हे समकालीन. अकबर आणि बिरबल यांच्या आख्यायिका जशा प्रसिद्ध आहेत त्याचप्रमाणे कृष्णदेवराय आणि तेनालीराम यांच्याही अनेक चातुर्यकथा गेली तीनचारशे वर्षे भारतात सर्वत्र लोकप्रिय आहेत. तेनालीराम हा स्मार्त ब्राह्मण. दरबारातले इतर ब्राह्मण राजपुरोहित त्याचा द्वेष करीत. त्याच्यावर खार खाऊन असत.

बुद्धिमान तेनालीराम, जगावेगळा तेनालीराम, चतुर तेनालीराम, न्यायप्रिय तेनालीराम, समयसूचक तेनालीराम, प्रसंगावधनी तेनालीराम, लाडका तेनालीराम, निर्भय तेनालीराम, राज्याचे भूषण आणि हजरजबाबी तेनालीराम अशी दहा बहुरंगी पुस्तके मेहता पब्लिशिंग हाऊसने

बालवाचकांसाठी आकर्षक स्वरूपात प्रकाशित केली आहेत.

घनश्याम देशमुख यांनी या सर्व पुस्तकांतील चित्रे आणि मुखपृष्ठे तयार केलेली आहेत. ठसठशीत भावदर्शी व्यक्तिरेखांमुळे आणि नावीन्यपूर्ण रंगसंगतीमुळे ही सर्व चित्रे लक्ष वेधून घेतात. कथांमधील वातावरण जिवंत करतात. या सर्व पुस्तकांसाठी जाडसर कागद वापरण्यात आला आहे; छपाईही उत्तम झाली आहे. त्यामुळे हा एकूणच संच अत्यंत नयनमनोहर वाटतो. इंग्लिश पिक्चर बुक्सच्या पंक्तीत अभिमानाने शोभू शकेल असा हा वैशिष्ट्यपूर्ण संच मराठीत तरी अपवादात्मकच मानावा लागेल.

मेहता पब्लिशिंग हाऊसने गेल्या काही वर्षात काही अनुवादित बालसाहित्य बहुरंगी चित्रांसह छापलेले आहे; त्यात आता अधिकाधिक प्रोफेशनल आणि कलात्मक गुणवत्ता प्रकट होत आहे. एकूण मुद्रणदर्जाच्या मानाने पुस्तकांच्या किंमतीही माफक ठेवण्यात आल्या आहेत. त्यामुळे या संचाचा उठाव मोठ्या प्रमाणावर व्हायला मोठाच





अवसर आहे.

चौथी-पाचवीतील मुलांना तेनालीरामच्या दहा पुस्तकांचा हा संच वाढदिवशी अथवा अन्य शुभ प्रसंगी भेट देण्यासाठी उपयुक्त आणि सोयीस्कर आहे.

मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी अशाच स्वरूपाच्या आकर्षक पुस्तकांची गरज आहे. मुलांचा वयोगट आणि शब्दसंग्रह लक्षात घेऊन कथांचे केलेले पुनर्लेखन, भरपूर चित्रे, संपूर्णतया बहुरंगी छपाई यामुळे ही पुस्तके कोणालाही हवीहवीशी वाटतील. मुलांना तर ती वेड लावतीलच. ज्ञान आणि मनोरंजन असा दुहेरी लाभ देणारी ही पुस्तके आहेत.

या दहा पुस्तकांत सुमारे ७५ कथांचा समावेश केला गेला आहे. कुठलेही पुस्तक घेऊन वाचायला लागावे असे यांचे स्वरूप आहे. कथांमध्ये तसा काही क्रम लावण्यात आलेला नाही. प्रत्येक पुस्तक स्वतंत्र आहे. तेनालीरामच्या बुद्धिमत्तेचे आणि चातुर्याचे एकेक वैशिष्ट्य प्रकट करणारे एकेक पुस्तक आहे. या सर्व कथा वाचल्यावर



तेनालीरामच्या काळातील भारताची, विशेषत: दक्षिण भारताची सामाजिक - सांस्कृतिक स्थिती, त्यावेळच्या लोकांची जीवनशैली, न्यायदानाची व्यवस्था, लाचलुचपत वगैरे गोष्टींवर प्रकाश पडतो. दरबारात तेनालीरामचे महत्त्व वाढत राहिल्याने त्याचा हेवा व द्वेष करणारे लोकही खूप होते आणि त्यांच्या कटकारस्थानांना तेनालीराम आपल्या बुद्धिचातुर्याने कसे चपखल उत्तर देत असे याचेही अनेक किस्से यात आलेले आहेत.

राजा कृष्णदेवराय याच्या अष्टप्रधान मंडळाची ख्याती ऐकून मोगल सम्राट बाबरही प्रभावित होतो. नृत्य, गायन, वादन, चित्रकला अशा विविध कलांमध्ये राजा रस घेई. कलावंतांना आश्रय देऊन त्यांच्या कलासाधनेला तो प्रोत्साहन देई.

त्याच्या राज्यावर स्वारी करण्यासाठी बादशहा बाबर सैन्य घेऊन विजयनगरकडे निघतो. बाबरशी युद्ध करण्यात काहीच अर्थ नव्हता; त्याच्या अफाट सैन्यापुढे निभाव लागणे मुश्किल होते. तेव्हा कृष्णदेवराय युद्धबंदी कराराचा प्रस्ताव बाबरकडे पाठवतो. बाबर तो मान्य

करण्यासाठी एक अट घालतो, ''एक आठवड्यात संपूर्ण महाभारत पुन्हा लिहून दाखवावे. बाबर म्हणजे अर्जुन, कृष्णदेवराय कौरव. दुर्योधन वगैरे बदल त्यात हवेत इ.'' बाबराचे हे चमत्कारिक आव्हान अर्थातच तेनालीरामशिवाय दुसरा कोण स्वीकारणार? राजा कळवतो, ''आठ दिवसात नवे महाभारत घेऊन तेनालीराम आपल्या दरबारात येईल.'' तेनालीराम बाबरचा डाव कसा उधळून लावतो? नवे महाभारत वाचायला सुरुवात करण्याआधी बाबरला तो एक छोटी समस्या सोडवायला सांगतो, ''महाभारतात अर्जुनाची पत्नी द्रौपदी हिला पाच पती होते. या नव्या भारतात अर्जुन म्हणून आपले नाव येणार मग द्रौपदीचे इतर चार पती म्हणून कोणाची नावे घालायची ते सांगा...'' यावर बाबर काय उत्तर देऊ शकणार? तो विनाशर्त





युद्धबंदी करारावर सही करतो. राजा कृष्णदेवरायला असा तल्लख तेनालीराम हा आपला प्रिय सल्लागार आणि मार्गदर्शक वाटणार हे उघडच आहे.

बाबर त्यामुळे तेनालीरामला आपल्या दिल्ली दरबारातही पाहुणचारासाठी बोलावतो. त्याची परीक्षा घेतो आणि त्याच्या चातुर्याने स्तिमित होतो. (बाबर हसला - राज्याचे भूषण मधील गोष्ट)

बाबर बादशहाप्रमाणेच आपला बडेजाव आणि अहंकार मिरवणारे अनेक लोक तेनालीरामला भेटतात, पण तेनालीराम त्यांना आपल्या चातुर्याने, प्रसंगावधानाने, हजरजबाबीपणाने, अक्कलहुशारीने निष्प्रभ करतो. त्याचे युक्तिवाद बिनतोड असतात. त्याच्या निर्णयात मानवी

स्वभावाचे आकलन दिसते, उच्च नैतिक मूल्यांबद्दल आदर दिसतो. सज्जनांचा कैवार दिसतो. दुष्टांना धडा शिकवण्याचा निश्चय दिसतो. गरीबांबद्दलची कणव दिसते. दांभिकपणाबद्दल चीड प्रकट होते. त्याच्या विनोदी, खेळकर स्वभावाचे आल्हाददायक पैलू दिसतात.

तेनालीरामची एकदा त्याच्या काळ्या वर्णनावरून राजगुरू टवाळी करतात. ''आम्ही सगळे गोरे, पण तू एकटा मात्र काळा,'' म्हणून ते हसतात.

तेनालीराम त्यांना हसतो. म्हणतो, माझ्या काळ्या रंगामागं एक रहस्य आहे. ब्रह्मदेवानं माणसाला संपत्ती, सौंदर्य, शक्ती, शहाणपण द्यायचं ठरवलं. त्यासाठी अगदी अल्प अवधी दिला. मी शहाणपण गोळा करण्यात गुंतलो. तेवढ्यात तुम्ही सगळ्यांनी इतर गोष्टी घेतल्या. म्हणून माझा रंग काळा. राजगुरू यावर काय बोलू शकणार? बुद्धीचा इतरांकडे अभाव आहे हे सुचवून तेनालीरामाने त्यांचा सर्वांचाच नक्षा उतरवतो.





आपल्या विरुद्ध राजाकडे खोट्यानाट्या कागाळ्या करणाऱ्या मंत्र्यांनाही तेनालीराम धडा शिकवतो. (मिरच्या झोंबल्या)

तेनालीराम बलदंड पैलवानालाही पळवून लावतो. (पैलवानाला शह) आणि निजामाच्या दरबारात जाऊन विद्वानांच्या विचित्र प्रश्नांना हजरजबाबी उत्तरं देऊन शरणागती पत्करायला लावतो.

राजा कृष्णदेवरायालाही तो आपल्या चातुर्याने अनेकदा स्तिमित करतो.

तेनालीरामला एक गाव बक्षीस देण्याचे जाहीर केल्यावर राजाला त्याचा विसर पडतो. उंटाच्या पाठीवरच्या दोन कुबडांचा उल्लेख राजा करतो तेव्हा तेनालीराम म्हणतो, ''मागच्या जन्मी हा उंट राजा असणार. कुणाला तरी गाव बक्षीस द्यायचं जाहीर करून त्यानं आपला शब्द पाळला नसेल, म्हणून देवानं त्याला बेढव शरीर दिलं असणार.''

हा टोला राजाच्या वर्मी लागणारच. तेनालीरामला गाव मिळणारच.वादळ आल्यानंतर मी नांगर टाकीन असं म्हणणाऱ्या तेनालीरामला राजा विचारतो,



''चारी दिशांना टाकायला चार चार नांगर तू आणणार कुठून?''

''तुम्ही चार चार वादळं जिथून घेऊन येणार तिथून.''

**'न्यायप्रिय तेनालीराम'** या पुस्तकात ८ गोष्टी आहेत.

रस्त्यावरून जाणाऱ्या एका गरीब माणसाला मिठाईच्या दुकानातल्या मिठाईचा वास घेतला म्हणून हलवाई पैसे मागतो तेव्हा तेनालीराम थैलीतल्या नाण्यांचा छन छन आवाज ऐकून पैसे दिल्याचे सांगून त्याला गप्प बसवतो. ही कल्पना बिरबल, नसरुद्दिन यांच्या कथांमध्येही वापरलेली दिसते.

त्याचप्रमाणे भांड्याल पिले होतात ही कल्पनाही वेगवेगळ्या प्रांतांच्या लोककथांमध्ये आढळते.

'शेजाऱ्याच्या घराची भिंत पडून माझ्या मेंढ्या मेल्या. मला त्यांची भरपाई मिळवून द्या' असा खटला राजाकडे आणणाऱ्या माणसाला न्याय देताना 'अंधेर नगरी चौपट राजा' च्या धर्तीवर कोणीतरी बळीचा बकरा बनवून त्याला फासावर लटकावण्याचा घाट घालण्याचा जो प्रकार चालतो, त्याचा वापर केला आहे. ही कथाही निरनिराळ्या सांस्कृतिक भौगोलिक संदर्भांमध्ये अवतरलेली आहे.

राजाचा लहरी कारभार, कोणाला सढळ हाताने मदत तर कोणाला



वंचित ठेवणे हा प्रकार गैर असल्याचे दिसले तरी ते राजाला सांगायचे कसे? राजा त्याची मान उडवायला कमी करणार नाही. परंतु तेनालीराम ते काम चातुर्याने करतो. प्रसाद कसा वाटू-आपल्यासारखा की देवासारखा असा प्रश्न तो राजाला विचारतो. देवासारखा नको, माझ्यासारखा वाट असे राजा म्हणतो. राजासारखा प्रसाद वाटणे म्हणजे पक्षपातीपणा करणे. कोणाला कमी, कोणाला जास्त, कोणाला अजिबात नाही. त्याबद्दल लोक तक्रार करतात तेव्हा तेनालीराम म्हणतो, ''मी तर आपलीच आज्ञा पाळली. आपल्या पद्धतीने प्रसाद वाटला. राज्यात सगळीकडे हेच चाललेय. कोणी बंगले बांधतंय, कोणी बेघर होतंय, कोणावर लक्ष्मी प्रसन्न, कोणी भिकारी.''

राजाच्या लक्षात त्याच्या बोलण्याचे मर्म येते. आपल्या स्वच्छंद कारभारातील दोषांवर तेनालीरामचा रोख आहे हे त्याच्या लक्षात येते, परंतु ते आडवळणाने दाखवून दिल्याने त्याला तेनालीरामावर रागवताही येत नाही.



एखादी चूक लक्षात आणून देतानाही चातुर्य आणि बुद्धी वापरावी लागते.

एका चित्रकाराच्या चित्रात दोष काढणाऱ्या राजगुरुलाही तेनालीराम असाच नामोहरम करतो. चित्रकाराला न्याय मिळवून देतो.

मुलगा आणि सून घरातून हाकलून देतात तेव्हा घराचे खरे मालक म्हणजे मुलाचे वडील (छनछन गोष्टीत त्यांना आजोबा म्हटले आहे) 'आता या वयात कुठे जाऊ' म्हणून राजाकडे तक्रार घेऊन येतात. तेनालीराम त्यांना सोन्याच्या नाण्यांची थैली घरी नेऊन रोज ती वाजवत जा, मात्र मुलाच्या हाती देऊ नका असा सल्ला देतो... नंतर सोन्याच्या नाण्यांच्या ऐवजी तांब्याची नाणीच पिशवीत ठेवून वाजवण्याचा क्रम जारी ठेवायला सांगतो. त्या सुवर्णमुद्रांच्या आशेने मुलगा आणि सून वडिलांची काळजी घेतात. न्यायाचा हा प्रकारही माणसाच्या लोभीपणाचे आणि स्वार्थी वृत्तीचे कंगोरे ध्यानात घेऊन तेनालीराम उपयोगात आणतो.

तेनालीरामच्या रूपाने भारतीय व इतर अनेक लोककथांमधील नीतिबोध आणि चातुर्य नव्या अवतारात, नव्या रूपात समोर येते. मुलांना लहान वयात अशा कथा वाचून गंमत वाटते. मोठेपणी या कथांद्वारे मानवी स्वभावाचे आणि लोकव्यवहाराचे रहस्य उमगू शकते. वेगवेगळ्या वयात या कथांतून वेगवेगळे आशय जाणवत राहतात. इसापनीती लहानपणी आवडते, मोठेपणीही आवडते, नवनवे धडे देते... त्याप्रमाणे इतरही बोधकथा, चातुर्यकथा, नीतिकथा आयुष्यभर मार्गदर्शक ठरतात. बालवयात सगळ्या जगातील उत्तमोत्तम कथांचा खजिना असा हस्तगत करून ठेवायला हवा.

**प्रत्येकी पृष्ठे : ३२, प्रत्येकी किंमत : ३०रु.**
**प्रत्येकी सभासदांना : २१रु., प्रत्येकी पोस्टेज : २०रु.**

# आजीनं सांगितलेल्या चातुर्यकथा



**वयोगट - ८ वर्षांपासून पुढे**

| | | |
|---|---|---|
| पंचतंत्रातील मनोरंजक गोष्टी | अनिल किणीकर | २५ |
| पंचतंत्रातील रोचक गोष्टी | अनिल किणीकर | २५ |
| पंचतंत्रातील प्रेरक गोष्टी | अनिल किणीकर | २५ |
| पंचतंत्रातील बोधपर गोष्टी | अनिल किणीकर | २५ |
| हितोपदेश : बोधप्रद कथा | मोहन वेल्हाळ | ३० |
| हितोपदेश : मनोरंजक कथा | मोहन वेल्हाळ | ३० |
| हितोपदेश : प्रेरक कथा | मोहन वेल्हाळ | ३० |
| हितोपदेश : रोचक कथा | मोहन वेल्हाळ | ३० |
| जातक कथा : मनोरंजक | निर्मला सारडा | ३० |
| जातक कथा : प्रेरक | निर्मला सारडा | ३० |
| जातक कथा : रोचक | निर्मला सारडा | ३० |
| जातक कथा : शिक्षाप्रद | निर्मला सारडा | ३० |
| लाजवाब बिरबल | निर्मला सारडा | ३० |
| विनोदवीर बिरबल | निर्मला सारडा | ३० |
| चतुर बिरबल | निर्मला सारडा | ३० |
| बुद्धिमान बिरबल | निर्मला सारडा | ३० |
| शेखचिल्लीचे किस्से | निर्मला सारडा | २५ |
| मन्नो | मंजूषा आमडेकर | २५ |
| रंगांची रंगीत गोष्ट | मंजूषा आमडेकर | ३० |
| मोठ्यांच्या छोट्या गोष्टी | माधव मोर्डेकर | ३० |
| खेळ खेळा चित्रं रंगवा | रमेश मुधोळकर | ३० |
| रमज्या गमज्या आणि जम्मत गोष्टी | अरुंधती महाम्बरे | ३० |
| ठकुबाई ठेंगे आणि जम्मत गोष्टी | अरुंधती महाम्बरे | ३० |
| बुटुकबैंगण विसरभोळे आणि जम्मत गोष्टी | अरुंधती महाम्बरे | ३० |

**पोस्टेज खर्च वेगळा**

**मेहता पब्लिशिंग हाऊस,**

# कबूने धडा शिकवला

**ईशान पुणेकर**



म्हाताऱ्या मंजुलाबेन त्यांची पांढरी, गुजराथी पद्धतीने नेसलेली साडी सावरत टेरेसवर आल्या. त्यांनी आणलेली ज्वारी टेरेसवर टाकली. स्वामीनारायणाचं नाव घेतलं. मग सूर्याला नमस्कार करून त्या खाली गेल्या.

तिथे ज्वारी खाण्यासाठी अनेक कबुतरं जमा झाली. त्यातच

एक कबुतरांची जोडी होती. त्यांच्याबरोबर त्यांचं कबू नावाचं पिल्लूही होतं. कबू तसा खूप लहान नव्हता; पण खूप मोठाही नव्हता.

कबू डौलात चालत, चोच मारत ज्वारीचे दाणे टिपत होता.



''कबू, लक्षात ठेव. इथे टेरेसवर ही छोटी भिंत आहे. त्याच्या पलीकडे एक घर आहे.''

''माहितीये गं आई!''

''पण हे माहिती आहे का? तिथे नवीन लोक रहायला आले आहेत. त्यांच्याकडे एक बोका आहे. त्याच्यापासून सावध रहा!''

असं म्हणेपर्यंत तो बोका आलाच. सगळी कबुतरं भर्रकन् उडाली. कबूची आई तर थोडक्यात वाचली, पण उडाली.



"पाहिलंस कबू", पाण्याच्या टाकीवर बसून आई म्हणाली, तिला नीट बोलताही येत नव्हतं.

कबूला वाईट वाटलं आणि रागही आला. पण काय करणार?

तो बोका नेहमी तसाच वागू लागला. तो नसेल तेव्हाच कबुतरं दाणे टिपायला खाली उतरू लागली.

मग एकदा... कबू लवकर पाण्याच्या टाकीवर येऊन बसला होता. हळूहळू इतरही कबुतरं येऊन बसली. पण मंजुलाबेन आल्या नव्हत्या. थोड्या वेळाने त्या आल्या. बरोबर आणलेली साडी त्यांनी खाली पसरली. कबू पाहत होता. त्यांनी साडीवर लाल मिरच्या वाळत घातल्या.

कबुतरं निराश झाली. काही उडाली. पण कबू थांबला होता. मग त्या आजी पुन्हा खाली गेल्या, त्या वेळी त्यांनी ज्वारी आणली. टेरेसवर मिरच्यांच्या पलीकडे टाकली. कबुतरं खाली आली. कबूही आला, दाणे टिपू लागला.



तो बोका लपत-छपत आवाज न करता आला. तरीही कबुतरांना त्याची चाहूल लागली. ती उडाली. पण कबूला कळूनही तो उडाला नाही. तो कानोसा घेत होता. बोक्याने झेप टाकली. कबू शेवटच्या क्षणी उडाला. बोक्याची झेप मिरच्यांमध्ये पडली. कबू थोडासा उडाला. पुन्हा पलीकडे मिरच्यांमध्येच बसला. बोक्याने त्याच्यावर परत झेप टाकली.



आता मात्र कबू उंच उडाला होता. बोक्याची झेप पुन्हा पडली मिरच्यांमध्ये. त्याचे पाय घसरले आणि तो मिरच्यांमध्ये लोळला.

कबू उडून पाण्याच्या टाकीवर जाऊन बसला. पण मिरच्यांमध्ये लोळल्याने बोक्याच्या पाठीची आग-आग झाली. केसांमुळे फार नाही, पण काही ठिकाणी मात्र अगदी सहन न होण्याइतकी.



पाठीवर अडकलेली मिरची पंजाने उडवताना बोक्याने रागाने कबूकडे पाहिलं. कबूला हसू आलं. एवढासा कबू, बोक्याला युक्तीने धडा शिकवू शकला होता. मग तो उंच उडून दुसऱ्या टेरेसवर गेला. ❐

## मुलाखत



# लँडमार्क

## टाटा गटाची ग्रंथदालने

**हेमू रामय्या -** लँडमार्क ग्रुपच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती हेमू रामय्या यांनी इंग्लिश लिटरेचर घेऊन एम. ए. करीत असतानाच १९७८ साली दानाई बुक शॉपमध्ये अर्धवेळ काम पत्करले. एम. ए. ची परीक्षा झाल्यावर तेथेच त्यांनी पूर्ण वेळ नोकरी सुरू केली. १९७८ ते १९८५ दरम्यान ५ मोठ्या हॉटेल्समध्ये ५ ग्रंथदालने दानाईने सुरू केली. ही ग्रंथदालने उभारण्यात हेमू रामय्या यांचा मोठा वाटा होता. त्यानंतर स्वत:च ग्रंथविक्री केंद्राची मालिका सुरू करण्याचा निर्णय त्यांनी घेतला आणि लँडमार्क ग्रुपचा शुभारंभ १९८७ मध्ये केला. लँडमार्कची सध्या १० ग्रंथदालने आहेत. पुढे वेस्टलँड ह्या नावाने प्रकाशनही सुरू केले. 'ईस्टवेस्ट' या संस्थेच्या मदतीने पुस्तकांच्या वितरणाचेही काम सुरू केले. गेल्या तीस वर्षातला ग्रंथव्यवहाराचा विपुल अनुभव त्यांच्या गाठीशी आहे.

**प्रश्न - ग्रंथांच्या किरकोळ विक्रीव्यवस्थेत आपण काम करावे असे तुम्हाला का वाटले?**

**उत्तर -** शालेय वयापासूनच मला पुस्तकांची आवड होती आणि पुस्तकांच्याच जगात रमावे असे मला वाटत असे. त्यामुळे बीएला आणि एम. ए.ला मी इंग्रजी वाङ्मय हा विषय घेतला. एम. ए. ला असतानाच चेन्नईच्या दानाई बुक शॉपमध्ये अर्धवेळ काम स्वीकारले. त्यामुळे नवी पुस्तके हाताळण्याची संधी मिळाली आणि ग्रंथव्यवहाराची प्राथमिक माहिती झाली.

एम. ए. ची परीक्षा झाल्यावर दानाई बुक्सच्या मालकांनी व्यवसायाचा व्याप वाढवण्याचा निर्णय घेतला. वेगवेगळ्या भागात, पुस्तकांची दुकाने सुरू करण्याचे ठरवले. मला त्यादृष्टीने तयारी करण्यास सांगितले. एका पंचतारांकित हॉटेलमध्ये ग्रंथदालन सुरू करण्यासाठी आमच्याकडे विचारणा झाली. मी त्या हॉटेलच्या व्यवस्थापकांना जाऊन भेटले. त्यांच्याशी चर्चा केली. आणि तेथे ग्रंथदालन सुरू करण्यास दानाईला प्रवृत्त केले. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. त्यानंतर पाच वर्षात इतरही हॉटेल्समध्ये ग्रंथदालने सुरू व्हावीत म्हणून प्रयत्न केले. पाच ग्रंथदालनांमुळे व्यवसायाची उलाढाल जागेत पैसे न गुंतवता चांगलीच वाढली.



**हेमू रामय्या**

लँडमार्क ग्रुपच्या मुख्य कार्यकारी अधिकारी

**प्रश्न - १९८७ साली लँडमार्क सुरू करताना काही अडचणी आल्या का?**

**उत्तर -** हॉटेल्समधील ग्रंथदालनांना जागेची मर्यादा असे. त्यामुळे तेथे मोजकीच पुस्तके ठेवता येत. मला मोठी प्रशस्त ग्रंथदालने व पुस्तकविक्री केंद्रे असावी असे वाटे. माझ्या मनासारखे त्यावेळी ग्रंथविक्री केंद्र कुठेच बघायला मिळत नव्हते. आपण असे एखादे ग्रंथविक्री केंद्र सुरू करावे असे मग मनात आले. त्यावेळी ग्रंथविक्रीला उद्योगाचा दर्जा नव्हता. त्यामुळे बँका कर्ज देण्यास तयार नसत. ग्रंथांची आवड असणारे आणि ग्रंथवितरण- विक्रीत अनुभव असलेले प्रशिक्षित लोकही दुर्मिळ होते. तरीही मी धाडस करायचे ठरवले. १९८७ साली पहिले लँडमार्क बुकस्टोअर सुरू केले. वाचक ग्राहकांनी त्याला उदार आश्रय दिला. इतर गावातील वाचक हे प्रशस्त ग्रंथदालन बघून खूष होत. तसेच बुकस्टोअर आमच्या शहरात का काढत नाही असे विचारत... त्यामुळे आम्ही अल्पावधीतच भारताच्या वेगवेगळ्या शहरांत दहा स्टोअर्स सुरू केली.

**प्रश्न - ग्रंथविक्रेते, वितरक आणि ग्रंथ दालनांचे प्रवर्तक म्हणून काय काय अनुभव आले?**

**उत्तर -** किरकोळ विक्री वितरणामुळे नवीन पुस्तकांची अद्ययावत माहिती आम्हाला मिळू लागली. त्यामुळे कोणत्या पुस्तकांना जास्त मागणी आहे कोणते वाङ्मय प्रकार किंवा लेखक जास्त खपतात वगैरे अंदाज येई, त्यानुसार योग्य त्या पुस्तकांची

उपलब्धता राहील अशी दक्षता घेण्यात येई.

**प्रश्न - ईस्टवेस्ट बुक्सच्या गौतम पद्मनाभन यांच्याशी आपले सहकार्य कसे सुरू झाले?**

**उत्तर -** प्रकाशकांकडून आम्हाला किरकोळ विक्रेते म्हणून कमिशन आणि इतर सवलती फार कमी मिळत, तेव्हा आम्ही ठोक वितरक म्हणून काम करायचे ठरवले. सुदैवाने ईस्टवेस्ट बुक्सच्या गौतम पद्मनाभन यांनी त्याबाबत सहकार्याचा हात पुढे केला. लँडमार्कने वेस्टलँड बुक्स ही स्वत:चीच प्रकाशन संस्था सुरू केली. तिच्या प्रकाशनांचे वितरण करण्यासाठी ईस्टवेस्ट बुक्सशी करार केला. तसेच ईस्टवेस्टकडे वितरणासाठी असणारी पुस्तके लँडमार्कद्वारे विकणे सुरू केले. त्यामुळे बाजारातील स्पर्धेला आम्ही अधिक आत्मविश्वासाने तोंड देऊ लागलो. आमच्याकडे मिळणाऱ्या पुस्तकांची विविधता वाढली. इतर विक्रेत्यांनाही आमच्यामार्फत पुस्तके घेणे क्रमप्राप्त ठरले. भारतभर आमच्या शाखा असल्याने कुठलेही पुस्तक सर्व मोठ्या शहरांमध्ये अल्पावधीत उपलब्ध होणे सुलभ ठरले. ग्रंथ व्यवहाराची उलाढाल वाढवण्याच्या दृष्टीने ही व्यवस्था अगदी आदर्श ठरली. आमच्या आर्थिक स्थैर्यालाही या व्यवस्थेने चांगलाच हातभार लावला.

ग्राहक वाचक आणि वितरक यांची सांगड घालण्याचाही आम्ही प्रयत्न केला. विशिष्ट वाचकवर्ग समोर ठेवून त्यांच्या दृष्टीने उपयुक्त असणाऱ्या पुस्तकांची माहिती त्याला पाठवण्याची योजना आखली. नवीन पुस्तकांचा केवळ ब्लर्ब वाचून त्याबद्दल मत बनवण्याऐवजी संपूर्ण पुस्तक वाचून आशयाच्या दृष्टीने नवे कोही देणारी पुस्तके निवडून त्यांच्या वैशिष्ट्यांकडे वाचक-ग्राहकांचे लक्ष वेधण्यासाठी जाणकार अभ्यासकांची मदत घेतली. चांगली व महान पुस्तके वाचकांपर्यंत पोचवण्यासाठी योजना आखल्या. त्यामुळे आमच्या विक्रीत मोठी वाढ झाली.

**प्रश्न - तुमचे पती जय सुब्रम्हण्यम आणि तुम्ही दोघात कामाची वाटणी कशी केली गेली आहे?**

**उत्तर -** माझे पती चार्टर्ड अकाऊंटंट आहेत. आर्थिक व्यवहारात ते तरबेज आहेत. ते आमच्या आर्थिक व्यवहाराची बाजू सांभाळतात. मला व्यवसाय वाढीसाठी लागणारे भांडवल योग्यवेळी योग्य प्रमाणात मिळेल याबाबत ते दक्ष असतात. गेली १८/२० वर्षे आमची जोडी अत्यंत गुण्यागोविंदाने हे काम करीत आहे.

**प्रश्न - लँडमार्क ग्रुप हा आता प्रतिष्ठित हायपर मार्केट रिटेल चेन म्हणून सर्वांना ज्ञात आहे. पुस्तकांबरोबर खेळणी, स्टेशनरी माल आणि इतरही वस्तू आपण विकता. लँडमार्कमध्ये या प्रत्येकाला जागा किती मिळते?**

**उत्तर -** ते त्या त्या स्टोअर्सच्या क्षेत्रफळावर निर्भर असते. लखनौमधील स्टोअर ३२ हजार चौरस फूट क्षेत्रफळाचे आहे. तेथे पुस्तकांना १० हजार चौ. फूट जागा

मिळालेली आहे. संगीत विभागाला साडेसात हजार चौ. फूट आणि उरलेली जागा स्टेशनरी, खेळणी यांना दिली आहे. परंतु यात नेहमी त्या त्या सीझनप्रमाणे कमीजास्त होत राहते.

**प्रश्न - प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची कमतरता आपणास भासत असेल. त्यासाठी आपणास काय प्रयत्न करावे लागतात?**

**उत्तर -** आमचे बरेचसे सहकारी हे दीर्घकालापासून आमच्याबरोबर काम करीत आहेत. त्यांना आम्ही प्रशिक्षण देऊन तयार केले आहे. प्रत्यक्ष कामामुळेही त्यांना अनुभव मिळत असतो. नव्या शाखांमध्ये आम्ही या सहकाऱ्यांना वरच्या श्रेणीवर नेमून त्यांच्या कामाची पावती देतो. आमच्याकडे रिटेल क्षेत्रात तयार झालेले लोक इतरही रिटेल चेनमध्ये उच्च पदावर आहेत. आम्हाला त्यांचा अभिमान वाटतो.

**प्रश्न - टाटा गटाने लँडमार्कमध्ये प्रवेश केल्यामुळे लँडमार्कच्या व्यवस्थापनात काय बदल झाला?**

**उत्तर -** श्री. नवल टाटा हे टाटा गटाचे अध्यक्ष आहेत. मी लँडमार्कची मुख्य कार्यकारी अधिकारी आहे. टाटांचा एक प्रतिनिधी आमच्या संचालक मंडळावर असतो. आम्ही एक टीम म्हणून काम करतो. भावी विस्ताराच्या दृष्टीने आणि विकासाच्या दृष्टीने मिळून सर्व धोरणे ठरवली जातात. भावी विस्तार हा संख्यात्मक वाढीपेक्षा गुणात्मक असावा असाही आमचा दृष्टिकोन आहे.

**प्रश्न - प्रकाशन क्षेत्रात नवीन काही प्रकल्प हाती घेतले आहेत का?**

**उत्तर -** चिकन सूप फॉर द सोल या गाजलेल्या मालिकेच्या भारतीय पुनर्मुद्रणाचे आणि वितरणाचे हक्क आम्ही मिळवून, ती पुस्तके काढण्यास आरंभ केला आहे. त्याचप्रमाणे इतर अनेक आंतरराष्ट्रीय बेस्टसेलर्सचे हक्क मिळवले आहेत. प्रकाशन विभागाच्या प्रमुख संपादिका म्हणून निलंजना रॉय यांची नेमणूक केली आहे. त्या बिझनेस स्टँडर्डमध्ये स्तंभलेखन करीत असतात. अनेक पुस्तकांची तयारी चालू आहे.

**प्रश्न - पुस्तके उपलब्ध झाली तर आपोआप मागणी वाढते. (सप्लाय क्रिएटस् इट्स ओन डिमांड) आणि 'मंदीचा काळ हा कुठल्याही कामाचा आरंभ करण्यास उत्तम काळ असतो' असे आपण म्हणता. ते थोडे स्पष्ट करून सांगाल का?**

**उत्तर -** या दोन्ही सूत्रांवर आमचा विश्वास आहे; आणि तो काळाच्या कसोटीवरही उतरला आहे. आरंभी जम बसविण्यासाठी बराच वेळ आणि पैसा लागतो; परंतु लोकांमध्ये वाचनसंस्कृती जशी वाढत आहे, तसतसा पुस्तकांचा खप वाढत आहे हे आपण बघतच आहो. आमच्याशी वाचक एकनिष्ठ आहेत आणि आम्हीही त्यांच्याशी एकनिष्ठ आहोत.

**प्रश्न - इंग्लंडमधून आपल्याला ब्रिटिश-युरोपियन आंतरराष्ट्रीय स्टँडर्ड सर्टिफिकेट मिळाले आहे. त्यामुळे काय फायदा होईल?**

**उत्तर -** त्यामुळे आमच्या कार्यपद्धतीत एक प्रकारची शिस्त आणि व्यवस्था निर्माण होते. देशात वेगवेगळ्या ठिकाणी आमचे काम चालू असले. तरी सर्व ठिकाणी विशिष्ट पद्धतीने अंतर्गत कामाचे नियोजन व नियंत्रण होत राहावे, त्याचा दर्जा सांभाळला जावा असा प्रयत्न जाणीवपूर्वक केला जातो.

**प्रश्न - तरुण उद्योजकांना आपला यशाचा मंत्र सांगायचा झाला तर?**

**उत्तर -** आपल्या हृदयाचा आवाज ऐका. योग्य तेव्हा जाणीवपूर्वक धोके पत्करा, धाडस करा. काहीतरी शिकण्यासाठी सदैव श्रवण करीत राहा.

**प्रश्न - भावी योजना?**

**उत्तर -** आमचा संख्येपेक्षा गुणवत्तेवर विश्वास आहे. भारतातील प्रथम क्रमांकाचे ग्रंथविक्रेते, प्रकाशक आणि ऑनलाइन ग्रंथविक्रेते बनावे असा आमचा निर्धार आहे.

***(पब्लिशिंग टुडे, सप्टेंबर २००७)***

## मेहता पब्लिशिंग हाऊसची दर्जेदार ग्रंथसंपदा

### वाचकमित्रहो...

महाराष्ट्रातील तसेच महाराष्ट्राच्या बाहेर जगभरातील कोट्यावधी मराठी वाचकांपर्यंत पोहोचण्यासाठी 'मेहता पब्लिशिंग हाऊस' विविध माध्यमांद्वारे सतत प्रयत्नशील असते. www. mehtapublishinghouse.com या आमच्या वेबसाईटची जगभरातील मराठी वाचकांनी आवर्जून दखल घेतली आहे. 'मेहता मराठी ग्रंथजगत' सोबतच विविध वृत्तपत्रे, प्रसारमाध्यमांद्वारे आमच्या साहित्यसंपदेची ओळख मराठी वाचकाला आहेच...

आता पुणे आकाशवाणीच्या सहकार्याने दर गुरुवारी, सकाळी ठीक सात वाजून पन्नास मिनीटांनी (बातम्यांनंतर) आपण मेहता पब्लिशिंग हाऊसच्या पुस्तकांची ओळख 'ऐकू' शकाल. 'इथे पुस्तके भेटतात' मध्ये.

**चला तर मग... भेटूया दर गुरुवारी सकाळी ठीक ७:५० वाजता 'पुणे आकाशवाणीवर'.**

# अमरगीत

बाबा आमटे यांचं जीवनचरित्र

**निशा मीरचंदानी**
अनुवाद **लीना सोहोनी**

**किंमत २००रु.**
**पोस्टेज २५रु.**




सधन जमीनदारांच्या घरात जन्माला आलेले मुरलीधर देवीदास आमटे हे स्वभावत: बंडखोर वृत्तीचे, आयुष्य भरभरून जगण्याची इच्छा असलेले! पण आयुष्यात फार लवकर एका गोष्टीची त्यांना तीव्रतेने जाणीव झाली; आपल्याला जगायचंय ते स्वत:साठी नाही, तर दुसऱ्यांसाठी. अन्यथा हे सारं वैभव, हा मानसन्मान,

ही बुद्धिमत्ता... हे सगळं फोल, तकलादू, बेगडी ठरेल.

मग सुरुवात झाली ती आनंदवनात कुष्ठरुग्णांसाठी उभारलेल्या वसाहतीने. त्यानंतर राष्ट्रीय एकात्मता आणि सलोखा यांचा पुरस्कार करण्यासाठी भारताच्या पूर्व-पश्चिम आणि उत्तर-दक्षिण टोकांना जवळ आणणारं भारत जोडो अभियान झालं. त्यापुढचं पाऊल म्हणजे बाबांचं नर्मदा खोऱ्यातील दहा वर्षांचं प्रदीर्घ वास्तव्य. सरकारने पर्यावरणाचा योजनाबद्ध विनाश चालविला होता, त्यामुळे होरपळून निघणाऱ्या कुटुंबांच्या पाठीशी, बाबा उभे राहिले. हे सर्व करीत असताना पाठीच्या कण्याच्या असाध्य व्याधीने त्यांच्या शरीराला ग्रासून टाकले होते.

बाबांच्या ध्येयस्वप्नांची व्याप्ती किती मोठी आहे, याचं तळपतं उदाहरण म्हणजे बाबा आमटे यांच्या मुला-नातवंडांच्या तीन पिढ्यांनी आजवर हजारो लोकांची आयुष्यं आमूलाग्र बदलून टाकली आहेत. बाबांच्या स्वप्नांची पूर्तता होण्यामागे त्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या अदम्य इच्छाशक्तीचाही फार मोठा वाटा आहे.

सहवेदना, करुणा, निरपेक्ष बुद्धीने केलेली सेवा,

ताई आणि बाबांचं – हे यथार्थ चित्रण आहे!

**मेहता पब्लिशिंग हाऊस,**

# पुरस्कार

## * ज्ञानेश्वर मुळे यांना 'साहित्यश्री' पुरस्कार

हिंदी साहित्यातील योगदानाबद्दल भारतीय परराष्ट्र सेवेतील अधिकारी ज्ञानेश्वर मुळे यांचा 'साहित्यश्री' पुरस्काराने गौरव करण्यात आला. प्रशस्तिपत्र, सन्मानचिन्ह, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे. 'दिल्ली हिंदी साहित्य संमेलन' या संस्थेतर्फे सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती आर. सी. लाहोटी यांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

बिगर हिंदीभाषक असूनही हिंदीत लिखाण करणाऱ्यांच्या श्रेणीत श्री. मुळे यांचा गौरव करण्यात आला. श्री. मुळे यांनी यावेळी आपल्या आगामी हिंदी काव्यसंग्रहातील दहशतवादावरील कविता ऐकविली.

## * सीमा व रमेश देव यांना व्ही. शांताराम पुरस्कार

महाराष्ट्र राज्य सरकारकडून देण्यात येणारा चित्रपती व्ही. शांताराम पुरस्कार रमेश देव आणि सीमा देव यांना जाहीर झाला आहे. तर राजकपूर पुरस्कारासाठी गीतकार, कवी आणि दिग्दर्शक गुलजार यांची निवड झाली आहे.

औरंगाबादमध्ये २९ एप्रिल रोजी या कलावंतांना सन्मानित करण्यात आले. सव्वालाख रुपये, मानपत्र व मानचिन्ह असे व्ही. शांताराम या पुरस्काराचे स्वरूप आहे.

गुलजार यांना ही एक लाख रुपये, मानपत्र, मानचिन्हाने सन्मानित करण्यात आले. यापूर्वी रामानंद सागर, मास्टर भगवान, केदार शर्मा, श्रीमती संध्या, नौशाद, रजनीकांत, यश चोप्रा, राजेश खन्ना आदी या पुरस्काराचे मानकरी

ठरले आहेत.

रमेश देव यांनी १९० मराठी, हिंदी चित्रपटात नायक, खलनायक तसेच चरित्र नायकाच्या भूमिका साकारल्या आहेत. सीमा देव यांनी सुमारे १०० हिंदी व मराठी चित्रपटांत विविध भूमिका केल्या आहेत.

*** आनंद यादव यांना 'गिरणा गौरव पुरस्कार'**

'गिरणा गौरव पुरस्कार' या वर्षी ज्येष्ठ साहित्यिक आनंद यादव यांना देण्यात आला. समाजाच्या विविध क्षेत्रांत सातत्याने कार्य करणाऱ्या व्यक्तीची या पुरस्कारासाठी निवड केली जाते. गिरणा गौरव प्रतिष्ठान ही सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक क्षेत्रांत विधायक आणि रचनात्मक कार्य करणारी संस्था असून, १९९९ पासून विविध क्षेत्रांत कार्यरत आहे.

डॉ. यादव यांची कविता, कथा, कादंबरी, ललित गद्य, समीक्षा साहित्य विषयक आजवर चाळीस पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

'साहित्य अकादमी'चाही पुरस्कार त्यांना मिळाला आहे.

*** डॉ. देखणे यांच्या पुस्तकाला स्वामी स्वरूपानंद पुरस्कार**

समाजातील वाद संपुष्टात येऊन संवाद वाढावा, हेच संतसाहित्याचे प्रयोजन आहे, असे विचार संतसाहित्याचे अभ्यासक डॉ. रामचंद्र देखणे यांनी व्यक्त केले.

पुणे विद्यापीठाच्या संत नामदेव अध्यसनातर्फे महाविद्यालय आणि विद्यापीठ विकास मंडळाचे (बीसीयूडी) संचालक व प्रसिद्ध विज्ञानलेखक डॉ. पंडित विद्यासागर यांच्या हस्ते देखणे यांच्या 'आनंदाचे डोही' या पुस्तकास स्वामी स्वरूपानंद पुरस्कार प्रदान करण्यात आला. 'सकाळ'चे संपादक यमाजी मालकर, पावस येथील स्वामी स्वरूपानंद सेवा मंडळाचे वसंतराव देसाई, पुस्तक परीक्षण समितीच्या डॉ. लीला गोविलकर, अध्यासनाच्या प्रमुख डॉ. वीणा मनचंदा आणि प्रकाश जोशी हे सर्व यावेळी उपस्थित होते. पुरस्काराच्या रकमेत वाढ करण्यासाठी मंडळातर्फे अध्यासनास एक लाख रुपयांची देणगी देण्यात आली. पंढरपूरच्या विठ्ठल-रखुमाई देवस्थान समितीचे अध्यक्ष शशिकांत पागे यांच्या हस्ते डॉ. विद्यासागर यांना हा धनादेश देण्यात आला. प्रकाशक प्रवीण जोशी यांचा या प्रसंगी सत्कार करण्यात आला.

देखणे म्हणाले, ''ज्ञानेश्वर ज्ञानाचे, तुकोबा भक्तीचे, नामदेव प्रीतीचे, नाथमहाराज शांतीचे आणि समर्थ रामदास क्रांतीचे प्रतीक आहेत. संतसाहित्याने अध्यात्मनिष्ठ मानवतावादाची बैठक घालून दिली. जागतिक सर्व संकल्पनांवर संतसाहित्याचा प्रभाव आहे. स्वामी स्वरूपानंद पुरस्कार म्हणजे वासुदेवाच्या झोळीतील आनंदाचे दान आहे.''

मालकर म्हणाले, ''सध्या व्यवहारातून आपण सहजता हरवून बसलो आहोत.

ही सहजता मिळविण्यासाठी संतविचारांतील चिंतन समजून घेणे महत्त्वाचे आहे.'' डॉ. विद्यासागर म्हणाले, ''जनुक, जैवतंत्रज्ञान, क्लोनिंग या पातळीवर आपण विषय समजून घेतो. पण आचार, विचार, प्रेम, परस्परसंबंध याचे आकलन अद्याप आपल्याला झालेले नाही. संकुचित विचारांतून हरवत चाललेली संवेदनशीलता टिकवून ठेवण्यासाठी संतसाहित्याचा अभ्यास केला पाहिजे.''

राज्यातील नऊ विद्यापीठांमध्ये हा पुरस्कार प्रदान करण्यात येत असल्याचे वसंतराव देसाई यांनी सांगितले. वीणा मनचंदा यांनी प्रास्ताविकात अध्यासनाच्या उपक्रमांची माहिती दिली.

*** डॉ. संगीता बर्वे यांच्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन**

'नवे कवी : नवी कविता' या मालिकेतून अनेक श्रेष्ठ कवींची ओळख पॉप्युलरने मराठी साहित्यविश्वाला करून दिली. हा शोध सातत्याने सुरू आहे. नवनवीन कवितासंग्रहांमुळे पॉप्युलरची कवितासंग्रहाची यादी समृद्ध होत आहे. त्यात संगीता बर्वे यांच्या 'दिवसाच्या वाटेवरून' या आणखी एका कवितासंग्रहाची भर पडली आहे.

पेशाने डॉक्टर असलेल्या संगीता बर्वे यांनी आपल्या व्यवसायाच्या अनुषंगाने आलेल्या अनेकरंगी अनुभवांचे, डोळस आणि सहृदय संवेदनक्षमतेचे प्रतिबिंब त्यांच्या कवितेतून सहजपणे उमटविलेले आहे. सहजता आणि प्रांजलपणा हा या कवितांचा स्थायीभाव आहे. स्वत:चा चेहरा असलेल्या या विविधरंगी कविता रसिकांना नक्कीच भावतील. संगीता बर्वे सातत्याने व निष्ठेने एका झोपडपट्टी वस्तीत वैद्यकीय व्यवसाय करीत आहेत. त्या वस्तीमधील जीवन त्यांनी केवळ कुतूहलापोटी नव्हे तर सुजाण मन:पूर्वकतेने पाहिले आहे. त्याच्याशी त्या समरस झाल्या आहेत. त्यामुळे या सभोवतालच्या जीवनातील सुखदु:खे व समस्या यांचे प्रश्न या कवितेतून उतरले आहेत. कवितेविषयीचे, तिच्या अस्तित्वाशी एकरूप झालेले गाढ प्रेम, स्त्रीजीवनाच्या वास्तव परिस्थितीविषयी उत्कट तळमळ आणि स्वत:च्या आत्ममग्न मनाचा घेतलेला शोध या सगळ्याची प्रचिती 'दिवसाच्या वाटेवरून' या संग्रहातून येते.

दिवसाच्या वाटेवरून या काव्यसंग्रहाचे प्रकाशन कुलगुरू डॉ. दीपक टिळक (टिळक महाराष्ट्र विद्यापीठ) आणि ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक रा. ग. जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. संग्रहातील निवडक कवितांचे संगीता बर्वे यांनी वाचन केले.

गेल्या ७५ वर्षांपासून पॉप्युलर प्रकाशन कार्यरत असून त्याला राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय असे अनेक पुरस्कार मिळालेले आहेत. पॉप्युलर प्रकाशनचे नाव

नेहमीच उत्तम दर्जाचे लिखाण आणि डिजाईन तसेच प्रकाशनासोबत जोडलेले आहे. त्यांनी वैद्यकशास्त्र आणि सामाजिकशास्त्र या विषयांमधील पुस्तकांपासून प्रथम सुरुवात केली. जीवनशैलीच्या पुस्तकांव्यतिरिक्त समाजकारण, राजकारण, धार्मिक, इतिहास, आत्मचिंतन, शिक्षण आणि वैद्यकशास्त्र  या विषयांवरील अनेक पुस्तके आहेत. नुकतेच पॉप्युलर प्रकाशनने २००७ साठी एक्सलेन्स इन बुक प्रॉडक्शनसाठी ३ पुस्तकांसाठी दि फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्सकडून पुरस्कार संपादन केले.

*** 'चिराग' पुरस्कार**

''कलाकाराला मिळणारा प्रत्येक पुरस्कार ही एक नवी सुरुवात असते. 'इथेच थाबू नकोस, पुढे जा' असेही पुरस्कार सांगत असतो; कलाकाराला प्रेरणा देत असतो,'' अशा शब्दात पुरस्काराचे महत्त्व पं. जसराज यांनी सांगितले.

रोटरी क्लब ऑफ पुणे अपटाऊन आणि इनरव्हील ग्रुप यांच्यातर्फे आयोजित कार्यक्रमात ज्येष्ठ गायक आणि गुरू पं. कमलाकर जोशी यांना पं. जसराज यांच्या हस्ते 'चिराग पुरस्कार' प्रदान करण्यात आला. दहा हजार रुपये आणि मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. चर्मचक्षूंअभावी खचून न जाता, प्रज्ञाचक्षूंनी स्वरसाधना करत स्वत:ला आणि शिष्यांना घडवणारे पं. जोशी यांच्या योगदानासाठी त्यांना हा पुरस्कार देण्यात आला.

पं. जसराज या प्रसंगी म्हणाले, ''पं. जोशी यांचा सन्मान हा मला स्वत:चा सन्मान वाटतो. त्यांचे गुरू पं. खरवंडीकर यांच्यासह एकत्र काम केले आहे. त्यांची शैली मला माहिती आहे, त्यांचे शिष्य असणारे पं. जोशी यांनाही उत्तम विद्या मिळाली असणार, याची मला खात्री आहे.''

पुण्याविषयी ते म्हणाले, 'पुणेकरांचे माझ्यावर आणि माझे पुण्यावर अतिशय प्रेम आहे. संस्कृतीचा ध्वज घेऊन हे शहर उभे आहे. मी जेव्हा इथे येतो त्या प्रत्येक वेळी हे शहर मला काही तरी देत आले आहे. माझ्या नावाचा पुरस्कारही प्रथम याच शहरात दिला गेला आणि त्याचे अनुकरण जगभराने केले. माझा शिष्य संजीव अभ्यंकर याच शहरातील आहे. मी त्याला शिकवताना स्वत:ही शिकत गेलो आहे. सिखाना और सिखना एकसाथ हुआ है' असाही उल्लेख त्यांनी केला.

पं. जोशी म्हणाले, ''माझी संगीताची आवड छंदातून वाढत गेली. माझा हा सन्मान माझ्या गुरुंमुळे आहे. त्यांनीच मला घडवले आहे आणि पं. जसराज यांच्या हस्ते हा पुरस्कार मिळणे भाग्याचे आहे.''

क्लबचे अध्यक्ष गिरीश लांडगे यांनी पुरस्काराची पार्श्वभूमी सांगितली. आनंद परांजपे, प्रशांत देशमुख आणि ज्ञानेश पंढारे यांनी परिचय करून दिला. आनंद माडगूळकर यांनी सूत्रसंचालन केले.

## * 'सांगात'ला मॅकआर्थर पुरस्कार

बालकांचा मानसिक विकास व्हावा आणि कौटुंबिक आरोग्य सुदृढ रहावे यासाठी सेवाभावे काम करणाऱ्या गोव्यातील सांगात या संस्थेला यंदाचा आंतरराष्ट्रीय मॅकआर्थर पुरस्कार जाहीर झाला आहे. द जॉन डी अ‍ॅण्ड कॅथरीन टी मॅकआर्थर फाऊंडेशनचे अध्यक्ष जोनाथन फॅन्टन यांनी शिकागो येथे या पुरस्काराची घोषणा केली. जगातील सहा देशातील आठ संस्थांना हे पुरस्कार जाहीर झाले असून सांगात ही आशियातील एकमेव संस्था आहे. पुरस्कारात ३ लाख ५० हजार अमेरिकन डॉलर आणि सन्मानचिन्हाचा समावेश असून १२ जूनला शिकागो कार्यालयात हे पुरस्कार प्रदान केले जातील.

सांगात या कोकणी शब्दाचा अर्थ 'साथ-संगत' असा होतो. गोव्यातील जनतेच्या मानसिक तसेच आरोग्यविषयक स्वास्थ्य सुदृढ ठेवण्यासाठी या संस्थेची स्थापना १९९६ साली झाली. लंडन स्कूल ऑफ हायजिन अ‍ॅण्ड ट्रॉपिकल मेडिसिनचे प्रोफेसर आणि जागतिक स्तरावरचे मानसोपचार तज्ज्ञ डॉ. विक्रम पटेल यांच्या प्रेरणेतून ८ कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने ही संस्था सुरू झाली. आज या संस्थेचे जाळे संपूर्ण गोवाभर पसरले असून ८० तज्ज्ञ कार्यकर्ते काम करत आहेत. दक्षिण गोव्यातील मडगावजवळील राया आणि उत्तर गोव्यातील पणजीजवळील परवरी येथे सांगातची कार्यालये आहेत.

विश्राम शरद गुप्ते हे या संस्थेचे अध्यक्ष असून ते मुळचे नागपूरचे आहेत. याशिवाय सौदीअरेबियातील वास्तव्याच्या काळात आलेल्या अनुभवांवर आधारित विश्राम गुप्ते यांनी लिहिलेली 'अल् तमीर' ही कादंबरी गाजली आहे.

मूल ते कुटुंब असा सांगातच्या कार्याचा व्याप असून त्यात आत्मविश्वास गमावलेल्या मुलांसाठी सर्वसमावेशक शिक्षण, मानसिकदृष्ट्या खचलेल्या मुलांचे समुपदेशन, अतिरेकी मद्यप्राशनातून कुटुंबात निर्माण झालेला कलह, त्यामुळे घराचे बिघडलेले मानसिक स्वास्थ्य याबाबत कार्य करत आहे.

डॉ. विक्रम पटेल यांच्या प्रेरणेतून सांगातचे काम सुरू झाले आणि राज्य सरकारच्या प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या सहकार्याने गोवाभर पसरले. कोणत्याही रोगाची सांगड मानसिकतेशी घातली गेली की, त्याचा संबंध वेडेपणाशी जोडला जातो तो सर्वस्वी चुकीचा असून वस्तुत: तोही एक सर्वसामान्य आजारच असतो आणि त्यातून योग्य मार्ग काढला जाऊ शकतो. परंतू त्याकडे बघण्याची समाजाची दृष्टी अजूनही विकसित झालेली नाही. विश्राम गुप्ते म्हणाले, 'आत्मविश्वास गमावणं हाही एक मानसिक आजारच असू शकतो. मात्र, त्याकडे वेडेपणा म्हणून न बघता गमावलेला आत्मविश्वास परत मिळवण्यासाठी योग्य समुपदेशन झालं आणि असा आत्मविश्वास परत मिळवला गेला तर काय घडू शकतं हे 'तारे जमीं पर' या

चित्रपटातून जनतेसमोर आलं आहे. अशा पद्धतीचे काम आम्ही आधीच सुरू केले आहे!

मॅकऑर्थर पुरस्काराच्या रकमेतून सांगात क्लिनिकल ट्रेनिंग ॲण्ड रिसर्च अशा तीनही आघाड्यांवर संशोधन आणि उपचार करण्यासाठी गोव्यात एक नवे केंद्र उभारणार आहे. गेल्या वर्षी मॅकऑर्थर फाऊंडेशनचा पुरस्कार डॉ. राणी आणि डॉ अभय बंग शोधग्राम येथे चालवत असलेल्या सर्च या संस्थेला प्राप्त झालेला होता.

### * अनुराधा भोसले यांना पुरस्कार

दुसऱ्यांसाठी जगताना जो आनंद मिळतो, तो अन्य कशातही नाही, असे प्रतिपादन 'अवनी'च्या अनुराधा भोसले यांनी केले. जागतिक महिला दिनानिमित्त त्यांना व्हिक्टर पॅलेस पुरस्काराने कायदे सल्लागार उर्मिला जोशी यांच्या हस्ते सन्मानित केले. पाच हजार रुपये, प्रमाणपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. वंचितांच्या शिक्षणसेवेचे व्रत घेतलेल्या अनुराधा भोसले म्हणाल्या, ''भारत महासत्ता बनविण्याचे स्वप्न आपण पाहत आहे परंतु दर्जेदार पूर्व प्राथमिक शिक्षणाकडे मात्र दुर्लक्ष करतो. मुले शाळेत गेली आणि शिकली तरच ती देशाचे भविष्य उज्ज्वल करतील. दगड खाण, वीट भट्टीवरील मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे गरजेचे आहे. त्यांना सहानुभूती नको, संधी द्या, मदतीचा हात द्या.''

सौ. जोशी म्हणाल्या, ''महिलांनी दुसऱ्यांच्या मदतीची अपेक्षा न करता स्वत: लढले पाहिजे. संविधानाने दिलेल्या हक्काची जाणीव करून घेऊन त्यांचा योग्य तो वापर केला पाहिजे. लहानपणापासून मुलींच्यात योग्य निर्णय घेण्याची क्षमता निर्माण केली पाहिजे.''

व्हिक्टर पॅलसचे व्यवस्थापकीय संचालक विक्रमसिंह अपराध यांनी १९९८ पासून हा उपक्रम सुरू केला असून, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रांत नि:स्वार्थीपणे काम करणाऱ्या महिलांना पुरस्कार देण्यात येतात.

### * प्र. न. जोशी ग्रंथश्रेष्ठता पुरस्कार

स्नेहवर्धन प्रकाशनतर्फे देण्यात येणारे विविध पुरस्कार जाहीर करण्यात आले. 'लोकसत्ता'चे खास प्रतिनिधी अभिजित घोरपडे यांच्या 'लहरी हवा' या पुस्तकाला 'डॉ. प्र. न. जोशी विज्ञानमित्र ग्रंथश्रेष्ठता पुरस्कार' जाहीर झाला आहे.

अन्य पुरस्कार (अनुक्रमे लेखक, पुस्तक व कंसात पुरस्काराचे नाव यानुसार) पुढीलप्रमाणे : शिरीष कवडे, अभंग निरुपण खंड १ व ३ (डॉ. प्र. न. जोशी संतमित्र ग्रंथ श्रेष्ठता पुरस्कार), डॉ. वि. रा. करंदीकर, स्वामी विवेकानंद जीवनदर्शन (डॉ. वि. भि. कोलते समीक्षामित्र ग्रंथश्रेष्ठता पुरस्कार), डॉ. पुष्पलता राजापुरे-तापस, एकेक पान गळावया आणि नंतर... (संजीवनी मराठे साहित्य सखी ग्रंथश्रेष्ठता पुरस्कार)

निर्मला गोपाळ किराणे प्रकाशनमित्र उत्कृष्ट निर्मिती ग्रंथश्रेष्ठता पुरस्कार राज्य मराठी विकास संस्था व दत्ताजीराव कदम तांत्रिक शिक्षणसंस्थेच्या 'वस्त्रनिर्मिती खंड १ व २' या पुस्तकास जाहीर झाला आहे.

*** प्रदीप देशपांडे यांना मानव मंदिरचा पुरस्कार**

प्रदीप देशपांडे यांनी आपली पत्रकारितेवरील निष्ठा आणि विचारांवर ठाम राहण्याची क्षमता सिद्ध केली आहे. असे गौरवोद्‌गार ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांनी नागपूर येथे काढले. 'मानव मंदिर'च्या वतीने देण्यात येणारा प्रकाश देशपांडे स्मृती पुरस्कार' यंदा 'जनमाध्यम'चे प्रबंध संपादक आणि 'महाराष्ट्र टाइम्स'चे अमरावती येथील वार्ताहर प्रदीप देशपांडे यांना देण्यात आला.

अकरा हजार रुपये रोख व मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. 'देशपांडे यांनी व्यवस्थापन क्षेत्रात काम करताना संपादकीय जबाबदाऱ्याही सांभाळल्या. त्यामुळे आजही ते स्पर्धेत तेवढेच टिकून आहेत,' असे भावे म्हणाले.

*** जॉन कोलासो, दीपक मोहिते यांना स. गो. वर्टी पुरस्कार**

विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींना दिला जाणारा स. गो. वर्टी पुरस्कार यंदा 'महाराष्ट्र टाइम्स'चे मुख्य उपसंपादक जॉन कोलासो आणि 'लोकमत'चे उपसंपादक दीपक मोहिते यांना ३० मार्चला देण्यात आला.

ज्येष्ठ पत्रकार दिनू रणदिवे या सोहळ्याचे अध्यक्ष आणि मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष कुमार कदम प्रमुख पाहुणे होते.

कोलासो यांनी वसई तालुक्याचे पर्यावरण तसेच तिथला दहशतवाद हे विषय आपल्या लेखनातून प्रभावीपणे मांडले, असा गौरव वर्टी ट्रस्टने केला आहे.

*** विश्वास पाटील यांना वुमेन्स फाऊंडेशनचा पुरस्कार**

कोल्हापूर येथील वुमेन्स डेव्हलपमेंट अँड पब्लिक वेलफेअर फाऊंडेशनच्या वतीने 'पानिपत'कार विश्वास पाटील आणि साहित्यिक लीना सोहनी यांच्यासह ३८ जणांना वुमेन्स फाऊंडेशन पुरस्कार १० एप्रिलला वितरित केले गेले.

डीएसके उद्योग समुहाच्या (पुणे) अध्यक्ष सौ. हेमांगी डी. कुलकर्णी यांच्या उपस्थितीत व आयआयएई आयटी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्सचे (पुणे) संस्थापक-संचालक अंकुश शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली पुरस्कार वितरण झाले.

पुरस्कारप्राप्त व्यक्तींची क्षेत्रनिहाय नावे : कला : नितीन कुलकर्णी (दादांचा वारसदार), बाजीराव माने (चित्रकार), अरविंद पोवार (संगीत शिक्षक), सौ. सपना किशोर झंवर (गायन), संजय हळदीकर (कला दिग्दर्शक).

साहित्य : मधुकर मुसळे (रा. राधानगरी), संभाजी लव्हटे (रा. कोल्हापूर) व

सुजाता पेंडसे (ललित लेखक) सामाजिक : डॉ. पी. जी. कुलकर्णी (कोल्हापूर), डॉ. अशोक जगताप, सौ विनया घोरपडे (कुरुंदवाड), दत्तात्रय घुगरे (गुरुकुल संस्था, पेठवडगाव), सौ. सुधा पाटील (कोल्हापूर)

*** दीनानाथ मंगेशकर पुरस्कार**

मास्टर दीनानाथ मंगेशकर स्मृती प्रतिष्ठानने मालिनी राजूरकर, मोहन तोंडवळकर, शंकर अभ्यंकर, डॉ. श्रीराम लागू, आमीर खान, उल्हास प्रतिष्ठान यांची पुरस्कारासाठी निवड केली आहे.

पुरस्कार वितरण सोहळा २४ एप्रिल रोजी माटुंगा येथील षण्मुखानंद सभागृहात गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या हस्ते झाले.

'मास्टर दीनानाथ मंगेशकर स्मृती प्रतिष्ठान' दीनानाथ मंगेशकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हे पुरस्कार देते. यंदाचा मा. दीनानाथ मंगेशकर पुरस्कार शास्त्रीय संगीतातील प्रदीर्घ सेवेबद्दल मालिनी राजूरकर यांना, कलावैभवच्या 'शंभुराजे' या नाटकाच्या निर्मितीबद्दल मोहन तोंडवळकर यांना, सामाजिक कार्याबद्दल आनंदमयी पुरस्कार उल्हास प्रतिष्ठान (वांगणी) या संस्थेला, तर साहित्य सेवेबद्दल वाग्विलासिनी पुरस्कार शंकर अभ्यंकर यांना देण्यात आला.

नाट्य-चित्रपटसृष्टीच्या सेवेबद्दल डॉ. श्रीराम लागू आणि हिंदी चित्रपटाच्या सेवेबद्दल आमीर खान यांना मा. दीनानाथ मंगेशकर विशेष पुरस्कार प्रदान करण्यात आला. ५० हजार रुपये रोख आणि स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

*** जनार्दन वाघमारे यांना महर्षी शिंदे पुरस्कार**

आजच्या जागतिकीकरणाच्या व स्पर्धेच्या युगातदेखील बहुजन समाजाच्या प्रगतीसाठी महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, महर्षी शिंदे व रा. ना. चव्हाण यांचे विचार दिशादर्शक ठरतात, असे प्रतिपादन शिक्षणतज्ज्ञ डॉ. जनार्दन वाघमारे यांनी केले.

दलितमित्र रा. ना. चव्हाण यांच्या १५ व्या स्मृतिदिन कार्यक्रमात रा. ना. चव्हाण प्रतिष्ठानतर्फे डॉ. वाघमारे यांना ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव यांच्या हस्ते महर्षी शिंदे पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच महर्षी शिंदे ग्रंथास साहित्य अकादमी पुरस्कार मिळाल्याबद्दल डॉ. गो. मा. पवार यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. वाघमारे म्हणाले, ''रा. ना. चव्हाण यांच्या लेखनास संशोधनमूल्य व विचारांची बैठक होती. जागतिकीकरणाच्या युगात ज्ञानाच्या क्षेत्रात आपण मागे पडलो, तर पुढील काळात प्रगतीच्या दिशेने झेप घेऊ शकणार, ही गोष्ट लक्षात घेऊन बहुजन समाजाने पावले उचलणे गरजेचे आहे.'' डॉ. गो. मा. पवार म्हणाले, ''महर्षी शिंदे यांचा विचार व कार्य जागे ठेवण्याचे काम रा. ना. चव्हाण प्रतिष्ठान

करीत आहे.''

डॉ. आढाव म्हणाले, ''आजचे राज्यकर्ते शाहू, फुले, आंबेडकरांचे तत्त्वज्ञान आचरणात आणत नाहीत. सामाजिक सुरक्षा कायद्याशिवाय कष्टकरी जनतेला न्याय मिळणार नाही.''

*** निसर्गसेवक संस्थेतर्फे डॉ. सतीश पांडे यांना 'निसर्गसेवक' पुरस्कार**

''मानवाच्या जीवनाचा पाया निसर्गसंपत्ती हा आहे. तंत्रज्ञान या संपत्तीला पर्याय ठरू शकत नाही, कारण ते खर्चिक आहे. वाढत्या गरजांसाठी आपण निसर्गसंपत्तीचा विध्वंस करीत आहोत, तिचे पुनरुज्जीवन हा कळीचा प्रश्न असून त्यासाठी सर्वांनी हातभार लावण्याची गरज आहे,'' असे मत ज्येष्ठ पक्षितज्ज्ञ डॉ. प्रकाश गोळे यांनी व्यक्त केले.

निसर्गसेवक संस्थेतर्फे या वर्षी पहिल्यांदाच जाहीर झालेला 'निसर्गसेवक' पुरस्कार डॉ. सतीश पांडे यांना देण्यात आला.

निसर्गसंवर्धनाची चळवळ व्यापक प्रमाणावर वाढविण्याची गरज आहे, असे सांगून डॉ. गोळे म्हणाले, ''शहरांचा वेगाने विकास होत असल्याने येथील नागरिकांची जबाबदारी दिवसेंदिवस वाढत आहे. या वाढीला पायबंद घालण्याचा उपाय आपल्याकडे नाही. मात्र, आपल्या जीवनाचा पर्यावरणावर काय परिणाम होतो, याचा विचार करून निसर्गाकडून घेतलेल्या फायद्याची जाणीव ठेवली पाहिजे. यासाठी शहरातील नागरिकांनी विचार करायला भाग पडायला हवा.''

संस्थेने प्रसिद्ध केलेल्या 'जागतिक तापमानवाढ' या विषयावरील विशेषांकाचे प्रकाशनही या वेळी डॉ. गोळे यांनी केले.

डॉ. पांडे यांनी आतापर्यंत ३५ संशोधनपर निबंध लिहिले असून, त्यापैकी सात परदेशांतील नियतकालिकांत प्रसिद्ध झाले आहेत. त्यामध्ये 'नॅशनल जिऑग्राफिक' आणि अमेरिकेतील जर्नल ऑफ रॅप्टर रिसर्चचा समावेश आहे. आतापर्यंतच्या पक्षिनिरीक्षणाच्या प्रवासातील सर्वांत रोमांचकारी अनुभव कोणता, असे विचारता ते म्हणाले, ''आई-वडिलांपासून दुरावलेल्या पिलाला पुन्हा त्यांच्याजवळ गेलेले पाहणे यासारखे मोठे समाधान नाही. गेली चार वर्षे गरवारे महाविद्यालयाच्या सहकार्याने चालविल्या जाणाऱ्या पक्षिशास्त्र प्रमाणपत्र अभ्यासक्रमातून या विषयाबद्दलची वाढती जाणीवही निरलस आनंद देते.''

*** दहिवळ गुरुजी स्मृती साहित्य पुरस्कार २००८**

दहिवळ गुरुजी स्मृती प्रतिष्ठान शेवगाव यांचेतर्फे रघुनाथ दामोदर दहिवळ गुरुजी यांच्या प्रथम स्मृतीदिनानिमित्त ''दहिवळ गुरुजी स्मृती साहित्य पुरस्कार'' या वर्षीपासून कादंबरी, कथा व कवितेसाठी सुरू करण्यात येत असून प्रत्येक साहित्य

प्रकारासाठी १००१ रुपये रोख व स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

१ जानेवारी २००६ नंतर प्रकाशित झालेले कादंबरी, कथासंग्रह व कवितासंग्रह या पुरस्कारासाठी पात्र राहतील. इच्छुकांनी प्रकाशित साहित्य श्री. संतोष दहिवळ, मु. पो. शहरटाकळी, ता. शेवगाव, जि. अहमदनगर या पत्त्यावर दि. १५ मे २००८ पूर्वी पाठवावे.

## * सौ. लीलादेवी अग्रवाल ट्रस्टचा उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार

सिल्लोड येथील सौ. लीलादेवी सीताराम अग्रवाल ट्रस्टचा राज्य पातळीवरील उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार नागपूरच्या सावित्रीबाई फुले वाचनालयास माजी आमदार अ. सत्तार अ. नबी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. राज्यातील 'क' आणि 'ड' वर्गातील वाचनालयाकडून प्रस्ताव मागवून हा पाच हजार रुपयांचा पुरस्कार दिला जातो.

या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून सीताराम अग्रवाल, डॉ. प्रकाश नवाल, कवयित्री उज्ज्वला कुलकर्णी हे उपस्थित होते. पुरस्कारामुळे अधिक काम करण्यास प्रेरणा मिळते असे मत अ. सत्तार यांनी व्यक्त केले. औरंगाबाद येथील सुभेदार रामजी सार्वजनिक वाचनालयास प्रोत्साहनपर पुरस्कार देण्यात आला.



**पुरस्कार प्रदान करताना माजी आमदार अ.सत्तार, अ.नबी सोबत ट्रस्टचे अध्यक्ष सीताराम अग्रवाल, डॉ. प्रकाश नवाल, प्रा. शिवाजी वाठोरे, उज्ज्वला कुलकर्णी.**

❒

# वाचकांचा प्रतिसाद

सप्रेम नमस्कार

मार्च २००८ चा अंक वाचला आणि तुम्हाला पत्र लिहिण्याचे लगेच ठरवले. तसे गेली २/३ वर्षे मी साहित्य जगतामधील हा अनोखा प्रवास मी बघत आहे. या अंकातील संपादकीय वाचून तुमचे अभिनंदन करण्यासाठी हे पत्र. तसे पाहिले तर मासिकातील संपादकीय किंवा वर्तमानपत्रातील अग्रलेख वाचून अभिनंदन करण्याचे योग तसे विरळाच! ह्याला अपवाद फक्त आचार्य अत्रे ह्यांचा! कारण त्यांचे अग्रलेख चैतन्यदायी, जिवंत आणि प्रामाणिक असत.

तसेच संपादकीय वाचून सर्वांत मला आवडलेली गोष्ट म्हणजे तुमच्या ज्ञानाचा आवाका, तुमचे जगाचे ज्ञान चौफेर आहे. त्याचा व्यवसायासाठी उपयोग करून घेणे हा तुमचा चाणाक्षपणा आहे. तुमचे संपादकीय वाचल्यावर तुमचा बहुश्रुतपणा लगेचच जाणवतो. नुसत्या व्यवसायापुरता व्यासंग न करता आपल्याला सर्व जगाचे ज्ञान हवे, सध्या जगात काय चालले आहे हे माहित हवे ही गोष्ट मला अतिशय भावली.

तुमच्या संस्थेचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे पुस्तकांच्या विषयातील बहुविधता. इंग्रजीतील उत्तमोत्तम ग्रंथांचे अनुवाद लवकरात लवकर उपलब्ध करून देण्याची तुमची हातोटी वाखाणण्यासारखी आहे. मी काही हजार रुपयांची पुस्तके तुमच्या माध्यमातून माझ्या वाचक क्लबसाठी घेतली आहेत. तुम्ही ठेवलेल्या किंमती योग्य वाटतात. मी माझ्यापरीने वाचन वा वाचक संस्कृती जपण्याचा प्रयत्न करतो आहे.

नॉलेज इज पॉवर हे सूत्र हा आपल्यातला समान दुवा आहे.

**माधव साने**

९१७/६ गणेशवाडी, शंकर बंगला, पुणे ४११ ००४.

‘यशाचा कानमंत्र हे पुस्तक एका वाचकाने वाचल्यावर त्यांना जी प्रेरणा मिळाली त्यात त्यांनी सहकाऱ्यांनाही सामील करून घ्यायचे उत्स्फूर्तपणे ठरविले. त्यांनी ४५ प्रती खरेदी करून सर्वांना वाटल्या आणि त्यांनाही त्या पुस्तकाने अधिकाधिक उद्दिष्ट पूर्ण करण्याची प्रेरणा मिळाली

**Respected Sir / Madam ,**

My Name is Sail. I am working in Japanese company as a “General Manager”. My company name is Keihin FIE Pvt. Ltd. We are at Chakan and having 1000 employees.

I am a member of your book purchase scheme.

I have purchased one copy of Book “Yashacha Kan-mantra ( Marathi)” just out of enthusiasm when I visited first time to your office on 09/03/08 ( Sunday ).

I read this book and found very encouraging.

We give various challenges to our workers. One of our production line workers achieved challenge of giving suggestion by each member so that our cost can come down.

As a part of motivation to workers , I have purchase 45 books of “ Yashacha Kanmatra “ from you and distributed them as a token of appreciation so that they get further motivated. Each member was highly motivated by the contents of book.

wanted to share this pleasant event with you as you play important role in publishing such good books.

My best wishes & thank you ………….

Regards,

**S.S.Sail.**
**Keihin FIE Pvt.Ltd.**
**Chakan.**
**Pune Dist.- 410501.**
**Tel.No.-02135-664300 / 664400**
**Mobile No.9822502907.**

## नवे कोरे

# द टेस्टामेंट

मूळ लेखक **जॉन ग्रिशॉम**
अनुवाद **विश्वनाथ केळकर**

**किंमत ३५०रु. पोस्टेज ३०रु.**




गाभा अंधाराचा

अमेरिकेतल्या व्हर्जिनिया प्रांतातल्या, अत्याधुनिक, नावीन्यपूर्ण ऑफिस. अतिश्रीमंत, पण रागीट वृद्ध उद्योगपती, ट्रॉय फेलन, मृत्यूची प्रतिक्षा करणारा. मृत्युपत्राद्वारे आपल्या मुलांना, घटस्फोटित बायकांना आणि बगलबच्च्यांना एक संदेश देऊ पहात होता, आपली अकरा बिलियन डॉलर्सची मिळकत ब्राझीलच्या दुर्गम जंगलात राहून आदिवासींची सेवा करणाऱ्या डॉ. रॅचेल लेन या धर्मोपदेशक तरुणीच्या नावे त्याने केलेली होती.

वैद्यकीय क्षेत्रात उपचारासंबंधी दाखवलेल्या निष्काळजीपणाबद्दल खटले चालवण्यात नाव मिळवलेल्या नेटवर रॅचेल लेनला शोधून काढण्याचं काम सोपवण्यात आले होते.

ट्रॉय फेलनचे वारसदार गिधाडासारखे घिरट्या मारत होते. ब्राझीलच्या जंगलात नेट, रॅचेलच्या शोधासाठी धडपडत होता. या महिला धर्मोपदेशक डॉक्टर रॅचेलला मित्र आणि शत्रू या दोन्ही पक्षातल्या लोकांनी भरपूर मनस्ताप दिलेला होता. ती स्वतःसुद्धा इतरांना एक धक्का देणार होती.

**मेहता पब्लिशिंग हाऊस,**

# श्रद्धांजली

*** सरोजिनी बाबर**



मराठी लोकसंस्कृती आणि लोकसाहित्याच्या चालत्या - बोलत्या ज्ञानकोश म्हणून गौरवल्या गेलेल्या डॉ. सरोजिनी बाबर यांचे दिनांक २० एप्रिल रोजी सदाशिव पेठेतील 'जवाहर' या त्यांच्या निवासस्थानी वृद्धापकाळाने निधन झाले. त्या ८८ वर्षांच्या होत्या. सरकारी इतमामात वैकुंठ स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

दीड महिन्यापूर्वीच सरोजिनीताई उर्फ अक्का यांना पुणे विद्यापीठातर्फे 'जीवनसाधना गौरव पुरस्कार' मिळाला होता.

सांगली जिल्ह्यातील बागणी गावात ७ जानेवारी १९२० रोजी जन्मलेल्या सरोजिनीबाईंना वडील कृ.भा. बाबर यांच्याकडून लोकशिक्षणाचा वारसा मिळाला. बापूसाहेब माटे यांनी त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. मुंबई विद्यापीठाच्या बीए परीक्षेत सर्वप्रथम आल्यानंतर त्यांनी पुणे विद्यापीठातून 'कॉंट्रिब्यूशन ऑफ विमेन रायटर्स टू मराठी लिटरेचर' या प्रबंधावर पीएचडी मिळवली. स्वातंत्र्यसंग्रामात कारावास भोगल्यानंतर स्वातंत्र्योत्तर काळात १९५२ ते ५७ या काळात महाराष्ट्र विधान परिषदेवर त्या सदस्य होत्या. १९६८ ते ७४ या काळात त्या राज्यसभेच्याही सदस्य होत्या. ज्येष्ठ कवयित्री शांता शेळके

यांच्यासोबत केलेल्या दूरदर्शनवरील 'रानजाई' या मालिकेने त्यांना महाराष्ट्रातील घराघरांत नेले. आत्मकथन, बालवाङ्मय, काव्य याबरोबर मासिकाचे संपादन, दोन दीर्घ प्रबंध, सात कादंबऱ्या, छत्तीस कथा आणि विपुल ललित लेखन असा त्यांचा समृद्ध साहित्य परिघ आहे. त्यातील 'साजशिंगार', 'एक होता राजा','जनलोकांचा सामदेव' आणि 'लोकसाहित्यमाला','भाषा आणि संस्कृती','मराठीतील स्त्रीधन' हे त्यांचे विशेष गाजलेले ग्रंथ होत.

*** ज्येष्ठ विद्रोही साहित्यिक बाबुराव बागूल**

'वेदा आधी तू होतास' असे खडसावून सांगत आपल्या कवितेतून जीवनाचे वास्तव मांडणारे आणि मराठी साहित्यात ज्येष्ठ विद्रोही म्हणून मान्यता पावलेले बाबुराव रामजी बागूल यांचे २६ मार्च रोजी नाशिक येथे प्रदीर्घ आजाराने निधन झाले. ते ७७ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलगे आणि दोन मुली असा परिवार आहे. विहितगाव येथे त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

'जेव्हा मी जात चोरली होती' आणि 'मरण स्वस्त होत आहे' या कथासंग्रहांमुळे १९६०च्या दशकात लक्ष वेधून घेतले. त्यानंतर त्यांनी कादंबरी, चरित्रात्मक कथा, कवितासंग्रह आणि वैचारिक लेख अशा साहित्य शाखांमध्ये आपल्या प्रतिभेची चमक दाखविली. आपल्या लेखनात सर्वसामान्य माणसाला सदैव केंद्रस्थानी ठेवणाऱ्या बाबुरावांची 'सूड' ही कादंबरी लोकप्रिय ठरली. १९८१ साली 'दलित साहित्य-आजचे क्रांती विज्ञान' हा त्यांचा वैचारिक लेखसंग्रह प्रसिद्ध झाला. त्यानंतर 'आंबेडकर भारत' (भाग १ आणि २) या चरित्रात्मक कथासंग्रहालाही लोकप्रियता लाभली. त्यांच्या इतर पुस्तकांमध्ये 'अघोरी' व 'कोंडी' या कादंबऱ्यांचा उल्लेख करावा लागेल. त्यांनी अखिल भारतीय दलित साहित्य संमेलन दलित-आदिवासी, ग्रामीण साहित्य संमेलन, दुसरे कामगार साहित्य संमेलन (१९९३, नागपूर) यांचे अध्यक्षपदही भूषविले. याशिवाय दलित, आदिवासी, ग्रामीण संयुक्त महासभा तसेच महात्मा फुले विचारमंच या संस्थांचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम पाहिले.

बागूल यांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. त्यामध्ये भारतीय दलित साहित्य अकादमी, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, महाराष्ट्र राज्य शासन पुरस्कार, फाय फाऊंडेशन ऑल इंडिया ॲवॉर्ड आणि कुसुमाग्रज प्रतिष्ठानचा जनस्थान या पुरस्कारांचा उल्लेख करावा लागेल.

विहितगावापासून त्यांचा जीवनप्रवास सुरू झाला. पुढे मुंबईच्या माटुंगा लेबर कॅम्पमध्ये त्यांचे व्यक्तिमत्व खऱ्या अर्थाने आकारास आले. मुंबईत असताना त्यांचा शाहीर अण्णा भाऊ साठे यांच्याशी निकटचा संबंध आला होता. १९५२ पासून

युगांतर, नवयुग, अस्मितादर्श आदी नियतकालिकांमधून त्यांच्या कथा प्रसिद्ध झाल्या, रेल्वेत नोकरी करत असताना कामगार जीवनाच्या आलेल्या दाहक अनुभवातून 'जेव्हा मी जात चोरली होती' ही कथा जन्माला आली. त्यांनी मॅक्झिम गॉर्की, पाब्लो नेरूदा यासारख्या विद्रोही लेखकांच्या साहित्याचाही अभ्यास केला. त्यामुळेच चौकटीत न अडकणारे लिखाण त्यांच्याकडून होऊ शकले.

कुटुंब तसेच मित्रपरिवारात 'आबा' म्हणून ओळख असलेले बागूल गेल्या काही वर्षांपासून मधुमेह, उच्च रक्तदाब अशा विकारांनी ग्रस्त होते. गेल्या महिन्यात मिलिंद या मोठ्या मुलाच्या निधनाचा धक्का त्यांना सहन करावा लागला.

बागूल यांच्या निधनाचे वृत्त समजताच मुख्यमंत्री विलासराव देशमुख, जिल्ह्याचे पालकमंत्री छगन भुजबळ यांच्यासह विविध मान्यवरांनी शोक व्यक्त केला.

*** उषा टिळक**

कवयित्री उषा श्यामराव टिळक (वय ६९) यांचे एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात हृदयविकाराने निधन झाले. वायुवीजशास्त्रज्ञ डॉ, श्यामराव टिळक यांच्या त्या पत्नी होत. उषा टिळक यांचे तीन कवितासंग्रह व दोन लघुकथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. त्यांच्या लघुकथासंग्रहास महाराष्ट्र सरकारचा राज्य पुरस्कार मिळाला असून, 'मोतियाचा चूर' या कवितासंग्रहास झीचा 'अल्फा झी' पुरस्कार मिळाला आहे.

*** बापू शिकारखाने**

'तुकाराम गाथे'चा प्रथमच हिंदीत 'अभंगसागर' नावाने अनुवाद करणारे लेखक श्रीराम उर्फ बापू केशव शिकारखाने (वय ९४) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुलगे, दोन मुली आहेत. हिंदी शिक्षक म्हणून ते निवृत्त झाले होते. 'संत तुकाराम गाथा डिजिटलायझेशन' प्रकल्पात 'अभंगसागर' या हिंदी गाथेला प्रथम स्थान देण्यात आले आहे. विश्रांती दिवाळी अंकाच्या संपादिका नीलिमा शिकारखाने यांचे ते वडील होत.

*** साहित्यिक राम डोके**

ज्येष्ठ कथा लेखक आणि नाट्य दिग्दर्शक राम डोके यांचे १ एप्रिल रोजी वयाच्या ८१व्या वर्षी निधन झाले.

यवतमाळच्या अमोलकचंद महाविद्यालयात १९५६ ते १९६४ या कालावधीत एनसीसीचे अधिकारी तसेच, शेवगावच्या मुरारका महाविद्यालयाचे १९६४ ते १९८७ एवढा प्रदीर्घ काळ प्राचार्य असलेले शेगावच्या गजानन महाराज इंजिनिअरिंग कॉलेजचे संस्थापक राम डोके यांचा सहस्रचंद्रदर्शन कार्यक्रम १२ एप्रिलला आयोजित करण्यात आलेला होता. पण त्याआधीच अचानक नागपूरच्या एका खासगी रुग्णालयात

त्यांचे निधन झाले आणि वैदर्भीय साहित्य तसेच नाट्य क्षेत्राला धक्का बसला.

१६ फेब्रुवारी १९२७ ला जन्मलेल्या राम डोके यांचा विदर्भाच्या शिक्षण, साहित्य, नाट्य, कला आदी विविध क्षेत्रात सुमारे ६० वर्षे वावर होता. महाविद्यालयीन जीवनापासूनच त्यांनी कथा आणि कविता लेखनाला प्रारंभ केला. सत्यकथा, अभिरुची, किर्लोस्कर या ख्यातनाम नियतकालिकांसोबतच विदर्भातील वृत्तपत्रातून त्यांचे लेखन प्रकाशित झाले आहे.

त्यांचा कल एकूणच विनोदी साहित्याकडे अधिक राहिला आणि त्यातून मानवी स्वभावाचे अनेक नमुने त्यांनी व्यक्त केले.

अब्जबुद्धे, स्माईल प्लीज, गुद्दे आणि गुदगुल्या, टाळ्या अन् कुटाळ्या, टाईमपास, नागपुरी माणसं आणि शतकातील विडंबन काव्य ही त्यांची काही गाजलेली पुस्तके आहेत.

*** माधव पिटळे**

पराक्रम, ओघ, दुसरं वादळ, पंख या कांदबऱ्या, वरातीमागून घोडं हा कथासंग्रह यामुळे गाजलेले लेखक माधव पिटळे यांचे ५ फेब्रुवारी २००८ रोजी सातारा येथे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ते ८० वर्षाचे होते. मेहता मराठी ग्रंथजगतच्या दिवाळी अंकात त्यांच्या आगामी आत्मकथनातील एक प्रकरण प्रसिद्ध झाले होते. १९५४ ते १९८३ ते कपूर इंजि. लि. या कारखान्यात नोकरीला होते. १९८६ नंतर सातारला त्यांचे वास्तव्य होते.



## चित्रमय रंगतदार कथा

## बाल वाङ्‌मय

**वयोगट- ६ वर्षांपासून पुढे**

| | | |
|---|---|---|
| चतुर बोकोबा आणि इतर कथा | वृषाली पटवर्धन | ३० |
| नशीबवान शेखर आणि इतर कथा | वृषाली पटवर्धन | ३० |
| लोखंड खाणारे उंदीर आणि इतर कथा २००६ | वृषाली पटवर्धन | ३० |
| सुंठ बिस्किटाचा माणूस आणि इतर कथा | चारुता पुराणिक | ३० |
| हस्तिदंती छडी आणि गोष्टी देशोदेशीच्या २००७ | चारुता पुराणिक | ३० |
| सूर्याची चोरी आणि गोष्टी देशोदेशीच्या २००७ | चारुता पुराणिक | ३० |
| लैलाचा दिवा आणि गोष्टी देशोदेशीच्या २००७ | चारुता पुराणिक | ३० |
| निद्राराणी आणि इतर कथा | विजया देशपांडे | ३० |
| जादूचं खीरपात्र आणि इतर कथा | अरुंधती पंडित | ३० |
| टिंबक टू आणि इतर कथा | मंजूषा आमडेकर | ३० |
| गम्मत गोष्टी | मंजूषा आमडेकर | ३० |
| धमाल गोष्टी | मंजूषा आमडेकर | ३० |
| मजेदार लोककथा | मंजूषा आमडेकर | ३० |
| आदर्श लोककथा | मंजूषा आमडेकर | ३० |
| राजाचं गुपित आणि इतर कथा २००६ | मंजूषा आमडेकर | ३० |
| ढुम ढुम ढुमाक आणि इतर कथा २००६ | मंजूषा आमडेकर | ३० |
| सोन्याचा पाऊस आणि मजेदार गोष्टी २००७ | मंजूषा आमडेकर | ३० |
| ड्रॅगनचे घर आणि मजेदार गोष्टी २००७ | मंजूषा आमडेकर | ३० |
| बुडबुड्यांचे विमान आणि इतर गोष्ट २००६ | अर्चना ओक | ३० |
| चालणारा हिमपुतळा आणि इतर गोष्टी २००६ | अर्चना ओक | ३० |
| छोटुसा पांढरा ससुकला आणि इतर गोष्टी २००६ | अर्चना ओक | ३० |
| छोटू किल्लीवाला उंदीर आणि इतर गोष्टी २००६ | अर्चना ओक | ३० |
| गंपू चिंपू आणि इतर कथा २००६ | उमा खरे | ३० |
| मैत्रीचे मोल आणि इतर कथा २००६ | उमा खरे | ३० |
| सिंड्रेला आणि इतर कथा २००६ | उमा खरे | ३० |

| | | |
|---|---|---|
| घारीची चलाखी आणि मस्त मस्त गोष्टी २००७ | उमा खरे | ३० |
| गर्विष्ठ घोडा आणि मस्त मस्त गोष्टी २००७ | उमा खरे | ३० |
| बदकाचे बूट आणि गम्मत गोष्टी २००६ | उज्ज्वला केळकर | ३० |
| गर्विष्ठ सूर्यफूल आणि गम्मत गोष्टी २००६ | उज्ज्वला केळकर | ३० |
| शेपटीवालं झाड आणि इतर कथा २००६ | राजीव तांबे | ३० |
| ससुल्या आणि इतर कथा २००६ | राजीव तांबे | ३० |
| शूर ससोबा आणि इतर कथा २००६ | राजीव तांबे | ३० |
| चला चहा पिऊया आणि इतर कथा २००६ | राजीव तांबे | ३० |
| बंटू बसला ढगात आणि इतर कथा २००६ | राजीव तांबे | ३० |
| बंटूचा टिकटिक मित्र आणि इतर कथा २००६ | राजीव तांबे | ३० |
| घड्याळातील कोकिळा आणि गडबड गोष्टी २००६ | निर्मला मोने | ३० |
| अस्वलाची शेपटी आणि गडबड गोष्टी २००६ | निर्मला मोने | ३० |
| खट्याळ खलाशी आणि गडबड गोष्टी २००६ | निर्मला मोने | ३० |
| जादूचं बटण आणि इतर गोष्टी २००७ | निर्मला मोने | ३० |
| जादूचं रबर आणि इतर गोष्टी २००७ | निर्मला मोने | ३० |
| जादूचं तळं आणि इतर गोष्टी २००७ | निर्मला मोने | ३० |
| जांभळे आंबे आणि जंमत गोष्टी | वैशाली कार्लेकर | ३० |
| फट्फजिती आणि जंमत गोष्टी | वैशाली कार्लेकर | ३० |

# कुमार वाङ्मय

## वयोगट- ११ वर्षांपासून पुढे

| | | |
|---|---|---|
| खरा मित्र आणि इतर गोष्टी | शरद दळवी | ३० |
| एकमेका साह्य करु आणि इतर गोष्टी | शरद दळवी | ३० |
| आजीचं घर आणि इतर गोष्टी | शरद दळवी | ३० |
| पत्राचा प्रवास आणि इतर गोष्टी | शकुन्तला फडणीस | ३० |
| पैज जिंकली छोट्याने आणि इतर गोष्टी | शकुन्तला फडणीस | ३० |
| आजीचा धडा आणि इतर गोष्टी | शकुन्तला फडणीस | ३० |

## युद्ध चित्रकथा (२ऱ्या जागतिक महायुद्धाच्या सत्यकथा)

| | | |
|---|---|---|
| **दहशतीचे बेट (इवो जिमाची लढाई)** | अनु. प्रा. प्रसाद बर्वे | ६० |
| **साम्राज्याचा पाडाव (मिडवेची लढाई)** | अनु. निर्मला मोने | ६० |

**पोस्टेज खर्च वेगळा**

**मेहता पब्लिशिंग हाऊस,**

# ओळखा पाहू

‘परम’ संगणक बनवणारे भारतीय संगणकतज्ञ.

सीडॅकचे पाहिले कार्यकरी संचालक.



विजेत्यास रु. १०१ चे रोख पारितोषिक दिले जाईल.

एप्रिल अंकातील ‘ओळखा पाहू’चे उत्तर

---

**प्रसिध्द सरोदवादक - अमजद अली खान**

---

स्पर्धेचे विजेते - **सौ. इंदिरा ल. वाळवेकर-बेळगाव**

---

**अचूक उत्तर पाठवणारे वाचक -**

डॉ.राजेन्द्र वायचळ-कोल्हापूर, स्नेहल फणसे-भोर, हरिभाऊ शिंदे-पुणे, वसंत मेहेंदळे-पुणे, लक्ष्मण देशपांडे-सातारा, श्रीकांत जोशी-गारगोटी, राहुल वरंभे-नागपूर, वैशाली कुऱ्हेकर-अमरावती.

**प्रायोजक**

श्री राजू जगदीशचंद्र मेहता, मे.हिराचंद नानचंद अँड कंपनी, मालेगाव, **जि.नाशिक.**

**(साडी आडतीचे व लुंगीचे होलसेल व्यापारी.)**

**सूचना** - प्रायोजकांच्या पत्त्यावर उत्तरे पाठवू नका.

# मेहता मराठी ग्रंथजगत

## वर्गणीचे नूतनीकरण करा.

**एक वर्षाची वर्गणी**
**१५० रु.**

**तीन वर्षांची वर्गणी**
**३५० रु.**

**पाच वर्षांची वर्गणी**
**५०० रु.**

**तीन किंवा पाच वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट**




३ वर्षांची वर्गणी
पाठविल्यास
'वपु ८५'
वपु काळे
हे ६०रु.चे
पुस्तक भेट!
पोस्टेज २०रु.

५ वर्षांची वर्गणी
पाठविल्यास
'सुवर्णमुद्रा'
शान्ता ज. शेळके
हे ८०रु.चे
पुस्तक भेट!
पोस्टेज २०रु.



**भेट पुस्तके - प्रती शिल्लक असेपर्यंतच**

**मेहता मराठी ग्रंथजगत,** द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे ४११ ०३०. फोन - (०२०) २४४७६९२४

**वर्गणी मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टने वरील पत्त्यावर पाठवावी.**

RNI NO-MAHMAR/2000/2739 Licence to post WITHOUT PREPAYMENT/
Regd.No.:L-2/RNP/PNW/M/38/2006-2008 / L.NO.LWP-50/
Posted at Marketyard Pso, Pune
Posting Date 11 May 2008.

लवकरच येत आहे....

सुप्रसिद्ध लेखिका Enid Blyton™ यांची जगभर गाजत असलेली मालिका

**'द सीक्रेट सेवन'** आता मराठीत!

# सात गुप्तचर

**धाडसी छोट्यांच्या धडाकेबाज शोधमोहिमेची १५ पुस्तकांची मालिका...**

**अनुवाद - प्रियंका कुलकर्णी**

छोटुशा **बब्बडचे** गमतीदार अनुभव खास तिच्याच भाषेत



- चंपी मालीश आणि था..था..था!
- दांडोबा राक्षस आणि गुळगुळीत मावशी
- गुळाची ढेप आणि सरबत
- सू सुटका आणि रंगीत डोंगर
- प्रेमळ पाऊस आणि इतर गोष्टी
- दिवाळी आणि इतर गोष्टी

**राजीव तांबे**

## मेहता पब्लिशिंग हाऊस

१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोनभवन समोर, पुणे - ३०. फोन - (०२०) २४४७६९२४.

प्रति,

________________________

________________________

________________________

________________________

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ३०. येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : प्रेसोग्राफ, ५२६, नारायण पेठ, पुणे ३०.